# कथामकरंद.

भाग १ ला.

लेखक

सुबोधमाला, धीरसिंह, कबीर-चरित्र,

इत्यादिकांचा कर्ता.

प्रकाशक

दामोदर सांवळाराम आणि मंडळी.

( सर्व हक्क पुस्तककर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत. )

सन १९१० इ.

किंमत आठ आणे.

हें पुस्तक

मुंबई, इंदुप्रकाश स्टीम प्रेसमध्यें छापिलें.

# प्रस्तावना.

पाश्चात्य वाङ्मय उपवनांत नानाप्रकारचे मनोवेधक, आल्हादकारक व सुरस भाग आहेत. त्यांत विहार करावयास एकदां शिरकाव करून घेतला, म्हणजे काय पहावें व काय पाहूं नये असें होऊन जातें. त्यांतल्या त्यांत मला जो सुरस भाग वाटला, तो मी इकडच्या अभिरुचीस रुचेल अशा रितीनें " **कथामकरंद** " या रूपानें विद्वान् लोकांच्या पुढें ठेविला आहे. आतां प्रस्तुत गृहस्थ हा अशा कामीं अनभिज्ञ असल्यानें त्याच्या-कडून तिकडून इकडे ने आण करण्यांत पुष्कळशी रसहानि झाली असेल, हें तो जाणून आहे; पण रसिक लोक तिकडे लक्ष देणार नाहींत. त्यांस यांतील—

मधुलिह इव मधुबिन्दून्विरलानपि भजत गुणलेशान् ।[1]

अशी प्रार्थना आहे.

**वेणी संहार.**

या भागांत तिघे वनवासी ही जी गोष्ट आहे, तींतील बुद्धाच्या 'प्रार्थने' विषयीं जो भाग आला आहे, तो प्रो० **धर्मानंद कोसंबी** यांच्या उपकृतीचें फळ आहे. ही गोष्ट मला त्यांना दाखवितां आली नाहीं, व बुद्ध धर्मासंबंधीं, आणि बौद्ध लोकांच्या रितीरिवाजासंबंधीं, मला प्रो० साहेबांस पत्रोत्तरीं नीट हकीगत विचारतां आली नाहीं, म्हणून ह्या गोष्टींत जे कांहीं दोष राहिले असतील, त्याचा सर्व दोष मजकडे आहे. प्रो० साहेबांनीं माझ्या पत्राचा आदर करून मला जी माहिती दिली तीबद्दल मी त्यांचे आदरपूर्वक आभार मानितों.

---

१ मधु बिंदूंसि मधुपसे विरलहि गुणलेश घ्या तुह्मी सुचिर ॥

**परशरामपंत तात्या.**

ह्या गोष्टींचे हस्तलेख व " प्रुफें " तपासतांना रा० गोडबोले, अत्रे, आठवले व शारंगपाणी यांनीं मला जें साह्य केलें, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. त्यांना जें जें चुकीचें वाटलें, तें तें त्यांनीं सुधरविलें. यामुळें यांत लेखनवैचित्र्य राहिलें असेल, पण त्यास नाइलाज आहे.

तीनदां " प्रुफें " पाहूनही चुका राहिल्या. त्यांपैकीं प्रत्येक चुक (काना मात्रा इत्यादि ) सुधरविली नाहीं. तर ठळक ठळक चुका मात्र सुधरविल्या आहेत.

आतां " इंदुविजय " कंपनीचे मॅनेजर जे शेट **दामोदर सांवळाराम यंदे**, यांचे आभार मानावयाचे. या सद्‌गृहस्थांचे मजवर फारच उपकार झाले आहेत. त्यांनीं मला वेळोंवेळीं ज्या उपयुक्त सूचना केल्या व प्रोत्साहन दिलें, त्यांबद्दल येथें चार ओळी लिहून मी उपकारमुक्त होणार नाहीं, हें मला माहीत आहे; पण त्यांच्याविषयीं मला जें वाटतें, तें बोलल्यावांचून राहवत नाहीं त्यास मी तरी काय करूं! शेटजींस हीच विनंति आहे कीं, ज्या ज्या वेळीं मला त्यांच्याशीं वागण्याचा प्रसंग येईल, त्या त्या वेळीं त्यांनीं मला असेंच साह्य करावें.

सरते शेवटीं माझ्या एका मित्राचे आभार मानावयाचें आनंदकारक काम करितों—करितों असें म्हटलें खरें; पण त्यांत मीं लिहूं तरी काय ? ज्याच्या साह्यावांचून मला एक पाऊल पुढें टेवितां आलें नाहीं, त्याच्याविषयीं काय लिहावें! पण मला इतकी भ्रांत का पडली कोण जाणे! प्रसिद्ध तत्त्ववेत्ता जो **बेकन** यानें म्हटलें आहे. " A friend is another myself " त्याच्या विषयीं लिहावयाचें म्हणजे स्वतः विषयींच लिहावयाचें!! व तें काय लिहीणार! तेव्हां हा प्रश्न येथेंच सोडतों.

या पुस्तकास जर लोकाश्रय चांगला मिळाला, तर याचा दुसरा भाग लिहून तयार आहे, तो वाचकांस लागलीच सादर करण्यांत येईल.

मुंबई, माघकृष्ण त्रयोदशी, बुधवार, शके १८३१. } **कर्ता.**

# अनुक्रमणिका.


| गोष्टीचें नांव. | पृष्ठ. |
|---|---|
| १ दोन वृद्ध वारकरी. ... .... ... | १–४३ |
| २ अवघें देखें जन ब्रह्मरूप. ... .... | ४४–५३ |
| ३ शेवटीं सत्याचाच जय होतो. .... .... | ५४–७३ |
| ४ तिघे वनवासी. ... .... ... | ७४–८४ |
| ५ आमुच्या जीवना प्रेमाचा आधार. .... .... | ८५–१२३ |

तीर्थरूप नारायणराव ऊर्फ नानासाहेब देव, इंदूर.



# अर्पण पत्रिका.

केवळ, आपल्या मुलांचें शिक्षण व्हावें म्हणून
ज्यांनीं आपल्या वृद्धापकाळांतही कोणत्याही
प्रकारचे कष्ट करण्यास बाकी ठेविले
नाहीं, त्या माझ्या परमपूज्य

**पित्यास,**

हें लहानसें पुस्तक भक्तीपूर्वक अर्पण करितों.

# कथामकरंद.

## दोन वृद्ध वारकरी.

व्रत तप नलगे करणें सर्वथा । नलगे तया तीर्था जाणे आम्हा ॥१॥
आपलेची ठायीं असा सावधान । करा हरि कीर्तन सर्वकाळ ॥२॥
नलगे कांहीं वर्जावें तें अन्नजीवन । लावा अनुसंधान हरिचे पायीं॥३॥
नलगे योगायोग नलगे संत त्याग । असोद्या अनुराग हरिचे पायीं॥४॥
नलगे निरंजनीं करणें वास तुम्हा । दृढ धरा प्रेमा हरिचे पायीं ॥५॥
नामा म्हणे नाम दृढ धरा कंठीं । तेणें येईल भेटी पांडुरंग ॥ ६ ॥

(१)

पुरे पुरे हा संसार । कर्म बळिवंत दुस्तर ॥ १ ॥
राहो नेदी स्थीर । एकें ठायीं निश्चळ ॥ २ ॥
अनेक बुद्धीचे तरंग । क्षणा क्षणा पालटती रंग ॥ ३ ॥
धरूं जातां संग । तंव तो होतो बाधक ॥ ४ ॥

तुकाराम.

सुमारें पन्नास वर्षांपूर्वी ब्रह्मावर्तास दोन वृद्ध गृहस्थ रहात असत. ते श्रीमंत **बाजीराव**साहेब यांचे बरोबर दक्षिणेंतून गेले होते. मूळचें त्यांचें घराणें **पंढरपूरचें.** त्यांच्या वडिलांनीं **पंढरपूर** सोडलें व **पुण्यास** चाकरी धरली. त्या वेळीं, आम्ही सांगतों त्या गृहस्थांचा जन्मही झाला नव्हता. **पंढरपूर** सोडून जे दोन गृहस्थ **पुण्यास** आले त्यांचा फार स्नेह होता. तो त्यांच्या मुलांतही कायम होता. हे दोन गृहस्थ लहानपणीं वडिलांच्या तोंडून **पंढरीच्या** वारीच्या अनेक गोष्टी ऐकत; त्यामुळें आपणही एखाद्या वारीला **पंढरपुरास** जावें असें त्यांस वाटे. पण तो काळ

धामधुमीचा असल्यानें त्यांना **पंढरपुरास** जातांच आलें नाहीं. पुढें **बाजीराव**साहेब **ब्रह्मावर्तास** गेले तेव्हां यांनांही जाण्याचा योग आला, म्हणून **पंढरीस** जाणें लांबणीवर पडलें. परंतु **पंढरीला** जाण्याचा त्यांनीं नवस केल्यानें त्यांना कितीदां तरी तेथें जावेंसें वाटलें, पण योगायोगच आला नाहीं. आतां चोहोंकडे स्थिरस्थावर झाल्यानें त्यांचा **पंढरीस** जाण्याचा बेत पुनः होऊं लागला.

त्या वृद्ध गृहस्थांपैकीं एकाचें नांव **मुकुंदराव** व दुसऱ्याचें नांव **विठ्ठलपंत** होतें. **मुकुंदराव** हा सुखवस्तु गृहस्थ होता. त्यानें **ब्रह्मावर्तास** आपली वतनवाडी केली होती. **विठ्ठलपंताची** स्थिति **मुकुंदरावाइतकी** चांगली नव्हती. **मुकुंदराव** हा धिमा, गंभीर आणि नेटाचा मनुष्य होता. त्याला कसलेंही व्यसन नव्हतें. इतकेंच नव्हे तर तो बोलून मोठा चांगला होता. त्यानें शिवी ती कशी वापरलीच नाहीं. त्यानें **बाजीराव**साहेबापाशीं हुद्यांचीं कामें अनेकदां केलीं होतीं व त्यांच्या इतराजीमुळें त्यानें जेव्हां जेव्हां कामें सोडलीं तेव्हां तेव्हां त्यानें आपलें सर्व काम कसें चोख ठेविलें होतें. त्यांत कोणालाही ब्र काढायला जागा नव्हती. यामुळें त्याचें काम जेव्हां दुसऱ्याचे गळ्यांत पडे तेव्हां त्याला फार सोपें वाटे. त्याचें कुटुंबही मोठें होतें; तीन करतेसवरते मुलगे, चार मुली व दोन लग्न झालेले नातु; एकूण त्याचा पसारा बराच मोठा होता. **मुकुंदरावाची** अंगकाठीही बरीच मजबूत असे. त्याची साठी उलटली होती पण काठीची जरूरी भासत नव्हती इतकेंच नव्हे तर पाठीला वांक कसा तो ठाऊक नव्हता. केंसही अजून पांढरे झाले नव्हते. नाहीं म्हणावयास एखाद दुसरा पांढरा केस मिशींत चमके.

**विठ्ठलपंत** हा जरी श्रीमंत नव्हता तरी गरीबही पण नव्हता. त्यानें मागें चित्रें करण्याचें काम केलें होतें. श्रीमंताकडे व इतर सरदार लोकांकडे त्यानें केलेलीं कित्येक चांगलीं चित्रें होतीं; पण त्याला आतां वृद्धावस्था प्राप्त झाल्यानें चित्रें करण्याचें काम त्यानें टाकलें. त्यामुळें त्याची बरीचशी मिळकत व श्रीमंतांची कृपाही गेली! तो आपल्या घरीं कित्येक गुरें पाळी. त्याचा एक मुलगा रोजगार पहावयास बाहेरगांवीं गेला होता. आणि दुसरा मुलगा घरींच असे. **विठ्ठलपंत** हा अत्यंत दयाळु आणि नेहमीं आनंदी वृत्तीचा असे. त्याला एक दोन लहान व्यसनेंही होतीं.

तो कधींमधीं गुडगुडी ओढीत असे व दुसरें व्यसन तपकिरीचें. त्याला गाण्याचाही नाद होता. तो स्वभावाचा प्रेमळ, व वृत्ति आनंदी, यामुळें तो जेव्हां कधीं तुकाराम महाराजांचे अभंग म्हणे तेव्हां ते अभंगच ऐकत बसावेंसे पुष्कळांस वाटे. एकंदरींत तो शांत व मनमिळाऊ होता. त्याला कलह मुळींच प्रिय नसे. त्याचें वर्तन सर्व शेजाऱ्यांशीं चांगलें असल्यामुळें सर्वांसच तो हवासा वाटे. **विठ्ठलपंत** हा ठेंगणा व वर्णानें काळा-सांवळा होता. त्याचे डोक्यास चांगलेंच टक्कल पडलें होतें व केंसही बरेच पांढरे झाले होते.

या दोन्हीं वृद्ध गृहस्थांचा **पंढरीच्या** वारीस जाण्याचा कित्येक दिवसांपासून—नव्हे वर्षांपासून—संकल्प होता; पण मध्येंच कांहीं अडचणी उपस्थित होऊन त्यांचा बेत मागें पडे. **मुकुंदरावास** तर फुरसत कशी ती ठाऊक नव्हती. नेहेमीं पहावें तो त्यांना कांहींना कांहीं तरी काम हें असावयाचेंच. एक काम संपलें कीं दुसरें तयारच; त्यामुळें त्यांना वेळ मिळावा कसा ? या महिन्यांत मुलीचें लग्न, पुढें मुलाची मुंज, नातवाचा जन्म, पहिल्या मुलाचें लग्न, दुसऱ्या मुलाची मुंज, दुसऱ्या मुलीचें लग्न, सुनेचें फळशोभन, दुसऱ्या नातवाचा जन्म, दुसऱ्या मुलाचें लग्न, तिसऱ्या मुलाची मुंज—छेः छेः असें जर मी सर्व सांगत बसलों तर मला पुढची गोष्टही लिहितां यावयाची नाहीं. मग या भोंवऱ्यांत पडलेले जे **मुकुंदराव** त्यांना **पंढरीस** जावयास वेळ मिळत नव्हता, ‘ यांत चुके कोणतें ? ’ प्रपंच सारखा वाढत चालला. रहावयाचें घर पुरेना. दुसरें घर बांधावयाचा विचार सुरू झाला. ही संसाराची दुसरी फांदीही वाढूं लागली! पुरे या आतां घरगुती अडचणी. एकंदरींत **तुकाराम** महाराजांनीं-

**अभंग**

**संसारसिंधु हा दुस्तर । नुलंघवे उलंघितां पार ॥**
**बहूत वाहाविलें दूर । नलगेचि तीर पैल थडी ॥ १ ॥**

वगैरे जें म्हटलें आहे तें किती तरी बरोबर आहे.

---

( २ )

**जाय जाय तूं पंढरी । होय होय वारकरी ॥ १ ॥**
**सांडोनिया वाळवंट ! काय इच्छिसी वैकुंठ ॥ २ ॥**

**खांद्या पताकांचे भार । तुळसी माळा आणि अबीर ॥ ३ ॥**
**साधु संतांच्या दाटणी । तुका जाय लोटांगणी ॥ ४ ॥**

एके दिवशीं **विठ्ठलपंत** आणि **मुकुंदराव** घराच्या बाहेरील बाजूस ओसरीवर पथारी घालून तीवर बोलत बसले होते. **विठ्ठलपंत मुकुंदरावास** विचारतात "आतां आपण आपला नवस कधीं शेवटास नेणार? आतांपर्यंत झालें तें सर्व टीक झालें."

यावर **मुकुंदरावांनीं** वेडेंवांकडें तोंड करून म्हटलें, "असें पहा, यंदा कांहीं आपणांस निघतां यावयाचें नाहीं. दक्षिणेंत पाऊस पाणी नीट नाहीं; आणि इकडेही तीच स्थिति, यंदाचें वर्ष चांगलें जाईल असें कांहीं मला वाटत नाहीं. हें घर हजारांत होईल म्हणून मी बांधावयास प्रारंभ केला, पण काय? पहातां पहातां पंधराशें रुपये घरापायीं घातले तरी पण संपावयास अजून ठिकाण नाहीं. हा उन्हाळा येईपर्यंत थांबलेंच पाहिजे. हा उन्हाळा गेला म्हणजे मग ईश्वर करील तर आपले नवस वगैरे सर्व कांहीं पार पडेल."

"या अडचणी का कधीं संपावयाच्या आहेत? एक संपली कीं तिच्या जागीं दुसरी दत्त ह्मणून आलीच. ह्मणून मला असें वाटतें कीं, आतां कांहीं आपलें जाणें लांबणीवर टाकूं नये. मी कधीं एकदां **पंढरी** पाहीन असें मला झालें आहे. जावयास हे दिवस चांगले आहेत."

"दिवस चांगले आहेत खरे, पण माझ्या घराची वाट काय? मी हा पसारा कोणाचे डोक्यावर टाकून जाऊं? आणि हा आपल्या डोक्यावर घेतो तरी कोण? माझ्या मागें माझें काम कोण पहाणार?"

"वः **मुकुंदराव,** तुह्मीं असें बोलतां कीं जणूं काय तुमच्या मागें ह्मणजे काम पहावयास कोणी नाहीं! कोण पाहील ह्मणजे? तुमचा मुलगा पाहील."

"काय माझा मुलगा? आणि काम पहाणार! छेः त्यावर विश्वास टेऊन कांहीं उपयोग नाहीं. त्याला भांगेचें जबरदस्त व्यसन; जेव्हां पहावें तेव्हां तो आपला तीच्यांत धुंद असतो. त्या धुंदींत त्याला शुद्ध ना बुद्ध! अशा निर्बुद्ध दैवावर संसार टाकून जाऊं? छेः हें कालत्रयीं होणार नाहीं. केव्हां कशा धंद्यांत तो पडेल हें कांहीं सांगतां येत नाहीं.

अशावर विश्वास मी कसा टाकूं ? टाकणार नाहीं. हो, टाका कोणच्या भरंवशावर ? ”

“ खरेंच मुकुंदराव, पण आपण जेव्हां येथून कायमचे जाल तेव्हां काय कराल बोला ? अहो थोडे दिवस बाहेर जातांना जर तुमचा पाय घरांतून निघत नाहीं, तर मग तेव्हां कसा निघणार ? मग येथेंच जीव घुटमळेलना ! तर मग काय घरांत समंद होऊन बसणार ? राग येऊं देऊं नका. तेव्हां जाणें आहेच, ह्मणून जातों. मग आनंदानें आज पंढरीस कां जाऊं नये ? पुनः मनांत आणा कीं, आपण नवस केला होता, हें एक असो. तुमच्या मुलास नको कां कांहीं अनुभव यावयास ? मग एकदम सर्व संसार अंगावर पडण्यापेक्षां आज थोडा थोडा पडूं द्या. त्याला तरी हें काम कळलेंच पाहिजेना ? बोला. ”

“ तुह्मी ह्मणतां तें सर्व खरें. पण असें पहा, जें जें काम आपण हातीं घेतलें आहे तें तें संपूर्ण झालेलें पाहिलें ह्मणजे बरें वाटतें. हें घर बांधून झालें म्हणजे पुनः—! !”

“ पुनः दुसरें काम हातीं घ्यावयाचें ! मग तें संपलेलें पहावयाचें, कीं पुनः तिसरें काम हातीं तयारच ! पण हें संपावयाचें कधीं ? ”

मुकुंदरावाचें लक्ष संसारविषयक गोष्टींत पूर्णपणें गुंतलें होतें. ते ह्मणतात “ या घराचें पायीं आज थैलीभर रुपये मी ओतले. घरात कांहीं नाहीं. यात्रेला निघावयाचें ते रिक्त हस्तें तर निघतां येत नाहीं. आतां आपणास कमींत कमी तीनशें....”

“ तीनशें ? ”

“ तीनशें जाऊं द्या पाहिजे तर ! पण दोनशें तर रुपये पाहिजेतच. व आज खर्च करावयास ही का लहान सहान रकम आहे ? ”

हें भाषण ऐकून विठ्ठलपंत हंसले. ते ह्मणाले “ वः वः इकडे बघा जरा. तुमची माया माझ्या मायेपेक्षां दसपट आहे, तरी पैशासंबंधीं तुमची कुरकुर आहेच. तें सर्व राहूं द्या. आपणास निघावयाचें केव्हां, तें मला कळूं द्या, ह्मणजे आज जरी माझ्यापाशीं कांहीं नाहीं, तथापि निघावयाचे वेळेपर्यंत बेताचे रुपये जमविण्याची मी तजवीज करीन. ”

यावर **मुकुंदराव** हंसून ह्मणतात " तुह्मी इतके श्रीमंत असाल असें मला नव्हतें बुवा ठाऊक ! बरें. तुह्मी काय तजवीज करणार तें तर कळूं द्या. "

" त्यात काय मोठेंसें कळावयाचें आहे ? कांहीं रुपये मी घरांतूनच जमा करीन. कांहीं गुरं ढोरं विकून करीन. "

" घरांत जें आहे नांहीं, तें आज दिलें कीं, मंग उद्यां अडचण पडेल, व मग बसाल पश्चात्ताप करीत ? "

" पश्चात्ताप ? आणि मला ? छेः छेः मला कधींही याचा पश्चात्ताप होणार नाहीं. पापाशिवाय मला कशाचाही पश्चात्ताप झाला आहे, असें घडलें नाहीं. "

" मग उद्यां पोटाची काळजी पडेल तेव्हां ? "

" पोटाची काळजी आपण करून काय उपयोग ? त्याची काळजी परमेश्वरास. अहो ' देव उदार देव उदार । देतां नाहीं थोडे फार ॥ ' हेंच खरें. पैशाची वगैरे काळजी आपण करूं नये. आपण फक्त मोक्ष-प्राप्तीची काळजी करावी. "

" हें सर्व खरें. तथापि घरच्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणें हेंहीं कांहीं चांगलें नव्हे. "

" पण घरच्या गोष्टीपेक्षां अध्यात्मिक गोष्टीकडे आधीं लक्ष पुरविलें पाहिजे. तशांत आपण **पंढरीस** जावयाचा नवस केला आहे. अहो, **पंढरीचें** नांव घेतलें ह्मणजे काय सांगूं ? मला कांहीं एक सुचत नाहीं. " असें ह्मणून त्यांनीं आपल्या मधुर व मुक्त कंठांत या अंकाच्या आरंभीं दिलेला " जाय जाय तूं **पंढरी** " हा अभंग ह्मटला. या अभंगाचा **मुकुंदरावाचें** मनावर फार परिणाम झाला.

सरते शेवटीं **विठ्ठलपंत** ह्मणाले, " आतांपर्यंत झालें तें झालें. आतां हें काम दिरंगाईवर टाकून उपयोगी नाहीं. मला तुमचा विचार काय होतो हें उद्यां नक्की सांगा. नाहीं तर मी जाणारच. "

असें ह्मणून **विठ्ठलपंतांनीं मुकुंदरावांचा** निरोप घेतला.

**मुकुंदरावांनीं** रात्रीं या गोष्टीचा विचार केला. त्यांना वाटलें **विठ्ठलपंत** ह्मणतात हें सर्व खरें. जों पर्यंत आपले पाय चालतात व जिवंत जीव आहे, तोंपर्यंत आपला निश्चय शेवटास नेलेला चांगला. एकदां ही संधि गेली, कीं **विठ्ठलपंताची** सोबतही मिळावयाची नाहीं. अशा विचारांत त्यांना झोंप लागली. रात्रीं **पंढरीचींच** स्वप्नेंही पडत होतीं. सकाळ होतांच ते **विठ्ठलपंताकडे** आले, व; आपली येण्याविषयींची अनुकूलता त्यांना सांगितली.

---

## ( ३ )

## अभंग.

**परिसेंगे सुनेबाई । नको वेचूं दुध दहीं ।। १ ।।**
**आवा चालली पंढरपुरा । वेसी पासुनि आली घरा ।। २ ।।**
**ऐके गोष्टी सादर बाळे । करीं जतन फुटकें पाळें ।। ३ ।।**
**उखळ मुसळ जातें । माझें मन गुंतलें तेथें ।। ६ ।।**
**भिक्षुक आल्या घरा । सांग गेली पंढरपुरा ।। ७ ।।**
**भक्षीं परिमितें आहारु । नको फारसी वरो सारूं ।। ८ ।।**
**मुलें लेंकरें घर दार । माझें येथेंचि पंढरपुर ।। १४ ।।**
**तुका ह्मणे ऐसें जन । गोवियेले मायें करून ।। १५ ।।**

या गोष्टीस सुमारें आठवडा लोटला. ते दोघेही **पंढरीच्या** यात्रेस जाण्याची तयारी करूं लागले. **मुकुंदरावापाशीं** रोकड रकम होती ह्मणून त्यांना रुपयांची सोय लावण्यास मुळींच जड गेलें नाहीं. त्यानें स्वतःला खर्चावयास ह्मणून दोनशें रुपये घेतले, व आपल्या पाठीमागें सर्व परिवार चालविण्यास ह्मणून बायकोला पांचशें रुपये दिले. **विठ्ठलपंतांनींही** पैशाची सोय लावलीच. आपल्या गुरांपैकीं दहा गुरें त्यांनीं विकलीं. त्यांचे त्यांना दीडशें रुपये आले. **विठ्ठलपंतांनीं** ज्याला तीं गुरें विकलीं त्याचेपाशीं असा करार केला होता कीं, पंढरपुराहून आपण परत आल्यावर मग त्याचेकडे आपल्या गुरांची मालकी जावी. तोंपर्यंत तीं

आपल्याच घरीं रहावींत; त्याच्या बायकोनें ब्राह्मण भोजन घालण्यासाठीं ह्मणून जें काय जमविलें होतें तें सर्व नवऱ्यास दिलें. सुनेनेंही जें ह्या वेळीं किडुक मिडुक जमविलें होतें तें त्यांस देऊन टाकलें.

**मुकुंदरावांनीं** घरची व्यवस्था आपले पश्चात् कशी ठेवावयाची तें मुलांस चांगल्या रीतीनें सांगितलें. चारा कसा आणावयाचा, किती आणावयाचा, कोठें ठेवावयाचा, खत कोठें टाकावयाचें, शाकारावयाचें केव्हां वगैरे सर्व समजवून सांगितलें व 'माझ्या पश्चात् वरास कशालाही हात लावूं नये' अशी सक्त ताकीद दिली. दागिन्याचे पेटीवर वगैरे मोहोरा केल्या. इकडे **विठ्ठलपंतांनीं** घरी बायकोला सांगितलें, "मी जीं गुरें विकलीं त्यांचा आणि आपल्या गुरांचा गोंधळ करूं नको. त्यांच्या गुरांचीं चांगली काळजी घे. एकदां आपल्या गुरांस न मिळालें तर पुरवेल. त्यांचीं व आपलीं गुरें जनलीं तर त्यांच्या गुरांचे केरडे व केरडी अलग ठेव." घरगुती गोष्टीविषयीं ह्मणाल तर त्यानें अक्षरही काढलें नाहीं. तो बायकोला ह्मणाला, "प्रसंग व अडचणी या जसजशा येतील तसतसें कसें वागावें हें आपोआप तुला सुचेलच. तुम्ही सर्व मोठे व जाणते आहांत; आपलें हिताहित कशांत आहे हें तुह्मांला कळतेंच आहे."

याप्रमाणें ते दोघे वृद्ध पुरुष **पंढरीस** जावयास सज्ज झाले. त्यांना वाटेंत कांहीं खावयास द्यावयाचें ह्मणून घरच्या मंडळींनीं त्यांना सामान बांधून दिलें. त्यांनीं बरोबर अगदीं जरूरीचें तेंच सामान घेतलें. कारण पायीं जावयाचें व पल्ला लांबचा पडला. घरची व कांहीं शेजारची मंडळी त्यांना वेशीपर्यंत पोहोंचवावयास आली होती. वेशीपासून परस्परांनीं परस्परांचा निरोप घेतला.

**विठ्ठलपंतांनीं** घर सोडलें तथापि त्यांची आनंदी वृत्ति कायम होती. गांवाबाहेर येतांच त्यांनीं आपल्या घरगुती काळज्या वगैरे वेशींतच सोडल्या. आपल्याबरोबर या पैकीं कांहींएक घेतलें नाहीं. नाहीं ह्मणावयास त्यांना आतां एकच काळजी होती. तीः आपल्या सोबत्याला आनंद कसा द्यावयाचा, बोलतांना कोणालाही लागणारें, कर्कश, मानी भाषण कसें टाळावयाचें, आपणास **विठोबाचें** 'सुंदर ध्यान' कसें दिसेल व आपण आनंदानें घरीं सुखरूप कसें येऊं? जात असतांना स्वतःशीं **रामाचें** नांव ते घेत. त्याचप्रमाणें **पांडव** प्रतापांतील कथा,

**तुकाराम, नामदेव, एकनाथ, ज्ञानोबा** यांच्या गोष्टी मनांत घोळीत. यांना वाटेंत कोठें कोणी भेटलें, अथवा रात्रीं मुक्कामास थांबले असतां कोणाशीं बोलण्याचा प्रसंग आला, तर ते फारच चांगुलपणें वागत व त्याच्याशीं गोड भाषणें करीत. त्यांना एक गोष्ट मात्र करतां आली नाहीं. ती कोणती ह्मणाल तर तपकिरीचा त्याग ! रस्त्यांत कोणी तपकीरवाला भेटला तर या समानशीलांचें सख्य जमलें नाहीं असें व्हावयाचेंच नाहीं. तपकिरीप्रत्यिर्थ त्यांना कधीं कधीं मागें रहावें लागे.

इकडे **मुकुंदराव** मुकाट्यानें चालले होते. ते निमुटपणें कांहीं एक त्रास न देतां व व्यर्थ भाषण न करतां चालत. त्यांचें चालणें जितकें शांतपणाचें होतें, व त्यांच्या वागण्यांत जो शांतपणा होता तो, अंतः-करणांत नव्हता. त्यांची घरची काळजी सुटली नव्हती. त्या भारानें त्यांचें अंतःकरण जड झालें होतें. आपले पश्चात् घरीं काय चाललें असावें याचा त्यांनीं सारखा धोपा घेतला होता. यामुळें त्यांची चित्तवृत्ति ठिकाणावर नव्हती. " आपल्या मुलास हें सांगावयास तर नाहीं ना विसरलों ! ही गोष्ट तरी सांगितली का ? बरें आपण सांगितल्याप्रमाणें या सर्व गोष्टी मुलगा बिनबोभाट करील काय ? " हे विचार करीत ते चालले होते. त्यांना वाटेंत कोठें बटाटे पेरतांना दिसलें, किंवा असेंच कांहीं दृष्टोत्पत्तीस आलें तर त्यांचें मन घराकडे भरधांव जाई. " आपला मुलगा सर्व काळजी घेत आहेना ? घरीं बटाटे चांगलें टेवले आहेत ना ? नाहींतर उंदीर खावयाचे ! शालजोड्या वगैरे जर काढल्या तर जशाच्या तशाच ठेवील ना ? हो. नाहीं तर त्या—कशा अगदीं नवीन आहेत—उंदराच्या अथवा कसरीच्या भक्ष्यस्थानीं पडावयाच्या ! " असेही विचार मनांत घोळत. या विचाराचा त्यांचे मनावर इतका अतिरेक होई कीं, " ही यात्रेची सर्व भानगड येथेंच सोडावी, अजून कांहीं फारसें लांब आलों नाहीं, या यात्रेच्या अवधींत मुलगा काय करील कोणास टाऊक ! त्या पेक्षां या दोन दिवसांच्या अवधींत थोडेसें नुकसान झालेलें पुरवलें. जीवावरचें शेपटीवरच गेलें असें समजेन. घरीं जाऊन पेरणीचें वगैरे काम स्वतः केलेलें बरें. स्वतः इतकी कोण काळजी घेणार ? छेः मुलाला माझ्याप्रमाणें थोडेंच जुळणार ! " हे विचार मनांत आले कीं, त्यांचीं पावलें घराकडे वळत ! थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे

गच्छति पुरः शरीरं धावति पश्चादसंस्थितं चेतः ।
चीनांशुकमिव केतोः प्रतिवातं नीयमानस्य ॥

कालिदास.

अशी त्यांची स्थिति झाली होती.

---

(४)

धन्य ते संसारीं । दयावंत जे अंतरीं ॥

तुकाराम.

या प्रमाणें त्या गृहस्थांचा प्रवास सारखा चार आठवडे चालला होता. त्यांचे जोडे अगदीं जीर्ण झाले, ह्मणून त्यांनीं एका गांवांत नवीन जोडे घेतले. घर सोडल्यापासून त्यांना जेवणाचा व रात्रीं कोठें सराईत उतरण्याचा प्रसंग आला तर भाड्याचाच काय तो खर्च येत असे. पण आतां ते **माळव्यांत** आले. व इकडची स्थिति इतकी चांगली होती कीं, त्यांच्या पंक्तीचा लाभ आपणास मिळावा ह्मणून लोक त्यांच्याशीं भांडत! ज्याला त्याला वाटे, "हा अतिथि आपल्या घरीं यावा." तेथें अतिथींचा पूर्ण दुष्काळ असल्यानें अतिथि दिसला कीं त्याच्यावर यांची टोळधाड पडलीच. ते अतिथींना घरीं नेत व त्यांचा प्रत्येक प्रकारचा बंदोबस्त ठेवीत. इतकेंच नव्हे तर या सर्वांत आश्चर्य वाटण्याजोगी गोष्ट ह्मटली ह्मणजे, या प्रवाशांनीं दुसऱ्या गांवीं जावयास घर सोडलें, ह्मणजे ज्याचे घरीं तो उतरला असेल, त्यानें पुढील प्रवासांत उपयोगी पडावा ह्मणून त्यांस डाळ आटा बांधून द्यावा! या प्रवासांत त्यांना काडीचाही खर्च लागला नाहीं. हा सुपीक प्रदेश ओलांडला व ते दुसऱ्या प्रांतांत गेले. तेथें दुष्काळाचे साम्राज्य पसरण्यास प्रारंभ झाला होता. चोहोंकडे उग्र स्वरूप दिसे. अशी जरी शोचनीय स्थिति होती, तरी त्या प्रांतांतील

---

मागील पृष्टांत दिलेल्या कवितेचा अर्थ—

मद्वपु जाय पुढें हें परि मन मागेंच धांवतें कैसें ।
वारा समोर येतां मागें ध्वजवस्त्र जातसे जैसें ॥

कृष्णशास्त्री राजवाडे.

लोक प्रवाशापासून जागेचा किराया घेत नसत. पण त्यांना कांहीं खावयास द्यावयाचें त्यांचें सामर्थ्य नव्हतें, ह्मणून येथें मात्र आपल्या प्रवाशांस धान्य विकत घ्यावें लागे व क्वचित् प्रसंगीं पैसे देऊनही धान्य मिळणें कठीण पडे. लोक ह्मणत 'मागल्या वर्षींही पीक चांगलें आलें नाहीं, ह्मणून यंदा खावयास मिळण्याची मारामार पडत आहे.' स्वत:जवळच नीट खावयास नाहीं तर दुसऱ्यास कोण देणार ! पैशाला किंमत नव्हती; धान्याला होती. कारण भुकेच्या प्रसंगीं पैशाला घेऊन काय करावयाचें. ह्मणून लोक ज्यास्त पैसे मिळत असतांही धान्य विकण्याचें मनांत आणीत नसत. श्रीमंतांस पदरचें खावे लागलें. ते गरीब झाले. मधल्या स्थितींतले कंगाल बनले. व कंगाल ? त्यांना दाही दिशा मोकळ्या असल्यानें ते पोटासाठीं वाट फुटेल तिकडे गेले. कित्येक तर 'अन्न अन्न' करीत इहलोक सोडून परलोकीं गेले !

याप्रमाणें प्रवास करीत असतां त्यांचा मुक्काम एका लहानशा गांवांत झाला. तेथें त्यांनीं सत्तूचें पीठ तयार करून घेतलें व एका झाडाखालीं रात्र काढली. व दुपारच्या उन्हाचा त्रास होऊं नये व मजल तर रोजच्या इतकी व्हावी ह्मणून ते मोठ्या पहांटेसच निघाले. ते सुमारें आठ मैल गेल्यावर त्यांना एक लहान नदी लागली. तिच्यांत पाणीच नव्हतें. मात्र ठिकठिकाणीं पाण्यासाठीं ह्मणून खळगे खणले होते. त्यापैकीं कांहीं खळग्यांत पाणी होतें. त्या पैकीं एका झिऱ्याकांटीं ते उतरले व रात्रीं तयार केलेलें सत्तू काढिलें. खाणें वगैरे झाल्यानंतर एका झाडाखालीं कांबळें हांतरलें व त्यावर विश्रांतीसाठीं पडले. **विठ्ठलपंतांनीं** आपल्या नाकपुड्या साफ केल्या व तपकीरीची एक चिमूट घेतली. त्यांच्याकडे पाहून **मुकुंदरावांनीं** मान मुरडली व ह्मणतात, "तुह्मीं ही खोड अजून टाकत नाहीं हें कसें ?"

"अहो, ही बोलून चालून खोडच. ती अशी तशी का निघते ?"

यावर **मुकुंदराव** कांहीं बोलले नाहींत. किती वेळ ते दोघे स्तब्ध पडले होते. कांहीं वेळानें ते उठले व आपल्या प्रवासास त्यांनीं आरंभ केला. पुन: सुमारें आठ मैल गेले तेव्हां त्यांनां एक गांव लागला. यांचा रस्ता त्या गावांतूनच जात असल्या कारणानें ते गांवांतून जाऊं लागले. बराच पल्ला पडल्यामुळें त्यांना टेकावयास कोठें जागा मिळाली

तर पाहिजे होती व थोडेंसें पाणी पिऊन नंतर पुढचा मार्ग चालावयाचा त्यांचा विचार होता उन्हाचा बराच त्रास झाल्यानें **विठ्ठलपंत** बरेच थकले. त्यांना थांबावेंसें वाटे. **मुकुंदरावांस** थांबण्याची विशेष अवश्यकता भासत नव्हती. ते हाडाचे बळकट होतेच, पण चालणारेही बांके असल्यानें **विठ्ठलपंतांस** त्यांच्या बरोबर साथ धरतां येईना.

" जर पाण्याचा एक घोट मिळेल तर ?.... " **विठ्ठलपंत** ह्मणाले.

" बरें, पाणी प्या; मग तर झालेंना. मला तहान लागली आहे पण मी सध्या पाणी पिणार नाहीं. " **मुकुंदराव** ह्मणाले.

" हें पहा **मुकंदराव**, तुह्मी जरा पुढें व्हा. ती झोंपडी दिसते ती ? तेथें मी जातों व हा पाणी पिऊन येतोंच बघा, व याच पावलीं तुह्माला गांठतों. तुह्मी मात्र जरा हलक्या पायानें चला. "

" बरें कांहीं चिंता नाहीं. मी सावकाश चालतों. "

" **नाशकास** जो रस्ता जातो तोच धरा बरें. ह्मणजे जातांना तेथील रामाचें दर्शन होईल. तें स्थान जाज्वल्य आहे. "

यावर **मुकुंदरावांनीं** नुसती मान डोलविली व आपला रस्ता धरिला. व **विठ्ठलपंत** त्या झोंपडीकडे वळले.

झोंपडीच ती. तशांत खेडेगावांतली. ती कितीशी मोटी असणार ? तिला छप्पर नसून गाऱ्यानें लिंपलें होतें. तथापि कित्येक ठिकाणीं मातीचीं ढेकळें निघून खालीं पडलीं होतीं. त्यामुळें त्या भोकांचा खिडक्या प्रमाणें उपयोग होई. त्या झोंपडीची डागडुजी कित्येक दिवसांत झाली नव्हती असें अनुमान बांधण्यास काय चिंता ? एका बाजूनें छप्पर अगदीं मोडकळीस आलें होतें. या झोंपडी भोंवतीं एक काठ्यांचें कुंपण असून आंत जावयास एक दरवाजा होता. त्यांतून **विठ्ठलपंत** गेले, व झोंपडी जवळ जातात तोंच त्यांना भिंतीशीं एक ह्मातारा गृहस्थ लोळत असलेला दिसला. त्याची हजामत बोटभर वाढली होती व अंगावर नीट वस्त्रेंही नव्हतीं. त्यांना वाटलें हा या झोंपडीच्या मालकाचा नोकर असावा ? नाहीं तर निदान आंत तरी लोंळता. ते झोंपडीजवळ गेले. तेथें सर्व दूर भोकशांतून **सूर्यानें** आपले हस्त खुपसले होते. या **सूर्यनारायणाच्या** कृपेनें तेथील लोक संतत झाले असल्यास काय नवल ? तेथें त्यांना कोणी दिसेना ?

मग ते दारांत आले व त्या म्हातान्यास विचारतात "कारे बाबा येथें कोण रहातो ? जवळ आसपास कोठें पाणी आहे का ?"

पण या प्रश्नावर त्या म्हातान्याचें एकनादोन. यामुळें **विठ्ठलपंतांना** वाटलें 'हा म्हातारा आजारी, बिनमुरवती किंवा मुका असावा."

इतक्यांत एका मुलाचा रडण्याचा स्वर त्यांना ऐकूं आला. तो स्वर ऐकून त्यांना वाटलें या झोंपडींच्या मालकावर कांहीं संकट तर नाहींना आलें ? ते दाराशीं गेले व त्यांनीं कडी वाजविली; पुष्कळ हाका मारिल्या पण कोणी ओ देईल तर शपथ. म्हणून त्यांनीं पायानें दरवाजाला एक धक्का दिला तों दार उघडलें. इतक्यांत आंतल्या बाजूनें त्यांना कुंथणें ऐकूं आलें. हा वेळपर्यंत झालेला सर्व प्रकार पाहून त्यांना वाटलें, "अरेरे! या गरीब लोकांवर कांहींतरी संकट ओढवलेलें दिसतें. हा प्रकार काय आहे, हें त्यांनांच विचारलेलें बरें."

असें म्हणून **विठ्ठलपंत** आंत शिरले.

---

(५)

**अभंग**

**जे कां रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले ॥ १ ॥**
**तोची साधु ओळखावा । देव तेथेंची जाणावा ॥ २ ॥**
**मृदुसबाह्य नवनीत । तैसें सज्जनांचें चित्त ॥ ३ ॥**

तुकाराम.

घरांत शिरतांच डाव्याबाजूस एक खोली होती तिकडे विठ्ठलपंत वळले. त्या खोलींत एक फारच वृद्ध बाई बसली होती. तिचें नेसावयाचें वस्त्र जेमतेमच लांब होतें; मग ती डोक्यावरून पदर तो काय घेणार ? तिच्याजवळ एक लहान रोडका मुलगा बसला होता. त्याचा रंग अगदीं काळा व पोटाची दामटी वळल्यानें तो भेसूर दिसे. तो त्या वृद्ध बाईचा हात खेचे व 'देना दे,' असें म्हणत रडे. **विठ्ठलपंतास** हा देखावा दरवाजाबाहेरूनच दिसला. त्याची चौकशी केल्याशिवाय जावयाचें नाहीं, असें त्याच्या मनानें घेतलें असल्यामुळें ते खोलींत शिरले. त्या खोलींतली हवा गरम झाली होती. त्याचा त्यांना भपकारा आला. त्यांनीं सभों-

वर्ती हळूच नजर फिरविली. तेथें एक रांजण होता. त्या रांजणापाशीं एक मध्यम वयाची बाई लोळत तळमळत पडली होती. तिच्या आंगाखालीं कांहीं नव्हतें. ती घटकेंत एक पाय लांब करी, एक जवळ करी, पुनः एक लांब करी, अशी ती जळावीण मीनाप्रमाणें तळमळत होती. तिच्या तोंडांतून घर घर असा आवाज निघत होता. तिच्या अंगाला दुर्गंधी सुटली होती. **विठ्ठलपंत** आंत आलेले पाहून त्या वृद्धेनें वर डोकें केलें व त्यांच्याकडे पाहिलें. ती ह्मणाली—

" बावारे ! तुला काय पाहिजे ? "

**विठ्ठलपंत** हा प्रकार पाहून चकित झाले होते. त्यांचें लक्ष या बाईच्या प्रश्नाकडे गेलेंच नाहीं. ते डोळे फाडून खोलींत बघत होते. त्यांना रांजणापाशीं आणखी एक आकृती दिसली. पण ती नीट ओळखतां आली नाहीं. आपल्या प्रश्नाचें उत्तर आलें नाहीं. हें पाहून ती म्हातारी चिडली. ती म्हणते " अरे, काय पाहिजे तें बोल. आमच्या जवळ कांहीं नाहीं. "

ती बाई अस्सल हिंदुस्थानीं बोलत नव्हती तथापि तिचा भावार्थ **विठ्ठलपंतांना** कळला. ते ह्मणाले " बाई, मला तहान लागली होती ह्मणून मी इकडे आलों. मी एक पांथस्थ आहे. येथें कोठें पाणी..."

" येथें कोणी नाहीं. खरेंच कोणी नाहीं; पाणी आणावयास आहे कोण ? ती तिकडे मरत पडली आहे; मला उठवत नाहीं. तर, बाबा आल्या वाटेनें परत जाईनास कसा ?"

" ही तळमळत बाई पडली आहे, हिला पहावयासही तुमच्या घरांत कोणी नाहीं ? " **विठ्ठलपंत** विचारतात.

" नाहीं. आमच्या येथें कोणी नाहीं. अन् असणार तरी कोण ? माझा मुलगा बाहेर मरत पडला आहे. ही बोलून चालून मुलगी. राहता राहिलें मीच ना ? पण मला कांहीं उठवत नाहीं. आतां आम्ही सर्व-जण मरणाची वाट पहात आहोंत. तोच काय तो आमची काळजी घ्यावयास राहिला आहे; बाकी कोणी दिसत नाहीं. "

नवीन गृहस्थ अवचित् आलेला पाहून त्या मुलानें आपलें रडें आवरतें घेतलें. पण जशी म्हातारीनें आपली गृहकथा गाण्यास सुरवात केली तसा यानेंही आपला सूर लाविला. तो तिचा हात खेंचून म्हणतो " आजी भाकर दे भाकर. "

त्या वृद्ध बाईला **विठ्ठलपंत** आणखी कांहीं प्रश्न करणार इतक्यांत बाहेर पडलेला गृहस्थ भिंतीला धरून अडखळत अडखळत घरांत आला, व मोठ्या मुष्किलीनें एकदाची ती खोली गांठली व तो खोलींत पाय टाकणार, पण तो अशक्ततेमुळें नीट उंच न उचलवल्यानें तो म्हातारा उंबरठ्यास अडखळून खोलीच्या आंतल्या बाजूस धाडकन् पडला. त्यानें पुनः उठण्याचा प्रयत्न केला नाहीं. पडल्या पडल्याच त्यानें भाषण करण्यास सुरवात केली. पण दम कांहीं छाटवेना; एक शब्द बोलला कीं दम लागे व दुसरा शब्द उच्चारण्यास श्रम पडत. तो मोठ्या मुष्किलीनें म्हणाला "दुखणें आणि दुष्काळ....पछाडलें आहे. तो मरत आहे....भुकेनें..." असें म्हणत तो अश्रु गाळूं लागला.

**विठ्ठलपंतांनीं** खांद्यावरची पडशी काढली. व तिचें तोंड सोडून त्यांतून सत्तू काढलें, आणि तें त्या मनुष्यापुढें केलें. तो मनुष्य कांहीं केल्या तें घेईना. पण त्या मुलाकडे व रांजणापाशीं असलेल्या आकृतीकडे बोट करून तो असें खुणवी कीं, त्यांना आधीं द्या.

**विठ्ठलपंतांनीं** त्या मुलापुढें तो सत्तूचा गोळा केला. तो गोळा त्या मुलाला दिसतांच त्यानें पटकन तो हिसकावला व तोंडांत टाकला. त्यामुळें त्याचे गाल फुगले. इतक्यांत रांजणाकडून एक आकृती आली. ती मुलगी होती. तिनेंही सत्तूकडे आपलें ध्यान लावलें. त्यांनीं तिलाही थोडेसें दिलें, व कांहीं त्या वृद्धबाईपुढें केलें. तिनेंही तें घेतलें व तोंडांत टाकून चघळावयास आरंभ केला.

ती म्हणते "आतां जर कोणी थोडेसें पाणी आणील तर अहाहा! घसा कसा कोरडा झाला आहे. मी काल—कीं आज नीट स्मरतही नाहीं—पाणी आणण्याचा प्रयत्न केला. पण वाटेंतच झोंक गेला व पडलें. पुढें जाण्याची सोय नव्हती. मग सरपटत पुनः इथें आलें. जर कोणी भांडें नेलें नसलें तर तें तेथेंच वाटेंत पडलें असेल."

**विठ्ठलपंतांनीं** विचारलें "ती विहीर कोणच्या बाजूस आहे?"

त्या बाईनें विहीरीचें ठाव ठिकाण सांगितलें. **विठ्ठलपंत** लागलेच उठले व तें भांडें हुडकून विहीरींतून त्यांनीं पाणी आणिलें. ते स्वतः तहान फार लागली म्हणून इकडे आले पण आतां त्यांनां तहानेचें स्मरणच नव्हतें! तीं मुलें मुलीं व म्हातारी पाणी प्यालीं व त्यांनीं

आणखी कांहीं सत्तु पाण्याबरोबर खाल्लें. **विठ्ठलपंतांनीं** त्या गृहस्थास खाण्याचा फार आग्रह केला, पण तो कांहीं खाईना. तो ह्मणाला " सध्यां मला कांहीं जाणार नाहीं."

हा वेळपर्यंत ती बाई सारखी तळमळ तळमळ करीत होती. ती शुद्धीवर असल्याचें कांहीं चिन्ह दिसत नव्हतें.

कांहीं वेळानें **विठ्ठलपंत** गावांत गेले. व त्यांनीं एका दुकानांतून कांहीं खावयाचे जिन्नस आणिलें. त्या झोंपडींत कांहीं लांकडें होतीं, तीं त्यांनीं घेतलीं व विस्तव पेटविला. ती लहान मुलगी त्यांच्याकडे गेली व त्यांना ने आणण्याची मदत करूं लागली. थोड्याच वेळांत **विठ्ठलपंतांनीं** स्वयंपाक केला, व त्या अन्न अन्न करीत असलेल्या मंडळींना भोजन घातलें.

---

## ( ६ )

**ज्यासि आपंगिता नाहीं। त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥**
**दया करी जें पुत्रासी। तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥**
**तुका म्हणे सांगूं किती। तोचि भगवंताची मूर्ती ॥ ६ ॥**

जेवण झाल्यानंतर वरचें काम त्या मुलीनें केलें. नंतर ती मुलगी व तो मुलगा एकमेकांच्या आंगावर हात टाकून व पोटाशीं पाय घेऊन निजलीं. म्हातारी आणि तिचा मुलगा हे मात्र निजले नाहींत. ते झोंपडीच्या बाहेर आले. तेथें स्वच्छ चांदण्यांत ते गोष्टी बोलत बसले. त्यांनीं आपणांवर हा विपरीत काळ कसा आला याचा इतिहास सांगण्यास सुरवात केली. ते ह्मणाले—

" आह्मीं पूर्वीं पासूनच कांहीं कमी गरीब नव्हतों. कारण आमचा धंदा मोठा वाईट. आह्मीं या गांवातले परसाई आहोंत. या गावांत जेव्हां—नेहमींच—अधिकारी येतात तेव्हां त्यांना पाणी पुरवितों. याबद्दल आह्मांला सरकारांतून तीन बिघे जमीन आहे. या शिवाय एका सावकाराची कांहीं जमीन आह्मीं हांकतों. अधिकाऱ्यांचा त्रास आमच्या मागें फार असल्यानें आम्हांला दुसरें काम नीट करतां येत नाहीं. असे

आमचे हाल आहेत. यंदा पाऊस कमी पडल्यामुळें धान्य फार थोडें आलें. तशांत सावकारास सारा द्यावयाचा. तो जर दिला नाहीं तर तो आहे नाहीं त्याचा लिलांव करावयाचा. त्याला देण्यांत घरचें बरेंच सामान गेलें. एक दोन महिन्यांत घरांतलेंही धान्य संपलें. मग आह्मी भिक्षा मागण्यास प्रारंभ केला. अह्माला लोक पहिले पहिले भिक्षा घालीत, पण पुढें त्यांनीं भिक्षा घालणें बंद केलें. कारण दुसऱ्यास घालावयाला त्यांच्यापाशीं तरी माहिजेना ? गावांत आह्माला थोडें कर्जही झालेंच होतें. ”

नंतर तो गृहस्थ ह्मणाला, “ मग कोठें काम मिळेल का म्हणून मी शोध करावयास लागलों. पण मला त्याच्यांत मुळींच यश आलें नाहीं. म्हातारी व पोर भिक्षा मागावयास जात; पण त्यांनाही ती फार थोडी मिळे. अशा स्थितींत हें वर्ष कसेंबसें काढूं, असें आम्हांला वाटे; पण तशांत या दुखण्यानें आम्हांला घेरलें. आम्हाला दिवसेंदिवस निकृष्टदशाच येत चालली. एखादे दिवशा कांहीं खावयास मिळे, तर दोन दिवस कडकडीत उपोषणें पडत. म्हणून आम्ही झाडाचा पाला खावयास सुरवात केली. त्यामुळें माझ्या बायकोची अशी दशा झाली कीं काय नकळे. तिला कांहीं उभें रहातां येत नाहीं. आणि माझी सारी शक्ति क्षीण झाली. आतां तिला बरें करावयाचें सामर्थ्य आमच्यांत मुळींच राहिलें नाहीं. ”

इतकें म्हणून तो थांबला. नंतर म्हातारीनें बोलावयास सुरुवात केली. ती ह्मणाली, “कांहीं दिवस मी कष्ट करीत होतें. पण पोटास धड मिळेना म्हणून माझ्या हातून काम होईनासें झालें. आधींच ह्मातारी मी. तशांत पोटाला अन्न नाहीं. यामुळें मी अगदीं अशक्त झालें. मुलीची-सुनेची-अशी दशा झाली. मी तिला वैद्याकडे जावयास सांगितलें पण तिला चालवेना. परवां एका गृहस्थानें आमच्याकडे आंत डोंकावून पाहिलें. पण आह्मीं भुकेलेलों आणि आजारी पाहून त्यानें मागल्या पायींच पळ काढिला. दोन दिवस झाले आह्मीं मरणाची वाट पहात आहोंत. ”

ही हृदयद्रावक गोष्ट ऐकून **विठलपंतांचें** अंतःकरण गहिंवरलें. त्यांनीं **मुकुंदरावांस** गांठण्याचा विचार तूर्त सोडला.

सकाळीं ते उठले, व घरांत काय आहे काय नाही हें त्यांनीं पाहिलें. जणूंकाय ते त्यांचें रहातें घरच होते. त्या घरांत पहाण्याचे श्रम त्यांना मुळींच झाले नाहीत. कारण तेथें असें काय होतें कीं, तें त्यांनीं पहावयाचें !

**लछमनजीनें** पोटासाठीं घरातलें बहुतेक सामान विकून टाकलें होतें. ह्मणून ते बाजारांत गेले व अवश्य तेवढ्याच जिनसा त्यांनीं विकत आणल्या. त्या दिवशींही त्यांनींच स्वयंपाक केला.

**विठ्ठलपंत** त्याही दिवशीं मागें राहिले. याप्रमाणें दुसरा व तिसरा दिवस गेला. या अवधींत त्या लहान मुलाचे आंगांत बरीच शक्ति आली. तो त्यांच्याशीं पुष्कळ खेळूं लागला. ती मुलगीही तरतरीत झाली व प्रत्येक कामांत त्यांना मदत करूं लागली. म्हातार्‍या बाईच्या आंगींही बरीच शक्ति आली. व भिंतीला धरून चालण्याची शक्ति त्या गृहस्थाचेही आंगीं आली. याप्रमाणें सर्वांचें यथास्थित चाललें होतें. मात्र पहिल्या दोन दिवसांत ती बाई शुद्धीवर आली नाहीं. तिसर्‍या दिवशीं ती शुद्धीवर आली आणि "पाणी" असें म्हणाली. या बाईची जी काळजी घ्यावयाची ती सर्वजणच घेत होते.

रात्रीची वेळ. **विठ्ठलपंत** लवंडले होते. त्यांना या गृहस्थाच्या दैन्याची दया येऊन आपल्या हातून त्यांचें कांहीं चांगलें होईल काय ही काळजी होती, पण ती आतां नाहींशी झाल्यानें **पंढरपुरास** जावयाचे विचार त्यांचे डोक्यांत पुनः येऊं लागले. ते म्हणाले, "ठीक. वाटेंतच आपला इतका वेळ खर्च होईल असें मला वाटलें नव्हतें. आतां हे लोकही पायावर उभे रहाण्याजोगे झाले. आतां येथून निघावयास कांहीं चिंता नाहीं. **पंढरीनाथा,** तुझी आज्ञा आहे कीं, पहिलें दुःखितांचा समाचार घ्यावा. मला ही तूंच बुद्धि दिलीस, त्याप्रमाणें मी केलें. यांत काय ज्यास्त? आतां तुझी आज्ञा पाळली, मग तुझी भेट घेण्यास मी आतां येथून निघूं नये काय?"

---

## (७)

क्षुधेलिया अन्न । द्यावें पात्र न विचारून ॥ १ ॥
धर्म आहे वर्मा अंगीं । कळलें पाहिजे प्रसंगीं ॥ २ ॥

तुकाराम.

चवथा दिवस उगवला. या दिवशीं **विठ्ठलपंताच्या** येथें कुळधर्म होता. ह्मणून त्यांनीं असा विचार केला कीं, आज येथेंच कुळधर्म करून नंतर आपल्या मार्गास लागावें.

**विठ्ठलपंत** बाजारांत गेले आणि त्यांनीं दहीं, दूध, तूप, आटा, तांदूळ वगैरे सव सामान आणिलें. त्या गावांतला कुळकर्णी दक्षिणी ब्राह्मण होता, त्याला त्यांनीं ब्राम्हण म्हणून जेवावयास बोलाविलें. घरीं आल्यानंतर त्यांनीं स्वतः सर्व स्वयंपाक केला आणि सर्व मंडळीसह आनंदानें भोजन केलें. याच दिवशीं त्या गृहस्थाची–त्यास आपण **लछमनजी** म्हणूं–बायको उठूं बसूं लागली. **लछमनजीं**ची हजामत फार वाढली होती. म्हणून त्यानें स्मश्रु करविली. व **विठ्ठलपंता**नें धुतलेले कपडे आंगांत घालून सायंकाळीं तो त्या सावकाराकडे गेला. त्याचेच तो शेत हांकीत होता. या सावकारानें **लछमनजीं**ची हीन स्थिति पाहून त्यांचेकडून आपलें शेत काढन घेतलें होतें. त्याला **लछमनजी** म्हणाला " यंदा कृपा करून हें शेत मजकडेच असूं द्या. मी तुमचे पैसे पुढल्या वर्षी चुकते करीन. आपण जर मजकडून शेत काढून घेतलें तर मी खाऊं काय? माझी पोरेंबाळें सर्व मरून जातील !"

सावकारानें त्याचें भाषण एका कानानें ऐकलें व दुसऱ्या कानानें सोडून दिलें. तो अंतःकरणाचा कठोर असल्यानें त्याला **लछमनजीं**ची कींव आली नाहीं. त्यानें त्याची विनंती मान्य करण्याचें साफ नाकारलें. **लछमनजी** कष्टी मुद्रेनें घरीं आला व झालेली हकीगत सर्वांस सांगून रडूं लागला.

ही हकीगत ऐकून **विठ्ठलपंताला** विचार पडला. " आतां यांनीं जगावें कसें ? मी येथून **पंढरीस** गेलों कीं, यांची मी आलों तेव्हां जशी स्थिति होती तशी पुनः होणार !" त्यांचें मन द्विधा झालें. सरतेशेवटीं त्यांनीं ठरविलें कीं, " आज आपण जाण्याचा जो बेत केला होता, तो रहीत करावा व उद्यां काय होतें तें पहावें."

ह्या रात्रींही ते नित्याप्रमाणें आंगणांत येऊन पडले व परमेश्वराचें स्मरण करून त्यांनीं हांथरूणावर आंग टाकलें. पण त्यांस झोंप कांहीं येईना. त्यांना एकदां वाटे " आपणाला आतां **पंढरीस** गेलेंच पाहिजे. कारण, आतां-पर्यंत आपण पैसा व वेळ बराच खर्च केला." व एकदां वाटे "आपण गेलों तर यांची स्थिति काय होईल ? येथून जाण्यापूर्वी यांची कांहीं तरी सोय करावी व मग आपण जावें." याप्रमाणें विचार करतां करतां ते मनांत ह्मणाले, "असें जर आपण केलें तर **मारूतीच्या** शेपटाप्रमाणें आपलें रहाणें वाढणार. यांना प्यावयास पाणी व खावयास कांहीं सत्तू द्यावे व मग **मुकुंदरावास**

गाठावें, हा माझा पहिला विचार होता. पण पहा, आतां माझा किती खोळंबा झाला ? आतां असें वाटूं लागलें आहे कीं, यांची पुढचीही कांहीं सोय करावी. त्या सावकारास कांहीं अगाऊ रुपये दिले ह्मणजे तो आपलें शेत यांना देईल. त्यांत चारा फार आहे. तो विकून यांना आपला उदरनिर्वाह करितां येईल. हें साध्य व्हावयास त्यांना एक बैल, एक गाडी, व लहान मुलासाठीं एक गाय इतकें घेऊन दिलें पाहिजे. पण वः विठ्ठलपंत ! तुह्मीं फारच उदार–प्रति कर्णच कीं झालांत ! देण्याचें कामीं असें जर भोंवऱ्यांत तुह्मी सांपडूं लागला तर, तुम्हाला डोकें म्हणून वर काढावयास नको. पुनः आपलें पुढें काय होणार ? याचा कांहीं विचार करा. तुमचें सर्व शहाणपण गेलें तर नाहींना ! ”

हा विचार मनांत येतांच विठ्ठलपंत उठले. त्यांनीं आपल्या उशाचा आंगरखा–याचा ते उशीसारखा उपयोग करीत–उचलला व खिशांतून श्रमहारिका काढली. यानें तरी आपले श्रम परिहार होतील असें त्यांना वाटलें, व त्यांनीं तिचें अशा चिंतामय स्थितींतही आनंदानें सेवन केलें. पण ती श्रमहारिका आपल्या नांवाप्रमाणें वागेना ! त्यांच्या डोक्यांत विचार चाललेंच होतें. पण त्यांना कांहीं उपाय सुचेना. त्यांना वाटे आपण येथें आतां कांहीं थांबूं नये. तर एकदम वाट धरावी. व एकदां वाटे, आपण येथून गेल्यावर यांचें काय होणार ? या दोन्हीं परस्परविरुद्ध विचाराच्या भोंवऱ्यांत ते सांपडले. त्यांनीं आपला आंगरखा पुनः उशाशीं घेतला व ते पूर्वीप्रमाणें अंथरुणावर पडले. कांहीं वेळानें त्यांना झोंप लागली.

त्यांना वाटलें आपणाला कोणी उठवीत आहेत. व पहातात तों आपण पोषाख करून खांद्यावर पडशी टाकून चाललों आहोंत. ते कुंपणाच्या दरवाजापाशीं गेलें तों अर्धवट उघडा होता. त्यांतून आतां बाहेर पडणार, तोंच त्यांची पडशी कुंपणाला अडकली. ती ते सोडवूं लागले तोंच पायाजवळचा धोतराचा भागही अडकला ! तरी त्यांनीं पडशी खेचलीच; व पायाकडे पाहिलें, तों धोतर अडकलें नसून लछमनजीचा मुलगा पाय खेंचून म्हणत आहे, “ दादा भाकरी, दादा भाकरी ! ” पाठीमागें पाहिलें तो लछमनजी व त्याची आई आपणाकडे झोंपडींतून पहात आहेत. हा देखावा दृष्टीस पडत असतांच ते जागे झाले. व मोठ्यानें

स्वगत म्हणतात, " मी उद्यां यांच्या देण्याची कांहींतरी तजवीज करीन. यांना एक बैल, कांहीं दिवस पुरेसें धान्य व मुलासाठीं एक गाय इतकें घेऊन देणार व मग पुढें जाणार." असा त्यांनीं जेव्हां निश्चय केला तेव्हां त्यांना स्वस्थता वाटली. मग ते हंसून म्हणतात, "मला इतका वेळ अस्वस्थता वाटत होती, याचें कारण पंढरीनाथाच्या आज्ञेप्रमाणें न वागतां मी पंढरपुरास जाणार होतों. हा हृदयस्थ पंढरीनाथ जें सांगतों तें न ऐकतां जर त्याचें दर्शन घेतलें, तर तो भेटणार कसा ?" या विचारांत त्यांना जी झोंप आली, ती सकाळपर्यंत उघडली नाहीं.

ते सकाळीं उठले व सावकाराकडे गेले. त्याला कांहीं पैसे देऊन त्यांनीं त्याच्याकडून यंदांही तें शेत लछमनजीच्या नांवें करविलें. बाजारांतून येतांना त्यांनीं एक विळा आणला. कारण, तोही विकून टाकला होता. घरीं आल्यावर लछमनजीला त्यांनीं विळा दिला व गवत कापावयास शेतांत पाठविलें, आणि आपण स्वतः गांवांत गेले. तेथें त्यांनीं असें ऐकिलें कीं, चावडीवर एका बैलाचा आणि एका गाडीचा लिलांव होणार आहे. ते तसेच चावडीवर गेले व ती बैलगाडी विकत घेऊन गाईचा शोध करीत घराकडे निघाले. येतांना त्यांनीं बरेंचसें धान्यही विकत घेतलें. ते येत असतां त्यांना दोन कुणब्यांच्या बाया आपसांत मोठ्यानें बोलत चाललेल्या भेटल्या. त्यापैकीं एक म्हणाली, " पहिल्या-प्रथम तें कांहीं याला ओळखत नव्हते. त्यांना वाटलें हा असाच कोणी-तरी पांथस्थ पाणी प्यावयास आला आहे. पण हा तेथें राहिला. आतां विचार करा, हा कोणाचा कोण व ह्यानें त्यांच्यासाठीं काय काय केलें ? कां ? मी तर आतांच असें ऐकलें कीं, त्यानें आजच बाजारांतून त्यांच्या-साठीं धान्य, बैल, गाडी वगैरे बरेंचसें सामान विकत घेतलें आहे. असे लोक जगांत कांहीं फार नसतात. मग ते आपणास दिसावे कसे ? या लोकांना मात्र पहाण्यांत खरी मजा. नाहीं तर अमूक अधिकारी आले, चला त्यांना पहावयास ! पण कोणाच्या ते उपयोगी येतील तर शपथ ! पुनः सरकाराला खोटेंच सांगतात कीं, यांच्यापाशीं पैसा आहे......"

हें भाषण जरी 'हा' आणि 'तो' वरच चाललें होतें, तथापि तें आपल्याविषयींच आहे हें समजण्यास विठ्ठलपंताला मुळींच प्रयास पडले नाहींत. त्यांनीं गाय विकत आणण्याचा विचार सोडला. व ते तसेच

घरीं परतले. ते जसे झोंपडीजवळ आले तसे आंतील सर्व लोकांस वाटलें कीं, हें सामान आपल्यासाठींच आणलें असावें. पण हें त्यांना विचारण्याचें धैर्य कोणालाच झालें नाहीं. लछमनजी कुंपणाचा दरवाजा उघडण्यास आंगणांत आला. त्यानें विचारलें, " दादा, हा बैल व ही गाडी कोठून आणली ? "

" कां ? आणली अशीच विकत. दोन्ही स्वस्त्यांतच जात होतीं, व ह्मणून ह्मटलें घ्यावीं विकत. जा कांहीं चारा आणा व बैलास घाला; व हें सामान घरांत न्या. "

लछमनजीनें तो बैल सोडला व गोठयांत नेऊन बांधला. व स्वतःच गवतही आणावयास गेला.

त्या रात्रीं विठ्ठलपंत आपली पडशी बरोबर घेऊन निजले. रात्रीं सर्व निजानीज झालेली पाहून त्यांनीं आपला प्रवासी पेहराव केला, व खांद्यावर पडशी टाकली.

---

( ८ )

वारणासी ( पंढरपूर ) क्षेत्र थोर । तेथें लोक जाती फार ॥ १ ॥
परि तेथें अधिक काय । ऐसें विचारोनि पाहें ॥ २ ॥
जेथें तेथें देव धोंडा । तो कां आपुले गांव सांडा ॥ ३ ॥
येथें लोक तेथें लोक । अवघें एकचि उदक ॥ ४ ॥
देवीदास ह्मणे वेडें । तीर्था धांवे अवघ्या पुढें ॥ ५ ॥

विठ्ठलपंताचा पांच एक मैल प्रवास झाला तसें उजाडलें. उजाडल्यावर ते एका झाडा खालीं बसले. त्यांनीं आपली पिशवी उघडून पाहिली व तींतील रूपये मोजून शिल्लक पहातात, तों ती सारी सोळा रुपये साडेसहा आणे भरली. हें पाहून ते स्वगत ह्मणतात, "ठीक ! इतक्या रकमेंत पंढरी पहा कशी ? माझा अजून अर्धा प्रवासही झाला नाहीं ! मुकुंदराव पंढरपुरास जातील व मी ? मी तसाच राहीन ! ते विठोबाचें दर्शन घेतील. त्यावेळीं जर त्यांना माझें स्मरण झालें, त्यांचे अंतःकरणांत त्यावेळीं माझा वास असला, तर मला त्या विठोबाचें दर्शन खचित् होईल. हे विठोबा, मी तुझ्या मूर्तीचा इतका ध्यास घेतला, या वयांत माझा

नवस पाळावयास गेलों, तूं जें जें सांगितलेंस तें तें मी सर्व केलें. अरे या अनाथ दुःख-पीडितांना तुझ्याच आज्ञेनें साह्य केलें. आणि तूं? हे देवा! तूं मात्र मला साह्य करूं नयेस! इतका लांब मी तुलाचना भेटावयास आलों? आणि हे **पंढरीनाथा**, असें असूनही या अनाथाला तूं जवळ येऊं देत नाहींस? अरे—

**आलों उल्लंघुनी दुःखाचे पर्वत । पायापाशीं हित तुमच्या तरी ॥१॥**
**न देखेल दासा दुःखी होतें मन । कठिणें कठिण वांटतसें ॥ २ ॥**
**नव्हे सांडी परि वाटतें निरास । नये माझा दिस संकल्पाचा ॥३॥**
**तुका ह्मणे तुह्मी सदैवजी देवा । माझ्या ह्याचि जीवा एक ठाव ॥४॥**

या गरिबाच्या आशेचा भंग करणें, देवा, आपणाला शोभत नाहीं. एकूण **पंढरीस** जावयाचा माझा संकल्प मोडला ह्मणावयाचा! या बद्दल देव काय ह्मणेल? पण छेः तो काय ह्मणणार? आणि जरी त्यानें कांहीं ह्मटलें, तरी मी साफ सांगणार, 'अहो महाराज! तुह्मी आह्मांला एकदां तसें वागावयाला सांगतां, आणि संकल्प मोडला म्हणजे पुनः आम्हांलाच प्रायश्चित देतां! दोन्ही कामें आमच्या हातून कशीं व्हावींत? कोणचें तरी एक होणार.' अरे! पण मी हा वेदांत सांगतों कोणाला? परमेश्वराला? वः **विठ्ठलपंत**, तुम्ही बरेंच कीं हो आहांत? अहो अशी कोणची तरी गोष्ट आहे का कीं जी **पंढरीनाथाला** ठाऊक नाहीं? त्याला सर्व अडचणी माहीत आहेत, त्याला कांहीं तुम्हीं समजाऊन सांगावयास नको. अरेरे! मी उगीच त्या **विश्वंभराला** दूषण दिलें.

**निष्ठुरा उत्तरीं न धरावा राग । आहे लाग भाग ठायींचाची ॥**
**तूं माझी जननी तूं माझा जनिता । रखुमाईच्या कांता पांडुरंगा ॥**
**मुळींच्या ठेवण्या आहे अधिकार । दुरावोनि दूर गेलों होतों ॥**

माझ्या साठीं **मुकुंदराव** तुझा प्रसाद आणतीलच. तोच घेऊन मी समाधान मानीन."

याप्रमाणें विचार करीत व मध्येंच कांहीं अभंग ह्मणत ते बसले होते. रात्रभर चालत होते, इतके दिवस शरीरास शीण झालेला, तशांत वृद्धावस्था प्राप्त झालेली. त्यांच्या विचाराचा भार जसा हलका होऊं लागला,

तसे त्यांचे डोळे मिटूं लागले. तरी ते तोंडानें अभंग पुटपुटतच होते. यावेळीं ते जो अभंग म्हणत होते तो हा—

पडियलों वनीं थोर चिंतावनीं । उशीर कां अझूनि लावियेला ॥ १ ॥
येईगा विठ्ठला येईगा विठ्ठला । प्राण हा फुटला आळवितां ॥ २ ॥
काय तुज नाहीं लौकिकाची शंका । आपुल्या बाळका मोकाळितां॥३॥
तुका ह्मणे बहु खंती वाटे जीवा । धरियियेलें देवा दुरी दिसे ॥ ४ ॥

हा अभंग म्हणत असतानांच त्यांना झोंप लागली. कांहीं वेळानें त्यांना स्वप्न पडलें, त्यांत त्यांना पंढरपूरच्या विठोबाची सावळी मूर्ति दिसली. ती पहातांच ते ह्मणाले " विठ्ठला, या एका गरीब मनुष्यासाठीं आपण पंढरीहून धांव घेतली अं ! "

हा प्रश्न ऐकून ती मूर्ति हंसून म्हणाली, " शाबास ! एकीकडून आह्मांला बोलवायाचें व दुसरीकडून कां आलां ह्मणून प्रश्न करावयाचा ? "

हा प्रश्न ऐकून विठ्ठलपंत गोंधळले; त्यांना काय उत्तर द्यावें तें सुचेना. इतक्यांत पुनः पंढरीनाथच ह्मणतात " वेडया, मी येथें मुळींच आलों नाहीं. मी येथें पूर्वींपासूनच आहें. मात्र मी पहाणारासच दिसतों. मी नुसते डोळे उघडणारास दिसत नाहीं, तर त्याचें प्रत्येक प्रकारें मजकडे ध्यान लागलें पाहिजे, म्हणजे मग मी त्याला दिसतों. मी जर येथें नसतों तर 'कां आलास' हा प्रश्न बरोबर होता. पण जो येथेंच आहे त्याला 'कां आलास ?' हा प्रश्न सयुक्तिक नाहीं. मी सर्वांच्या अंतःकरणांत वास करतों. पण माझा तेथें वास आहे इतक्यानेंच मी त्यांना दिसत नाहीं. पाषाणाची माझी जे नुसती प्रतिमा पहातात त्यांनां माझी प्रतिमा दिसते, पण मी दिसत नाहीं. मला पहावयास माझी प्रतिमाच पाहिली पाहिजे असें नाहीं. मी जी बुद्धि देतों त्याप्रमाणें जो चालतो त्यालाच माझें स्वरूप कळतें. पुनः एकदां सांगतों लक्षांत घे. देवापाशीं कांहीं मोक्षाचें गांठोडें अथवा तसें कांहीं एक नाहीं. तें तुमच्यापाशींच आहे. मी पंढरीलाच आहें असें नाहीं तर सर्व ठिकाणीं आहें; मात्र मला पहाणारेच पाहिजेत !!"

या प्रमाणें पंढरीनाथ भाषण करीत असतां विठ्ठलपंत तें भक्तिभाव पूर्वक ऐकत होते. त्यांनीं देवाला साष्टांग नमस्कार केला. देवानें आपला

वरद हस्त भक्ताचे डोक्यावर ठेविले. विठ्ठलपंत उठून पुनः त्याचे कडे पहातात, तों काय ? मूर्ति अदृश्य झाली होती. त्यांना याचा मोठा चमत्कार वाटला व त्या भरांत ते जागे झाले.

या स्वप्नाचें त्यांना भारीच आश्चर्य वाटलें. त्यावर ते किती वेळ तरी विचार करीत होते. या स्वप्नाचा परिणाम त्यांचे मनावर काय झाला हें कांहीं सांगणें नकोच. आपल्याला पंढरीची वारी करितां येत नाहीं, याचें त्यांना मुळींच वाईट वाटलें नाहीं. ते आपल्या घराकडे जावयास निघाले.

---

## (९)

**तुका ह्मणे जन पहा विचारूनी । सुख वाटे मनीं तेंचि करा ॥**

**विठ्ठलपंताना** सुखरूप घरीं आलेले पाहून घरच्या सर्व मंडळीस फार आनंद झाला. वाटेंत काय काय चमत्कार घडले हें ज्याला त्याला जाणण्याची इच्छा होती. सर्वांना मोठें गूढ पडलें कीं **विठ्ठलपंत** हे मोठे भक्त असतांनां मागें कां व कसे राहिले? पंढरीस कां गेले नाहींत ? सर्वांनीं त्यांना हा प्रश्न केला व हा प्रश्न करणें स्वाभाविकच होतें. परंतु **विठ्ठलपंतांनीं** यावर कांहींच उत्तर दिलें नाहीं. ते नुसते म्हणत " मी **पंढरीस** पोहोंचावें अशी **पंढरीनाथाची** इच्छाच नव्हती. माझे पैसे रस्त्यांतच गेले. मग पुढें जाऊन करा काय ? "

**विठ्ठलपंतापाशीं** जे काय पांच दहा रुपये राहिले ते त्यांनीं आपल्या कुटुंबाला दिले. घरीं आपले पश्चात् काय काय घडून आलें याची चौकशी करतां त्यांनां असें आढळून आलें कीं, जें जें ज्याला काम सांगितलें होतें तें तें त्यानें मुरळीतपणें केलें. आळसामुळें अमूक एक काम करावयाचें राहिलें आहे असें कांहीं झालें नाहीं.

**मुकुंदरावाच्या** मंडळीसहि **विठ्ठलपंत** आल्याचें त्याच दिवशीं समजलें; व त्यांचा मुलगा आपल्या वडिलाविषयीं विचारपूस करावयास आला. त्यालाही **विठ्ठलपंतानें** तींच उत्तरें दिलीं. आणखी ते म्हणाले " **मुकुंदराव** फारच लवकर चालणारे. त्यांच्या बरोबर मला कांहीं चालतां येईना म्हणून मी त्यांना मध्येंच सोडलें. त्यांना गाठण्याचा माझा विचार होता,

पण रस्त्यांत पैसे गेले मग मी त्यांना गाठण्याचा नाद सोडून दिला; व पुढें जाण्याचा विचारही रहीत केला आणि घराकडेच परतलों झालें."

पंढरपुरच्या यात्रेस निघालेला, इतक्या लांबवर गेलेला असा शहाणा समजूतदार, पुनः भाविक मनुष्य मागें परततो म्हणजे शुद्ध वेडेपणाचें लक्षण होय, असें सर्व गांव म्हणूं लागलें. पैसे चोरीला गेले हें कांहीं लोकांस खरेंच वाटेना. ते म्हणत, यांनीं ते खर्च केले असावेत! कांहीं दिवस विठ्ठलपंताची वारी हाच विषय सर्व गांवांत झाला होता. पण कांहीं दिवसांनीं ही गोष्ट मागें पडली. लोकांना दुसरा विषय मिळाला, तशी ह्या गोष्टीची त्यांना विस्मृति पडली. विठ्ठलपंतही ही गोष्ट विसरून गेले. ते मुलाला घेऊन शेतांत गेले व त्यांनीं सर्पणास लांकडें तोडून आणलीं, नंतर घराचें छप्पर नीट केलें. शेजाऱ्यास जीं गुरें द्यावयाचीं होतीं त्यांपैकीं कांहीं, व कांहीं स्वतःचीं अशीं ढोरें जनलीं होतीं; द्यावयाच्या गुरांस काय झालें हें बायको सांगेना, पण त्यांनीं त्याचा पूर्ण तपास काढला. शेजाऱ्यास देऊं केलेलीं गुरें त्यांच्या वासरांसह—शिवाय दोन ज्यास्तच—त्यास दिलीं; या प्रमाणें घरांत काय व्यवस्था करावयाची होती ती त्यांनीं केली.

## ( १० )

**नाहीं देवापाशीं मोक्षाचें गांठोडें। आणूनी निराळें द्यावें हातीं ॥**

तुकाराम.

आजारी लोकांसाठीं म्हणून **विठ्ठलपंत** ज्या दिवशीं मागें राहिले, त्या सर्व दिवसभर **मुकुंदरावांनीं** त्यांची वाट पाहिली. **विठ्ठलपंतांनीं** आपणांस लवकर गांठावें म्हणून ते रेंगाळत रेंगाळत पुढें जाऊं लागले. पण **विठ्ठलपंत** त्यांना कसचें गांठतात? ते जर मागाहून येत असतील तर गांठतील. पण हें **मुकुंदरावास** कळणार कसें? ते कितीदां तरी चालतां चालतां मध्येंच मागें वळून **विठ्ठलपंत** येत आहेत कीं नाहींत हें डोळे तांणून थेट क्षितिजापर्यंत पहात. पण छेः. दिवस गेला, रात्र पडूं लागली तरी ते येण्याची कांहीं चिन्हें दिसेनात. त्यांनां वाटलें "कदाचित् ते माझ्या पुढें गेले असतील. मी एखाद्या झाडाखालीं बसलों असतां ते पुढें निघून गेले असावेत. पण छेः, ते मला पहातच

जात असतील. माझी जरी एकवेळ नजर चुकली तरी मी त्यांना दिसल्याशिवाय रहावा कसा? मी वारंवार मागें वळून पहातों, इतकी काळजी घेतों, मग ते पुढें जावे कसे? आतां काय करावें? त्यांना पहाण्यास मागें परतावें? पण समजा, ते पुढें गेलेच असले तर? ते पुढें पुढें जावे व मीं मागें मागें जावें! गांठ कांहीं कधीं पडावयास नको! मागें परतण्यापेक्षां पुढेंच जाणें चांगलें. आपण जरा सावकाश चालावें इतकेंच. असले मागें तर येऊन भेटतीलच. मागें जर असलेच तर आज रात्रीं भेट व्हावी असा तर्क आहे."

त्या रात्रीं त्यांचा मुक्काम एका खेडयांत झाला. त्यांनीं तेथील चौकीदारास **विठ्ठलपंताच्या** स्वरूपाचें वर्णन करून सांगितलें "अशा अशा तऱ्हेचा मनुष्य जर तुला भेटला तर त्याला मजकडे आण. मी **राममंदिरांत** उतरलों आहे." पण **विठ्ठलपंताचा** त्या रात्रींही पत्ता लागला नाहीं. तेथून **नाशिक** तीन मैल होतें. तेथें कदाचित् आपली भेट होईल असें त्यांना वाटलें. कारण त्यांनीं सांगितलें होतें 'आपल्याला **नाशकास** जावयाचें आहे.' पहावें, पुढें गेले असतील तर तेथें भेटावेत. हें **नाशकाचें** लचांड निवळ **विठ्ठलपंता**मुळें मागें लागलें. त्यांची सोबत रहावी, पुनः परिचयाचे ते, म्हणून हा खटाटोप करावयाचा. इतकें करून ते तेथें भेटोत म्हणजे मिळविली. या विचारानें **मुकुंदराव नाशकाला** गेले पण तेथेंही त्यांना त्यांचा पत्ता लागला नाहीं. मग त्यांनीं आल्यासारखें **रामाचें** दर्शन घेतलें व पुढें कूच केला.

आतां **विठ्ठलपंत** भेटण्याची त्यांना आशा नव्हती. कारण ते पुढें निघून जाण्याचा फार थोडा संभव होता. तथापि त्यांना वाटेंत जे कोणी भेटत त्यांना ते विचारीत. "असा असा **पंढरपुरास** जाणारा मनुष्य तुम्हाला भेटला काय?" पण **विठ्ठलपंत** पुढें गेलेच नव्हते तेव्हां 'हो पाहिला' असें त्यांना कोण उत्तर देणार? अर्थातच सर्वांकडून नकारार्थी उत्तरें येत, व मागाहूनही कांहीं ते येऊन मिळेनात, याचें **मुकुंदरावास** आश्चर्य वाटे.

वाटेंत सांगण्यासारखें कांहींच घडलें नाहीं. त्यांच्या मनांत घरचे विचार फार येत. त्याचें वर्णन मागें आलेंच आहे. त्यांना असें झालें

होतें कीं, आपण आतां घरीं केव्हां पोहोंचतों. तशांत विठ्ठलपंताचा सहवास गेल्यामुळें त्यांचें धैर्य बरेंच खचलें होतें.

याप्रमाणें प्रवास करीत करीत ते "बार्शी"स जाऊन पोहोंचले. येथून मात्र त्यांच्या यात्रेला खरा प्रारंभ झाला. त्यांना या गांवीं पंढरपुरास जाणाऱ्या मंडळीच्या झुंडीच्या झुंडी दृष्टीस पडल्या. त्यांत कित्येक भाविक वारकरी होते. कित्येक पुरुष व बाया नवस फेडण्यासाठीं जात होते. तेथील मंडळीचें तें निर्मळ अंतःकरणाचें वागणें पाहून संसारांत गढलेल्या मुकुंदरावासही आनंद झाला. याच गांवीं त्यांना एक यात्रेकरी भेटला. तो आज पंचवीस वर्षें वारी करीत होता. इतकेंच नव्हे तर, त्यानें रामेश्वर, बद्रिकेदारेश्वर, पुरी, वगैरे तीर्थें व स्थलेंही पाहिलीं होतीं. मुकुंदरावाला वाटलें ही सोबत आपणाला चांगली आहे. त्या वारकऱ्यानेंही मुकंदरावाचें म्हणणें मान्य केलें; व त्या दोघांनीं पंढरीस प्रयाण केलें.

---

(११)

चला पंढरीसी जाऊं । रखुमादेवीवरा पाहूं ॥ १ ॥
डोळे निवतील कान । मना तेथें समाधान ॥ २ ॥
संता महंता होतील भेटी । आनंदे नाचों वाळवंटी ॥ ३ ॥
तेथें तिर्थाचें माहेर । सर्व सुखाचें भांडार ॥ ४ ॥
जन्म नाहींरे आणीक । तुका म्हणे माझी भाक ॥ ५ ॥

वाचकहो, आतां आपणही पंढरपुर पाहूं. तें जसें जसें मुकुंदरावांनीं पाहिलें तसें तसेंच आपणास पहावयाचें आहे. मात्र प्रत्येक वाक्यांत मुकुंदरावांनीं अमूक पाहिलें, मुकुंदरावांनीं तमूक पाहिलें, अशी कंटाळवाणीं वाक्यें गाळण्याचा प्रयत्न केला आहे.

पंढरपुरास जातानां जिनें चंद्रकारानें पंढरपुरास वेढलें आहे अशी चंद्रभागा नदी लागते. त्या नदींत अनेक देवळें व समाधी आहेत. त्यांतच भगवद्भक्त पुंडलीक यांची समाध आहे. या समोर एक घाट आहे, तेथून विठोबाच्या मंदिराकडे रस्ता जातो. या रस्त्याचे दोहों बाजूस फुलें, बुका, उदबत्या इत्यादिकांचीं दुकानें असतात. लोक

हे जिन्नस **विठोबाला** वाहण्याकरितां नेतात. या रस्त्यानें गेलें असतां **पंढरीनाथाचें** देऊळ लागतें. या देवळांत जावयास बरेच दरवाजे आहेत. त्या पैकीं मुख्य दरवाजाचें नांव **नामदेव दरवाजा.** या दरवाजानें आंत जातांनां ज्या पायऱ्या लागतात त्यापैकीं पहिली पायरी पितळेची आहे. या ठिकाणीं **नामदेव** समाधिस्त झाले. या स्थळीं समाध घेण्याचें कारण हेंच कीं, **पंढरीनाथाचें** दर्शन घ्यावयास जो पुण्यवंत येतो, त्याचे चरण आपल्या मस्तकीं लागावे! पण लोक येथून जातांनां त्या पायरीवर मुळीं पायच देत नाहींत. या पायऱ्या चढून आंत गेले ह्मणजे **मुक्तिमंडप** लागतो. या मंडपावर नगारखाना आहे. या मंडपानंतर एक फारच मोठा चौक लागतो. हा चौक ओलांडला ह्मणजे एक लांकडी मंडप लागतो, येथें भोजन होत असतें. नंतर **बोधलेबुवांचा** रांजण, **बलभीमाची** मूर्ति वगैरे लागतात.

यानंतर एक पितळानें मढविलेला दरवाजा लागतो. यांतून शिरून आंत गेले ह्मणजे एक दगडी खांबाचा मोठा मंडप लागतो. या खांबा-पैकीं एक खांब रुप्यानें व सोन्यानें मढविलेला आहे. येथें गरूडाची एक मूर्ति आहे. या मंडपाचे एका बाजूस रुप्याचा दरवाजा आहे. यानंतर गाभारा लागतो. अहंकार गेल्याशिवाय परमेश्वराचें दर्शन होत नाहीं, हें दर्शविण्यासाठींच जणु या गाभाऱ्याचें द्वार लहान ठेविलें आहे. **कबीरानें** एकेठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, परमेश्वरप्राप्तीचा मार्ग अत्यंत अरुंद आहे. पण तोच नरकाला जावयाचा दरवाजा फार मोठा आहे! तेथें जाणें सोपें आहे! तेथें जाण्यास अडचण कशी ती पडतच नाहीं.

वाचकहो, याप्रमाणें **पंढरीनाथाच्या** देवळाचें वर्णन आहे. **विठोबाच्या** दर्शनास जावयाचा जो दरवाजा आहे तो लहान आहे. त्यांतून जावयास आपणास अजून अवकाश पाहिजे. अवंतर लोकांप्रमाणें आपणाला त्रास होणार नाहीं हें खरें, तथापि कांहीं वेळ वाट पाहिलेली बरी. आपण या दरवाजा-पाशीं जितक्या लवकर आलों तितकाच उशीर **मुकुंदरावास** यावयास लागला. **विठोबाच्या** दर्शनास जावयास कोण गर्दी! या गर्दीत कित्ये-कदां प्राणावर प्रसंग येतात. मग नेत्रास परमेश्वरदर्शन न होता जीवास होतें! **मुकुंदरावांनीं** आपली माया आपल्याबरोबरच आणली होती. त्यामुळें त्यांचा एक हात अंगरख्याचा खिसा सांभाळण्यांत व दुसरा फुलें,

बुक्का, नैवेद्य, यांत गुंतला होता. ही गर्दी पाहून त्यांना विलक्षण आश्चर्य वाटलें; व केव्हां एकदां तें 'सावळें मुख आवडीनें पाहीन' असें त्यांना झालें. त्यांना आपल्या मनाला जितकी गति देतां येत होती तितकी शरीरास कोठें देतां येत होती ? सर्वांचें नडतें तें येथेंच. मग काय करतात ? गरीब बिचारे **मुकुंदराव**, ते तेथेंच लोकांचे धक्के खात, खिशाकडे मधून मधून लक्ष देत उभे होते.

---

( १२ )

**जाऊनियां तीर्था काय तुवां केलें । चर्म प्रक्षाळिलें वरी वरी ॥ १ ॥**
**अंतरींचें शुद्ध कासयानें झालें । भूषण त्वां केलें आपणया ॥ २ ॥**
**वृंदावन फळ घोळिलें साकरा । भीतरील थारा मोडेचिना ॥ ३ ॥**
**तुका ह्मणे नाहीं शांति क्षमा दया । तोंवरी कासया फंदा तुह्मी॥४॥**

**पंढरीनाथाच्या** दर्शनास दांडी खालून जावें लागतें. या सोहाळ्यांतून **मुकुंदराव** गेले. त्यांच्या बरोबर तो वारकरी—**मुनीश्वरबुवा**—असल्यानें **मुकुंदरावास** त्रास बराच कमी झाला. **मुनीश्वरबुवा** नेहमीं मुकुंदारावापाशीं असत. त्या गर्दींत **बुवाचा** खिसा साफ कातरला गेला. त्यामुळें **मुकुंदराव** अधिकच चिंतातुर झाले. अशा स्थितींत त्यांना **तुकाराम महाराजांचा—**

**अभंग.**

**राजस सुकुमार मदनाचा पुतळा । रविशशिकाळा लोपलिया॥१॥**
**कस्तूरी मळवट चंदनाची उटी । रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ २ ॥**
**मुगुट कुंडलें श्रीमुख शोभलें । सुखाचें ओतलें सकळाही ॥ ३ ॥**
**कासे सोनसळा पांघरे पाटोळा । घननीळ सांवळा बाइयांनों ॥४॥**

**विठोबा** दिसला. त्याची मूर्ति दगडी चहुथऱ्यावर आहे. तिच्या भोंवतीं किती तरी दिवे लावले होते. **विठोबाची** मूर्ति दिसण्यांत ओबडधोबड आहे. ती मूर्ति पाहून **मुकुंदरावाला** कांहीं समाधान झालें नाहीं. त्यांना वाटलें इतका नावाजलेला **विठ्ठल** व त्याची ही मूर्ति ! छेः बुवा ! त्यांना वाटे, **विठ्ठलाचें** महत्त्व सारें मूर्तितच ! ज्याचें जसें मन त्याला

तसें दिसणार! **धर्माचें** मन चांगलें होतें त्याला सर्वच धार्मिक दिसत. **दुर्योधनाचें मन** पापी होतें, त्याला सारेच पापी दिसत. हा सारा मनाचा प्रभाव! आपलें मूल आपल्याला चांगलें दिसतें, याचें कारण मुलाचें सौंदर्य नसून त्याचे ठिकाणीं आपलें असलेलें प्रेम होय. **मुकुंदरावाचे** मन उदात्त नसल्यानें त्यांना ती काळ्या पाषाणाची मूर्ति ओबडधोबड दिसली, पण तीच **तुकाराम** महाराजांना सूर्यापेक्षांही तेजस्वी दिसली.

दांडी खालून जातांना **मुनीश्वरबुवा** बाहेर उभे होते, त्यांच्या हातांत **मुकुंदरावांनीं** आपली माया दिली. कारण आपले हात पूजेंत गुंतल्या-वर खिसा कोण चापसणार? **मुकुंदरावानीं** त्यांना आपली माया दिली खरी, पण त्यांचें सारें लक्ष त्या मायेंत! त्यांना वाटे हाही पळून जावा म्हणजे झालें हरि विठ्ठल! माये, तुझी माया अगम्य खरी! नाहीं तर इतके लांब आलेल्या **मुकुंदरावास** तुझा कांहीं तरी विसर पडता. पण तें व्हावें कसें? त्यांनीं घाईघाईनें कशी तरी पूजा आटपली. फुलें बुका वगैरे सर्व **विठोबाच्या** डोक्यावर ठेवलीं, व आपल्या जवळचा भार अमळ हलका केला. नंतर हात जोडून ते म्हणतात, "त्वमेव माताच, (इतक्यांत पैशाची आठवण होऊन मुनीश्वर बुवाकडे मागें पाहून) पिता त्वमेव; (देवाकडे पाहत) त्वमेव बंधुश्च, (मुनीश्वराकडे) सखा त्वमेव; (देवाकडे) त्वमेव विद्या, (मुनीश्वराकडे) द्रविणं त्वमेव; (देवाकडे) त्वमेव सर्व, (मुनी०) मम देवदेव". या प्रमाणें ह्मणून 'अच्युतं केशवं' करीत ते बाहेर आले. नंतर **मुनीश्वर**बुवांनीं त्यांचे रुपये त्यास परत दिले व ते दोघे तेथूनच **विठोबाकडे** पुनः पाहूं लागले. या वेळीं त्यांच्या पुढें अतोनात गर्दी असल्यानें त्यांना सर्वांच्या डोक्यावरून मूर्तीकडे पहावें लागे. याप्रमाणें पहात असतां, त्या दांडीपासच्या एका मनुष्याकडे **मुकुंदरावाचें** लक्ष वेधलें. ह्या गृहस्थानें आंगांत आंगरखा घातला होता. त्याची पाठ **मुकुंदरावाकडे** असल्यानें जरी त्याचें तोंड त्यास अर्धवट दिसे, तरी त्यावर दिव्य तेज झळकत असलेलें त्यास मधून मधून दिसे. त्याकडे पहात असतां **मुकुंदरावास** त्याचा बांधा हुबेहुब **विठ्ठलपंताप्रमाणें** दिसला. ते स्वगत विचार करतात. "तो गृहस्थ थेट **विठ्ठलपंताप्रमाणें** दिसतो! पण तो **विठ्ठलपंत** खास नव्हे. तो

माझ्या किती मागें राहिला, इतका कीं तो पुढें निघणें मुळींच संभवनीय दिसत नाहीं. मग या उपर तो, तोच असला तर हारे जाणें."

**मुकुंदरावाचें** वर दिलेले विचार जेव्हां सुरू झाले, त्या वेळीं त्या गृहस्थानें हात जोडून देवाची प्रार्थना केली. नंतर त्यानें मागें वळून पाहिलें तेव्हां **मुकुंदरावांस** त्याचा तोंडावळा स्पष्ट दिसला. तो दुसरा तिसरा कोणी नसून **विठलपंतच** अशी त्याची खात्री झाली!

आपला स्नेही आपणाला पुनः दिसला हें पाहून **मुकुंदरावास** फार आनंद झाला. तो आपल्या पुढें निघून कसा आला याचें त्यांनां फार आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, "त्याला वाटेंत कोणी तरी भेटलें असावें, व त्यानें यास जवळच्या रस्त्यांतून आणलें असावें. आतां आम्हीं बाहेर पडल्यावर एकत्र रहाणार, व **मुनीश्वरबोवांची** रजा घेणार. हो. कोणाला माहीत कसा गृहस्थ आहे तो? आतांच जाऊं का मी त्याचेकडे? पण नको. नाहीं तर या गर्दीतून खिसा कातरला जावयाचा! आपण कांहीं तिकडे जाऊं नये. ते येतीलच इकडे. तेथें थोडेच उभे रहातील? आपण त्यांच्याकडे नजर ठेवावी म्हणजे झालें."

असा विचार करून मुकुंदरावांनीं आपली दृष्टि सारखी त्या व्यक्तीकडे लाविली. इतक्यांत तेथें अतोनात गर्दी होऊं लागली. जसजशी गर्दी ज्यास्त तसतशी पैशाला भीति ज्यास्त. **मुनीश्वरबुवा** म्हणतात, "आतां येथें फार गर्दी होणार. आपण दर्शनही घेतलें आहे, तर चला घटकाभर बाहेर चलूं."

हें ऐकून **मुकुंदराव** म्हणाले, "चला बाहेरच बसूं." त्यांनीं असा विचार केला कीं, "आंतली मंडळी बाहेर येणारच. त्यांतून **विठ्ठलपंतही** येणार. ते आले कीं त्यांना गांठू." अशा विचारानें ते बाहेर पडले. तेथें त्यांनीं **विठ्ठलपंताची** चार तास वाट पाहिली. प्रत्येक मनुष्य बाहेर येतांना त्यांनीं पाहिला, पण त्यांत तेच तेवढे नव्हते. म्हणून **मुकुंदरावांनीं** पुनः आंत जाऊन पाहिलें तों **विठ्ठलपंताचा** ठिकाणा नाहीं. हें पाहून त्यांना अतोनात आश्चर्य वाटलें. पण करणार काय? ते तसेच आपल्या सोबत्यासह बिऱ्हाडीं आले.

दुसऱ्या दिवशीं ते दोघे **विठोबाचे** दर्शनास गेले. तेथें आदल्या-दिवसा प्रमाणेंच सर्व प्रकार घडले. कालच्या प्रमाणें **विठ्ठलपंत** आजही

**मुकुंदरावास** दिसले. त्यांनीं जेव्हां हात जोडून कालच्या प्रमाणें प्रार्थना करण्यास सुरवात केली तेव्हां **मुकुंदरावाचें** लक्ष मूर्तीकडे गेलें; तों काय चमत्कार सांगावा! ती हंसतमुख होत्साती कौतुकानें **विठ्ठलपंताकडे** पहात होती. तें पाहून **मुकुंदरावास** आश्चर्य वाटलें. **मुकुंदराव** स्वगत ह्मणतात "छे: वाटेल तें होवो आज आपण आपल्या स्नेह्यास भेटणारच." असें ह्मणून ते गर्दींतून पुढें होऊं लागले, पण त्यांना पुढें होऊं देतो कोण? त्यांची पुढें जाण्याची उत्कट इच्छा पाहून एका धटिंगणानें तर त्यांना मागेंच खेंचलें. मग करणार काय? त्यांना मागें रहावें लागलें. त्या दिवशींही **विठ्ठलपंताची** भेट झाली नाहीं. तिसऱ्या दिवशीं **मुकुंदरावानें** निराळाच विचार केला. ते उशीरां गेले. आजही त्यांना **विठ्ठलपंत** दिसले. **मुकुंदरावानें** बरीच धडपड करून दांडीकडे आपला शिरकाव करून घेतला, इतक्यांत त्यांच्या हातांतून एक पैसा पडला. तो मिळणें कांहीं शक्य नव्हतें, तथापि त्यांनीं वांकून पाहिलेंच. तो मिळत नाहीं हें पाहून त्यांच्या मनाला चुटपुट लागली. त्यांनीं पुनः **विठ्ठलपंताकडे** पाहिलें, तों ते तेथें नाहींत!

हा प्रकार पाहून **मुकुंदरावाची** अतिशयित निराशा झाली; पण त्याला कांहीं इलाज नव्हता. **मुनीश्वरबुवांनीं मुकुंदरावाचें** हृद्गत केव्हांच ओळखलें होतें, पण ते कांहीं बोलले नाहींत. इतक्या लांबून **पंढरीच्या** वारीस आलेला गृहस्थ, आणि त्यानें क्षणभरही मोहास रजा देऊं नये हें पाहून त्याला आश्चर्य वाटलें. त्याच्यानें राहवेना ह्मणून त्यानें **मुकुंदरावाची** कानउघाडणी करण्याचें मनांत आणिलें. तो त्यांना स्पष्ट असें कांहींच बोलला नाहीं. गोष्ट सांगण्याच्या मिषानें आपल्यास जे काय सांगावयाचें तें त्यानें सांगितलें. त्यानें **मुकुंदरावास** जी गोष्ट सांगितली, ती अत्यंत उपदेशपर असल्यानें व आमच्या एकंदर गोष्टीचें तात्पर्यही तेंच असल्यानें आह्मी ती गोष्ट सध्यां विषयांतर करून सांगतों. या विषयांतराबद्दल आम्हीं वाचकांची क्षमा मागतों.

**मुनीश्वरबोवा** ह्मणाले—

एकदां पुष्कळ साधु लोक तीर्थ यात्रेस निघाले. त्यांनीं **कबीरजीस** आपणाबरोबर तीर्थयात्रेस चलतां का, असा प्रश्न केला. तेव्हां **कबीर** त्यांना ह्मणतात "साधु हो—!

पद.

मोका का नूं ढूंढे बंदे मेतो तेरे पासमे।
ना मैं कोई क्रियाकर्ममें ना जोग संन्यासमें ॥ धृ० ॥
ना मैं योगी ना मैं पंडित ना काशी कैलासमें।
ना रहता मैं श्री द्वारका ना रहता जगन्नाथमें ॥ १ ॥
ना रहता मैं रामेसरमें ना रहता बद्रीनाथमें ॥
ना रहता मैं जंगल सहारा, मैं रहता विश्वासमें ॥ २ ॥
कहत कबीरा सुनो भाई साधो सबश्वासोके श्वासमें ॥
जो खोजे तो तुरत मिलूं मैं छनभरकी तल्लासमें ॥ ३ ॥

कोठें हो जा ईश्वर सर्वव्यापी आहे. तो ह्मणजे आपण समजत असलेल्या पवित्रस्थळींच असतो, अशांतला कांहीं भाग नाहीं. जों पर्यंत अंतर्यामीं भाव नाहीं, तों पर्यंत स्नानें करा, यज्ञ करा, दान द्या, पण त्यापासून कांहीं हित होणार नाहीं."

हा उपदेश त्या लोकांस मानवला नाहीं. त्यांनीं यात्रेस जाण्याचा आपला हट्ट कायम ठेवला. तेव्हां कबीरांनीं त्यांना एक तुंबडी देऊन विनंती केली कीं, "आपण सर्व लोक यात्रेस जातच आहांत, तर या माझ्या तुंबडीस प्रत्येक पवित्रस्थळीं स्नानें घाला व देवदर्शन करवा. असें करण्यास विसरूं मात्र नका."

त्या लोकांनीं कबीर महाराजांचें ह्मणणें मान्य केलें व ती तुंबडी बरोबर घेतली. नंतर तो सर्व घोळका तीर्थाटणास निघाला. कांहीं महिन्यांनीं त्यांनीं तीर्थ यात्रा उरकल्या, देवदर्शनें केलीं, आणि ते सर्व लोक पुन: काशीस आले. त्यांनीं कबीर महाराजांची भेट घेतली. कुशल प्रश्न झाल्यानंतर महाराजांनीं त्या संतांना प्रश्न केला—"आपण माझ्या तुंबडीस दवदर्शनें व स्नानें करविलींच असतील ?"

या प्रश्नावर सर्वांनीं संमती दर्शक माना डोलविल्या व ती तुंबडी महाराजांच्या समोर ठेविली. ती त्यांनीं फोडली व तींतील गीर, प्रसाद ह्मणून सर्वांस वांटून दिला. महाराजांचा प्रसाद ह्मणून आनंदानें सर्वांनीं तो तोंडांत टाकला. पण ती तुंबडी कडु असल्यानें सर्वांनीं आपली

तोंडें वेडींवाकडीं केलीं. महाराजांचा प्रसाद तो! थुंकता येईना! बरें पोटांत सारावा, तर कडु! अशी त्यांची चमत्कारिक स्थिति झाली.

महाराजांच्या नजरेस ही त्यांची सर्व धांदल आली. त्यांनीं त्यांस तोंडें वेंगाडण्याचें कारण विचारलें. तेव्हां सर्वांनीं एक मतानें सांगितलें कीं, "महाराज, आपण दिलेला हा प्रसाद खरा, पण तो कडु कडु जहर आहे."

**कबीरानें** हा प्रकार जाणूनबुजूनच केल्यामुळें त्या लोकांचें आपल्या प्रश्नावर काय उत्तर येणार, हें त्यांनीं आधींच ताडलें होतें. त्यांचें तें अपेक्षित उत्तर ऐकून **कबीर** ह्मणतात; "तुह्मांला मी जाणूनबुजून कडु आल दिल्यानें असा प्रकार झाला. तुह्मी तिला पुष्कळ स्नानें घातलींत, देवदर्शनेंही करविलींत; पण या वरवरच्या स्नानांनीं व दर्शनानीं तिचा कडुपणा गेला नाहीं. कारण बाह्योपचारांनीं अंतरंग कधींही पालटत नाहीं. ह्मणून चित्त पहिलें शुद्ध करा. त्या शिवाय सर्व खटाटोप व्यर्थ आहे."

असा उपदेश करून **कबीरजींनीं** एक पद ह्मटलें—

**पद.**

**तीरथ कोन करे हमारे तीरथ कोन करे ॥ धृ० ॥**
**मनमें गंगा मनमें काशी मनमें स्नान करे ॥ १ ॥**
**मनमें आसन मनमें कडासन मनमें मौन धरे ॥ २ ॥**
**मनमें माला मनमें मुद्रा मनमें ध्यान धर ॥ ३ ॥**
**कहत कबीरा सुनो भाई साधो भटकत कोन फिरे ॥ ४ ॥**

**मुनीश्वरबुवांची** ही गोष्ट ऐकून **मुकुंदराव** मनांत वरमले. त्यांना तिचा भावार्थ चांगलाच कळला. **पंढरपुरच्या** वारकऱ्यांचा वागण्याचा प्रकार, व त्यांचा प्रेमळपणा पाहून **मुकुंदरावाचे** मनावर बराच परिणाम झाला होता. किती झालें तरी तो मनुष्य होता. त्याचा **मुनीश्वरबुवासंबंधीं** चांगला ग्रह झाला. त्यांना त्याचे वर्तनांत नांव ठेवण्यास कोठेंच जागा नव्हती.

यानंतर **मुकुंदराव** तेथें बरेंच दिवस राहिले. त्यांनीं सर्व **पंढरपूर** पाहिलें. आतां त्यांना **विठोबा** पूर्वीसारखा ओबडधोबड दिसेना. त्यांनीं

**तुकाराम** महाराजांचें **देहु**, **ज्ञानेश्वर** महाराजांची **आळंदी**, वगैरे सर्व स्थळें पाहिलीं. ह्या पवित्र स्थळींच्या ज्या ज्या वस्तु नेण्याजोग्या होत्या, त्या त्या त्यांनीं घेतल्या. नंतर एक शुभ दिवस पाहून ते आपल्या गांवाकडे जावयास निघाले.

(१३)

कां रे नाठविसी कृपाळु देवासी । पोसितो जनासी एकला तो ॥१॥
बाळा दुध कोण करितें उत्पत्ति । वाढवी श्रीपति सवें दोन्ही ॥ २ ॥
फुटती तरुवर उष्णकाळ मासीं । जीवन तयांसी कोण घाली ॥ ३ ॥
तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहें त्या अनंता आठवूनि ॥४॥
तुका ह्मणे ज्याचें नाम विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करी ॥ ५ ॥

**मुकुंदराव** ज्या वाटेनें **पंढरपुरास** आले होते, त्याच वाटेनें ते परत जाऊं लागले. आतां त्यांना पुनः घरची काळजी लागली. " कोणचेंही काम उभारावयाचें ह्मणजे त्याप्रीत्यर्थ सबंध आयुष्य खर्च करावें लागतें. पण तेंच त्या कामाचा नाश करावयाचा असला, ह्मणजे अवघी घटका पुरी होते. मग मला तर घर सोडून किती महिने झाले. या अवधींत घराची राखरांगोळी झाली असल्यास काय नवल ? " असा विचार करीत ते चालले होते.

**विठ्ठलपंतांची** आणि **मुकुंदरावांची** ज्या प्रांतांत ताटातूट झाली होती, तो प्रांत आतां त्यांना लागला. पाऊस वगैरे चांगला पडत असल्यानें शेतें चहूंकडे हिरवींगार दिसत होतीं. मागें जेथें आपण मूर्तिमंत भिकार पहात होतों, तो हाच का प्रांत, अशी **मुकुंदरावास** क्षणभर भ्रांत पडली; पण ती लवकरच दूर झाली. पूर्वीं, लोक येथें भुकेनें पटापट मरत असतांना दिसत होते, पण आतां चोहोंकडे आबादी आबाद दिसत होतें. हीं शेतें पाहून त्यांना आपल्या शेताचें स्मरण होणें स्वाभाविकच होतें. ' हे शेतकरी जशी शेतांत मेहनत करीत आहेत, तशी मेहनत आपला मुलगा करीत असेल काय ' हा विचार त्यांच्या मनांत वारंवार घोळे.

कांहीं दिवसांनीं **मुकुंदराव** एका खेड्यांत आले. याच ठिकाणीं त्यांची आणि **विठ्ठलपंतांची** फाटाफूट झाली होती. ते जेव्हां **लछमनजीच्या** झोपडीवरून जाऊं लागले, तेव्हां त्याचा मुलगा बाहेरच उभा होता. तो **मुकुंदरावाकडे** धांवत आला व त्यांना ह्मणाला, "दादा, तुम्ही उन्हानें थकून आला आहांत. आतां पुढें कोठें जातां येथेंच उतरा."

**मुकुंदरावाचे** मनांत घरचे विचार फार घोळत असल्यानें त्यांना तेथें थांबावेंसें वाटेना. पण तो मुलगा कांहीं त्यांचा हात सोडीना. इतक्यांत **लछमनजीची** आईही आली. तिनेंही त्यांना राहण्याचा सारखा आग्रह सुरू केला. तेव्हां **मुकुंदरावाचा** नाइलाज होऊन ते तेथें राहण्यास तयार झाले. ती झोंपडी पाहून त्यांना वाटलें " आपण जेथें **विठ्ठलपंतास** सोडलें, तीच ही झोंपडी दिसते. याच ठिकाणीं ते पाणी प्यावयास येणार होते. मग, त्यांची येथें कांहीं विचारपूस करावी काय?"

**मुकुंदराव** आंत जातांच त्या म्हातारीनें त्यांच्या हातांतली पडशी घेतली व खालीं ठेविली. त्यांना दुध प्यावयास आणिलें. याप्रमाणें ते लोक त्यांचा पाहुणचार करूं लागले. आपल्या आगत-स्वागताचा प्रकार पाहून **मुकुंदरावास** आश्चर्य व आनंद वाटला. त्यांनीं आजन्म असें स्वागत कोणाचेंच केलें नव्हतें. या स्वागताबद्दल त्यांनीं त्या म्हातारीजवळ प्रशंसापर उद्गार काढले. तेव्हां ती म्हणाली, " महाराज! आपल्यासारख्या येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांचे स्वागत करावयास तसेंच कांहीं कारण झालें आहे."

**मुकुंदराव** विचारतात, " तें कोणतें बाई ?"

" सांगतें ऐका. कांहीं महिन्यांपूर्वीं येथें एक प्रवासी आला होता, त्यानें आम्हांला हें सर्व शिकविलें. इतके दिवस आम्हीं स्वार्थातच मग्न होतों, व त्या **रामजीस** आम्हीं विसरलों होतों. त्यानें आमची सर्व प्रकारें काळजी घेतली, अन्न अन्न करून मरत होतों तेव्हां एक देवदूतही त्यानें पाठविला; त्यापूर्वीं आम्हीं त्या **रामजीचें** कधींही स्मरण केलें नव्हतें. पण त्या देव मनुष्यानें कसें वागावें हें आम्हाला शिकविलें."

आतां **मुकुंदरावाची** खात्री झाली कीं, आपण समजत होतो तीच ही झोपडी. त्यांनीं **विठ्ठलपंताच्या** खाणाखुणा विचारल्या.

त्यांचीं उत्तरें त्या म्हातार्‍याबाईनें दिलीं. त्यावरून त्यांची खात्री झाली कीं, ते **विठ्ठलपंत** असावेत. ती म्हातारी म्हणाली, " **रामजीस** आम्हीं विसरलों म्हणून आमची अशी दशा झाली, कीं खावयास मिळेना; उपास पडूं लागले; अशा स्थितींत आम्हांस मरणच आलें असतें, पण तो गृहस्थ **रामजीनें** पाठविला. त्यानें आम्हांला वांचविलें. त्यानें आम्हांला खावयाचें सामान; झालें, शेत नांगरावयास बैल; व गाडी वगैरे दिलें. आमची जमीन मिळत नव्हती तीही त्यानें सावकारास सारा भरून मिळवून दिली. "

इतक्यांत **लछमनजी** बाहेरून आला. त्यानें शेवटल्या वाक्यावरून काय प्रकार आहे तें ताडलें; व आपणही बोलूं लागला, " महाराज, तो आम्हां सर्वांवर सारखीच ममता करीत असे. त्याचा स्वभाव काय सांगावा ? गर्व कसा तो त्याला ठाऊकच नव्हता. तो जातांना नांव तरी सांगून गेला का ? मुळींच नाहीं. आपण कोण, कोठचे, याचा त्यानें मुळीं मागमूसही लागूं दिला नाहीं. मला त्याचें नांव गांव ठाऊक नाहीं म्हणून मी नुसतें म्हणतों, '**रामजी** त्याचें कल्याण करो.' **रामजीला** तो चांगला ठाऊक आहे. त्या वेळचें स्मरण झालें, कीं तो देखावा कसा डोळ्यांसमोर उभा राहतो. त्या तेथें मी उंबरठ्यास अडखळून पडलों, तो त्या तेथें उभा होता, तेथें त्याची पडशी ठेविली होती. पहिल्या प्रथम तो पाणी मागावयास आला काय, आणि नंतर तो आमच्याशीं वागला काय ? सर्व **रामजींचे** खेळ आहेत !"

यानंतर म्हातारी म्हणते, "तो जेव्हां पाण्यासंबंधीं विचारपूस करूं लागला, तेव्हां या पापिणीनें कपाळास आठ्या घातल्यान् ! काय हा नतद्रष्टपणा ! त्याला आमची स्थिति कळली मात्र, त्यानें खांद्यावरची पडशी त्या ठिकाणीं टाकली व तींतून सत्तू काढले."

इतक्यांत ती मुलगी म्हणाली, " नाहीं ग येथें नाहीं कांहीं, तर येथें अंधारांत त्यानें पडशी टाकिली. मी अंधारांत होतें पण मला चांगलें दिसत होतें."

यानंतर ते पाठीमागील एक एक गोष्ट आठवीत **मुकुंदरावास** सांगूं लागले. **मुकुंदराव** आले तेव्हां सायंकाळ झाली होतीच, आतां रात्र झाली. **लछमनजीनें मुकुंदरावाची** सर्व व्यवस्था लावून दिली.

रात्रीं तो त्यांच्यापाशीं बोलत बसला होता. तो ह्मणाला, " महाराज, आम्ही **रामजीचें** स्मरण करीत नव्हतों. विपत्ती आली तसें आम्हीं त्याला शिव्या देऊं लागलों. आम्हांला वाटे ईश्वर फारच वाईट आहे, व मनुष्य तर फारच नीच आहेत. पण आम्हाला त्या प्रवाशानें आपल्या आचरणानें शिकविलें कीं, 'चांगुलपणा मनुष्यांत आहे. आपण चांगलें वागलों तर जग चांगलें वागतें. आपण भले तर लोक भले. तसेंच **रामजी** दयाळू आहे. तो बुद्धि देईल त्याप्रमाणें वागावें.' देव त्याचें भलें करो! आम्ही पशु होतों. त्यानें आम्हाला माणुसकी शिकविली. "

कांहीं वेळानें **लछमनजी** उठून गेला व **मुकुंदराव** लवंडले. दिवसभर प्रवास करून थकलेले, पण त्यांना झोंप कांहीं येईना. त्यांच्या डोक्यांतून **विठ्ठलपंत** जाईनात. आपण त्यांना **पंढरीनाथा**पाशीं कसें पाहिलें हें त्यांना वारंवार आठवे. ते स्वगत म्हणाले, " एकूण या रीतीनें त्यानें पुढें मजल मारली म्हणावयाची. बरोबरच आहे ' ज्याचें जया ध्यान। तेंचि होय त्याचें मन ॥ ' हें **तुकाराम**महाराजांचें म्हणणें खोटें थोडेंच होणार ? त्यांना **पंढरीनाथाचें** वेडच होतें. मला संसाराचें होतें; मग माझी स्थिति त्यांच्यापेक्षां निराळी कां नसावी ? जशी करणी तसें फळ. ' बीज पेरूनीया तेंचि घ्यावें फळ । डोरलीस केळ कैचें लागे ॥ ' याप्रमाणें आहे. या मनाला आवरलें पाहिजे. त्याला **पांडुरंगाचे** चरणीं लावल्याशिवाय **पांडुरंग** कां दिसावा ? मी प्रत्यक्ष **पंढरी** पाहिली पण,—

**कां माझे पंढरी न देखती डोळे ।**
**काय हें न कळे पाप त्यांचें ॥ १ ॥**
**कां हें पायांवरी न पडे मस्तक ।**
**क्षेम कां हस्तक न पवती ॥ २ ॥**
**तुका ह्मणे कंइ जाऊनि मोटळें ।**
**पडेन हा लोळे महाद्वारीं ॥ ३ ॥ "**

दुसऱ्या दिवशीं **मुकुंदरावांनीं** तेथून आपला तळ हालविला. जातांना **लछमनजीनें** त्यांना पुढील प्रवासासाठीं अन्नसामुग्री बांधून दिली हें सांगावयास नकोच.

(१४)

आपुलियाबळें नाहीं मी बोलत । सखा भगवंत वाचा त्याची ॥१॥
साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी । शिकविता धणी वेगळाची ॥२॥
काय म्या पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥३॥
तुका ह्मणे त्याची कोण जाणे कळा । वागवी पांगळा पायांविण ॥४॥

ह्याप्रमाणें प्रवास करीत करीत **मुकुंदराव** एकदांचे घरीं आले. त्यांना वाटलें, आपण सांगितल्याप्रमाणें मुलगा घरीं काम करीत बसला असेल; पण तो त्या वेळीं बाहेर गेला होता. घरांतही कांहीं व्यवस्थित प्रकार दिसेनात. इतक्यांत मुलगा कोठें बाहेर उधळला होता तो आला. तो भांगेच्या तारेंत होता. **मुकुंदराव** त्याला निरनिराळे प्रश्न विचारूं लागले, पण त्याच्या उत्तरांत कशाचा मेळ कशाशीं लागेना. हें पाहून त्यांना वाटलें कीं, मुलानें आपल्या मागें चांगलेच गूण उधळले असावेत. त्यानें पैशाचा दुरुपयोग केला, व प्रत्येक कामाकडे दुर्लक्ष केलें, हें पाहून वडिलांना संताप येणें सहाजीकच होतें. ते त्याची खरडपट्टी काढूं लागले, व मुलानें ही दुरुत्तरें देण्यास सुरवात केली. तो ह्मणाला " आह्मांला जर काडीची अक्कल नव्हती तर तुह्मी घरींच रहावयाचें होतें. बाहेर कशाला गेलांत ? आपण सर्व पैसा बरोबर नेला, आणि आतां मला ह्मणतात कीं सर्व पैसा मातींत टाकला ? कोणीं मातींत पैसा टाकला कोणाला ठाऊक?."

**मुकुंदरावाला** असलीं उत्तरें ऐकून घेण्याची संवय नव्हती. त्यांना या उद्धट उत्तरामुळें आणखीच राग आला. त्या भरांत त्यांनीं मुलाला कांपऱ्या हातानें एक चपराक दिली. मुलानें हातच उचलावयाचा ठेविला होता, बाकी उत्तरें देण्यांत सुळींच मागें घेतलें नाहीं.

इतक्यांत **विठ्ठलपंताची** बायको तेथें आली. तिला पाहतांच **मुकुंदरावांनीं** आपला हात मागें घेतला व चिरंजीवांनींही पलायन केलें. ती त्यांना विचारते " कसं काय भाऊजी, आपण **पंढरीची** यात्रा करून आलात ?

" होय. **पांडुरंगाच्या** कृपेनें सर्व यात्रा सुरळीत झाली. माझी आणि **विठ्ठलपंताची** वाटेंतच चुकामूक झाली. मग कांहीं ते पुढें आलेले दिसले नाहींत. मी असें ऐकिलें कीं, ते घरीं परत आले ? "

" होय. ते परत येऊन बरेच दिवस लोटले. त्यांच्या वांचून आम्हांला कसें तें करमत नसे. पांडुरंगानें त्यांना येण्याची बुद्धि दिली हेंच बरें झालें. खरें पाहिलें तर त्यांनीं कुठें बाहेर जाऊं नये. हे का त्यांचें बाहेर जाण्याचे दिवस ! आतां वृद्धापकाळ असल्यानें त्यांना यातायात कशी ती सहन होत नाहीं. तरी घरीं कांहीं स्वस्थ बसत नाहींत. घरांतला बहुतेक कारभार तेच करितात. घरीं असले ह्मणजे सर्व घर आनंदानें कसें गजबजून जातें. माझ्या तान्हुल्यांना त्यांच्या शिवाय करमतच नसे. आम्हां सर्वांनांच त्यांचा फार लळा आहे. त्यांना दुःख होऊं नये, त्रास पडूं नये, म्हणून आह्मीं सर्वच त्यांना जपत असतों. "

" ते घरीं आहेत काय ? "

होय. ते घरींच आहेत. या वेळीं ते मळ्यांत असतील. रोज कांहींना कांहीं तरी काम करीतच असतात. निदान जानव्याचें सूत तरी काढीत बसतात. यंदा शेताचें उत्पन्न, गाईचे दुभतें वगैरे सर्वच चांगलें चाललें आहे. घरांत म्हणतात कीं, असें वर्ष कधींच आलें नाहीं. पंढरीनाथाची कृपा आहे. ते ह्मणतात, 'पांडुरंग आपली भक्ति पाहून सर्व कांहीं देतो. आपल्या हातीं कांहीं नाहीं.' असो. तुह्मीं कांहीं यात्रेचा प्रसाद आणलाच असेल ? "

यावर मुकुंदराव कांहीं उत्तर देणार, तोंच विठ्ठलपंत तेथें आले. विठोबाच्या समोर हात जोडून प्रार्थना करीत असतां, त्यांच्या आंगांत मुकुंदरावाला जो आंगरखा दिसला, तोच यावेळींही त्यांच्या आंगांत होता; व तेंच तेज यावेळीं त्यांच्या मुखावर झळकत होतें. एकूण पंढरीनाथासमोर जी मूर्ति दिसली ती हीच होती असें त्यांनीं ओळखलें. आपल्या नवऱ्याला पाहतांच मुकुंदरावाची बायको ह्मणाली " पाहिलें का, भाऊजी आले. "

हें ऐकून विठ्ठलपंतानें आपल्या स्नेह्याकडे सप्रेम दृष्टीनें पाहिलें व ते त्याला कडकडून भेटले. नंतर ते त्याला विचारतात—

" कसें काय ? यात्रेहून तर सुखरूप आलात ना ? "

" होय. आलों पण..."

" आतां पण कोठें राहिलें ? पंढरिनाथाचें दर्शन..."

" झालें. पण तें डोळ्यांना. माझे पाय तेथें चालत गेले खरें, पण माझा नवस देवानें स्वीकारिला कीं नाहीं कोण जाणें ?."

" न स्वीकारावयास काय झालें ? "

" माझा देह तेथें गेला होता; पण जीव सर्व मागेंच राहिला होता. माझें सर्वच उलट. माझी सेवा देवाला रुचली कीं नाहीं, कोण जाणें ? पण तुमची सेवा..."

" त्यांत मी कांहीं केलें नाहीं. आपण पामर-जन कांहीं एक करूं शकत नाहीं. अहो हे त्या **विश्वंभराचे** सर्व खेळ आहेत. **मुकुंदराव**, ही सर्व त्या **पंढरीनाथाची** लीला आहे. तो दुसऱ्याला निमित्त मात्र पुढें करतो व आपण मागें रहातो. तो बुद्धिदाता आहे. आपण आपल्या बुद्धीनें कांहींहीं करूं शकत नाहीं. तो जेव्हां बुद्धि देतो, तेव्हां मात्र आपण त्याप्रमाणें वागलें पाहिजे. "

" मी यात्रेहून परत येतांना वाटेंत एका गावांत उतरलों होतों. मी ज्याचें घरीं उतरलों त्याचें नांव **लछ**..."

**विठ्ठलपंतानीं** हे तेथें उतरले असावे हें 'तुमची सेवा देवानें स्वीकारली.' या **मुकुंदरावाच्या** वाक्यावरून ताडलें होतें, व त्यावरूनच त्यांनीं वरील उत्तरही दिलें. तरी ते तोच विषय पुढें काढूं लागले; हें पाहून ते दचकले. ते घाइघाईनें ह्मणतात, " अहो आपण पामरानें काय करावें ? ही सर्व त्या **विश्वंभराची** लीला आहे. असो. ( विषय बदलविण्याच्या उद्देशानें ) **पांडुरंगाचा** प्रसाद आणा. उद्यां माझ्याकडे जेवावयासही या. आज वहिनी कदाचित् येऊं देणार नाहींत."

हें भाषण ऐकून **मुकुंदरावांनीं** एक श्वास टाकला. त्यांनीं **लछमन-जीच्या** येथें जें ऐकलें त्याविषयीं, व **पंढरीनाथाचे** शेजारीं **विठ्ठलपंताला** पाहिलें त्याविषयीं, ते कांहींच बोलले नाहीं.

---

( १५ )

**जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें ॥ ३ ॥**
**भूतांची दया हे भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ॥ ४ ॥**
**तुका ह्मणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसे ॥ ५ ॥**

संतपण वारी करण्यांत नाहीं, व देवाला मी अमूक करीन, तमूक करीन असें नवस करणें; किंवा नुसती फुलें वहाणें हें ध्यान नाहीं. यांत पुण्य नाहीं. सर्व अंतःकरणाला पटलें पाहिजे; मनापासून केलें पाहिजे. देवाची खरी सेवा म्हणजे सर्व भूतीं दया व समभाव असणें हीच होय, हेंच नवस पाळणें होय व हेंच संतपण होय. तो बुद्धि देईल त्याप्रमाणें आपण वागलें पाहिजे. मोह, अहंकार इत्यादि शत्रु जें सांगतील त्यांकडे दुर्लक्ष केलें पाहिजे. **मुकुंदरावाचें** पूर्वीचें वेड गेलें. ते आतां बाह्योपचारास फाटा देण्याचा प्रयत्न करूं लागले. "आपपर विचार" त्यांनीं सोडला. कारण हा अधम जनांचा "अधमाचार" आहे. "उत्तम पुरुषाचा" "विश्वकुटुंब आपुलें" हा जो निर्धार, तो ते आचरणांत आणूं लागले. ते **पंढरीहून** आल्यापासून '**पांडुरंग महात्म्य**' नित्य वाचीत. त्यांतील तिसऱ्या अध्यायांतील

**सर्व भूतीं समदया ॥ अन्नदान घडे जया ॥**
**घरीं तीर्थे त्याचीया ॥ विसाविया येतील ॥ ७७ ॥**

ही ओवी ते नित्य ह्मणत; इतकेंच नव्हे तर ते त्याप्रमाणें वागून लवकरच 'तीर्थराज' झाले.

# अवघें देखें जन ब्रह्मरूप.

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥ अ० ६।६२

श्रीमद्भगवद्गीता.

**वैदर्भ** देशाचा राजा जो **प्रतापादित्य** ह्यानें आपला शत्रु जो **कांतिवर्मा** याचा प्रदेश पादाक्रान्त केला; व सर्व देश उध्वस्त करून लाखों लोक राजासकट कैद केले. त्यापैकीं त्यानें पुष्कळांची कत्तल केली, कांहींचीं डोकीं उडविलीं, कांहींना सुळावर दिलें व खुद्द **कांतिवर्म्याला** एका मोठ्या लोखंडाच्या पिंजऱ्यांत कोंडून ठेविलें.

रात्रीची वेळ. पण पौर्णिमेचा **चंद्र** असल्यामुळें चांदणें कसें पिठासारखें स्वच्छ पडलें होतें. अशावेळीं, राजा **प्रतापादित्य** हा आपल्या बागेंत एका विस्तीर्ण संगमरवरी कारंजाजवळ, हस्तिदंती आसनावर आनंदानें बसला होता. त्यावेळीं त्याचें लक्ष त्या उडत असलेल्या कारंजाकडे नसून, **कांतिवर्म्याचा** प्राण कोणत्या रितीनें घ्यावयाचा, इकडे वेधलें होतें. बराच वेळ झाला पण त्याचा निश्चय कांहीं होईना.

अशा विचारांत तो बसला असतां, त्याच्या सन्निध सरसर असा ध्वनि झाला. त्यामुळें त्याचें लक्ष त्याकडे गेलें, व ज्या दिशेनें तो ध्वनि येत होता, त्या दिशेकडे त्यानें पाहिलें. तों झाडींच्या गर्द राईतून एक पांढऱ्या शुभ्र दाढीचा तपस्वी आपल्याकडे येत आहे, असें त्याला दिसलें. त्यानें पायांपर्यंत लोळणारी कफनी आंगांत घातली होती; त्याच्या जटा पिंगट होत्या, व त्याच्या हातांत एक कमंडलु होता. त्याची मुद्रा सतेज असून फार गंभीर होती. तो तपस्वी हळुहळु **प्रतापादित्याजवळ** आला; व त्यानें एकदम बोलावयास प्रारंभ केला. तो ह्मणाला—

"राजा, तूं **कांतिवर्म्याचा** प्राण घेऊं इच्छितोस ?"

"होय" राजानें उत्तर केलें. "पण त्याचा प्राण कोणत्या रितीनें घ्यावयाचा हें अजून निश्चित झालें नाहीं. तें निश्चित झालें, कीं त्याचा प्राण गेलाच !"

" पण तूं स्वतःच **कांतिवर्मा** आहेस. " तो वृद्ध ह्मणाला.

" छत्. हें मुळींच खरें नाहीं. **कांतिवर्मा** तो **कांतिवर्मा**, आणि राजा **प्रतापादित्य** तो राजा **प्रतापादित्य**. मग **कांतिवर्मा** आणि राजा **प्रतापादित्य** हे एक कसे ? " राजा ह्मणाला.

" तूं आणि **कांतिवर्मा** हे दोघेही एकच आहांत. आपण **कांतिवर्मा** नव्होंत व **कांतिवर्मा** ह्मणजे आपण नव्होंत, हें जें तुला वाटतें तें निवळ भ्रमामुळें. पण वास्तविक पाहिलें असतां तुम्ही दोघेही एकच आहांत."

" महाराज, या आपल्या ह्मणण्याचा अर्थ तरी काय ? मी **प्रतापादित्य** तर आनंदानें सुखोपभोग घेत या आसनावर स्वस्थ चित्तानें बसलों आहे. या देहाला, चिंता ह्मणजे काय पदार्थ आहे, हें स्वप्नांतही ठाऊक नाहीं; मग जागेपणीं तर लांबच राहिलें. माझ्या शुश्रूषेस हजारों दास-दासी आहेत, माझी आज्ञा झेलावयास अगणित सेवक सदैव तत्पर असतात. मला आज जो आनंद होत आहे, तोच उद्यांही होईल. पण उलटपक्षीं **कांतिवर्म्याची** स्थिति पहा बरें ? तो एका भक्कम पिंजऱ्यांत मृत्यूच्या विवंचनेंत तळमळत पडला असेल. मी त्याचा उद्यां शिरच्छेद करीन, जीभ कापीन, काय वाटेल तें करीन. कारण तें करण्यास मी समर्थ आहे. असें असतां, तो आणि मी एक आहोंत असें आपण ह्मणतां ! या आपल्या ह्मणण्याचा अर्थ तरी काय ? "

" राजा, तुला त्याचा **प्राण** घेतां येणार नाहीं." तो वृद्ध ह्मणाला.

" कां बरें ? त्याच्या सैन्यांतील चौदा सहस्र लोकांस मी यमसदनास पाठविलें तें ? आजपर्यंत त्याच्या लोकांचा संहार करून मी त्यांच्या प्रेतांचा एक पर्वत केला आहे ! ते मेले, मी जीवंत आहे. यावरून मी त्याचा प्राण घेऊं शकेन किंवा नाहीं, ही शंका घेण्याचें मुळीं प्रयोजनच नाहीं. "

" त्याचे लोक मृत झाले; ते आतां जीवंत नाहींत; हें तूं कशावरून ह्मणतोस ? " त्या वृद्धानें प्रश्न केला.

" कशावरून ह्मणजे ? त्यांच्या प्रेतांचा ढीग पहा ! त्यावरून ह कळेल. ते आतां पुनः दृष्टीस पडणार नाहींत. या सर्वांत सांगण्याजोगें ह्मणजे, त्या लोकांचा छळ झाला; पण त्यामुळें माझ्या सुखांत रतीभरही

अंतर पडलें नाहीं. हें त्यांचें दुर्दैव व माझें सुदैव होय." राजा अभिमानपूर्वक ह्मणाला.

"राजा, हा सुद्धां तुला भ्रम आहे. ही घोर कृत्यें करण्यांत तूं आपला स्वत:चाच घात करून घेतला आहेस; त्यांचा नव्हे."

"आपल्या भाषणापासून मला कांहीं बोध झाला नाहीं."

"त्यापासून बोध व्हावा अशी तुझी इच्छा आहे काय ?"

"होय आहे." राजा जिज्ञासेनें ह्मणाला.

"तर या कारंजाजवळ चल." असें ह्मणून त्यानें जवळच्या कारंजाकडे बोट केलें. राजानें त्याला रुकार दिला; व ते दोघे त्या कारंजाकडे गेले. कारंजाजवळ पोहोंचतांच तो वृद्ध ह्मणाला. "यांत उतर पाहूं."

राजानें त्यानें सांगितल्याप्रमाणें केलें. त्या वृद्ध तपस्व्यानें आपला कमंडलु पाण्यानें भरून घेतला, आणि तो राजाला ह्मणाला "मी तुझ्या डोक्यावर या पाण्याची धार धरतांच पाण्यांत बुडी मार." असें ह्मणून त्यानें कमंडलु उचलिला, व राजानेंही पाण्यांत बुडी घेतली.

राजानें बुडी मारतांच त्याला वाटलें आपलें रूप रंग इत्यादि सर्व कांहीं पालटत आहे. आतां आपण प्रतापादित्य नसून दुसरेच कोणी आहोंत, असें त्याला वाटूं लागलें. 'आपण दुसरें कोणी आहोंत' असा विचार त्याच्या मनांत येतांच त्याला आढळून आलें कीं, आपण एका मृदु शय्येवर पहुडलों असून जवळ एक सुस्वरूप युवती बसली आहे. त्यानें तिला पूर्वी कधीं पाहिलें नव्हतें. तथापि त्यानें अनुमान बांधिलें कीं, ही स्त्री आपली—या नवीन पुरुषाची—पत्नी असावी. तो जागा झालेला पहातांच ती स्त्री उभी राहिली व म्हणाली "महाराज, कालच्या अविश्रांत श्रमानें आपण श्रांत जाहलां होतां, म्हणून मी आज आपणाला लवकर उठविलें नाहीं. आतां वेळ बराच जाहला आहे, तर कांतिवर्मा महाराजांनीं उठावें. मंत्रीजन सभेंत आपली वाट पहात असतील."

आतां आपण प्रतापादित्य नसून कांतिवर्मा आहोंत असें त्यास या भाषणावरून वाटूं लागलें. आपण पूर्वदेहीं प्रतापादित्य होतों, याचें त्याला चांगलें स्मरण होतें. ह्या देहांतराबद्दल त्याला इतकें आश्चर्य वाटलें नाहीं; पण आपणाला—प्रतापादित्याला—कांतिवर्म्याचा देह मिळाला

हें आधीं कसें कळलें नाहीं, याचें त्यास आश्चर्य वाटलें. असो, वरील भाषण ऐकून तो उठला व पोषाक करून सभेंत गेला. तेथें सर्व लोक त्याची आतुरतेनें मार्गप्रतिक्षा करीत होते. त्यानें सभेंत प्रवेश करितांच सर्व लोकांनीं त्याचा जयजयकार करून त्यास उत्थापन दिलें. राजा आपल्या आसनावर विराजमान झाला, व त्यानें "बसा" म्हणून सर्व सभासदांस खूण केली. सर्व सभा बसतांच राजाचा सर्वांत जुना जो वृद्ध मंत्री तो उभा राहिला व ह्मणाला, "प्रतापादित्याच्या अरेरावीचे, क्रूरतेचे, व अधमपणाचें वर्णन मी वारंवार सभेंत करीत आलोंच आहे. आतां यापुढें त्या दुष्ट राजाकडून आपला वारंवार होत असलेला अपमान सहन करणें अशक्य आहे. ह्मणून त्याच्याशीं युद्धास प्रारंभ करावा हें चांगलें, असें मला वाटतें."

पण हा विचार **कांतिवर्म्या–प्रातापादित्या**–ला मानवला नाहीं. तो ह्मणाला, "राजा **प्रतापादित्य** याकडे आपले दोन मंत्री शिष्टाइला पाठवावें. तोंपर्यंत युद्धाचा विचार पुढें लोटावा, हें चांगलें." असें ह्मणून त्यानें या कामावर दोन चतुर मंत्र्यांची योजना केली व सभा विसर्जन केली. नंतर त्यानें त्या मंत्र्यांस एकीकडे बोलावून पुढें कसें काय वागावयाचें हें सांगितलें. हें सर्व काम आटोपून **प्रतापादित्य**–आपण **कांतिवर्मा** आहोंत अशा समजूतीनें–मृगयेस अरण्यांत गेला. तेथें त्यानें पुष्कळ हरिणे मारिलीं, व त्यांस राजवाड्यांत आणून परिवारासह आनंदानें भोजन केलें.

कालच्याप्रमाणें तो आजही सभेंत गेला. तेथें पुष्कळ लोक न्याय मागावयास आले होते. त्यांचें म्हणणें ऐकून त्यानें त्यांस योग्य न्याय दिला. हें काम आटोपल्यावर तो कालच्याप्रमाणें आजही मृगयेस गेला. आजच्या मृगयेंत त्याला एक हरिणी आपल्या अर्भकाबरोबर खेळत असलेली दिसली. त्यानें त्या दोघांची पारध केली व त्यांना वाड्यांत आणिले.

याप्रमाणें तो आपले दिवस राजकीय कामांत व विलासांत घालवूं लागला. याप्रमाणें बरेच दिवस, आठवडे, आणि महिनेही लोटले. तो **प्रतापादित्य** रूपी **कांतिवर्मा** आपले मंत्री येण्याची वाट पाहूं लागला. कांहीं दिवसांनीं ते मंत्री परत आले. **प्रतापादित्यानें** त्या बिचाऱ्यांचे कान कापवून **कांतिवर्म्यास**–म्हणजे आपल्या जुन्या **प्रतापादित्यास**–

त्यांचेच हस्ते निरोप पाठविला कीं, " ज्याप्रमाणें तुझ्या सेवकांची स्थिति केली आहे त्याचप्रमाणें तुझी स्थिति लवकरच करण्यांत येईल. अशी स्थिति आपणास प्राप्त होऊं नये ही जर तुझी इच्छा असेल, तर आम्हाला शरण येऊन खंडणी द्यावीस. इतकेंच नव्हे तर ती खंडणी भरण्यास त्वां जातीनें आम्हांकडे आलें पाहिजेस."

हें अपमानास्पद वर्तन पाहून व त्याचें उद्धट उत्तर ऐकून **कांतिवर्म्यास** क्रोध आला. त्यानें पुनः सभा भरविली व पुढें काय करावयाचें याची वाटाघाट केली. तेव्हां सर्वांचें एक मत पडलें कीं, या मदोद्धत राजाकडून आपल्यावर हल्ला येण्यापूर्वीं आपण होऊन त्याच्यावर हल्ला करावा हें चांगलें. त्याचें हें उर्मट वर्तन युद्ध प्रारंभ करण्यास पुरें आहे. राजानेंही या विचारास अनुमोदन दिलें; आणि स्वतः सैन्याचें आधिपत्य स्वीकारून तो **प्रतापादित्यावर** स्वारी करण्यास निघाला.

आठवे दिवशीं एका पर्वताचे दरींत नदीकाठीं **प्रतापादित्याच्या** सैन्याची व **कांतिवर्म्याच्या** सैन्याची गांठ पडली. या युद्धांत **कांतिवर्म्याचें** सैन्य निकरानें लढलें. त्यांनीं आपली पराकाष्ठा केली. पण प्रतिपक्ष्याचें आणखी कांहीं सैन्य त्या पर्वतावरून चोहोंकडून मुंग्याप्रमाणें आलें, व त्यानें **कांतिवर्म्यास** वेढा दिला. आतां शत्रूंचे लोक एकास दहा या प्रमाणांत झाल्यानें, त्यांना विशेष प्रयास पडल्याशिवाय **कांतिवर्म्यास** जिंकतां आलें. या युद्धांत **कांतिवर्मा** घायाळ झाला. **प्रतापादित्यानें** त्याला त्याचे सैन्यासह बंदिवान करून आपल्या राजधानीप्रत नेलें.

**कांतिवर्म्याला**—पूर्वीच्या **प्रतापादित्याला**—भुकेचा त्रास झाला नाहीं, दुखापतीचें दुःखही झालें नाहीं; पण त्याला लज्जा, अप्रतिष्ठा आणि अंतःकरणाचा दाह ह्यांपासून त्यास अनंत झाल्या. या दुःखानें त्याचें हृदय दग्ध झालें. तथापि जें काय संकट येईल तें निश्चयानें, धैर्यानें, व हूं कां चूं न करितां सहन करावयाचें, असा त्यानें संकल्प केला. त्याला एका भक्कम पिंजऱ्यांत कोंडलें होतें. तेथें तो वीस दिवस आपल्या मृत्युची मार्गप्रतिक्षा करीत होता. ज्यांना ज्यांना सुळावर देत, अथवा कढईत तळत, त्यांच्या अंतकालच्या किंकाळ्या त्यानें पिंजऱ्यांतून ऐकाव्यात. कोणाचे हात, कोणाचे पाय, तर कोणाचें मुंडकें इत्यादि तोडीत! पण **कांतिवर्म्यानें** हें सर्व वज्रासारखें मन घट्ट करून पाहिलें. त्यानें

आपल्या वृत्तींत मुळींच फरक पडूं दिला नाहीं, आणि शरण जाण्याचें सर्वथैव नाकारिलें. त्याच्या समोर त्याच्या प्रिय पत्नीला फरफटत ओढून नेलें. तिला पाहून त्याला वाटलें "आतां ही आपली आवडती राणी ह्या राक्षसाचे जभड्यांत जाणार!" हेंही त्यानें निमूटपणें पाहिलें! करणार काय? त्या राजाच्या पिंजऱ्याजवळ एक सेवक उभा होता. तो ह्मणाला 'राजा **कांतिवर्मा**, मला तुझी दया येते! काय तें तुझें पूर्वीचें वैभव! पण त्याचा आज तुला काय उपयोग आहे!'

हे शब्द ऐकतांच त्याला आपल्या पूर्व वैभवाचें स्मरण झालें. तें सुख आणि हे हाल! काय ही दैवाची विचित्र लीला!! या हालांपेक्षां मृत्यु पुरवला या विचारानें त्या शक्तिहीन राजानें आपलें डोकें पिंजऱ्याच्या गजांवर ताडकन् आपटलें पण त्यामुळें त्याचें इच्छित कार्य सिद्धीस गेलें नाहीं. तो पिंजऱ्यांत निश्चेष्ट मात्र होऊन पडला. याही गोष्टीस कांहीं दिवस लोटले.

एके दिवशीं दोन मांगांनीं त्याचा पिंजरा उघडला, आणि त्याचे हात पाठीशीं बांधून त्याला वधस्थानीं नेलें. तें स्थान रक्तानें माखलेलें असल्यामुळें लाल भडक दिसत होतें. त्याला सुळाखालीं उभें केलें. त्या सुळावरून रक्ताचे ओघळ वाहत होते; त्यावरून त्याला वाटलें, या सुळावरून नुकतेंच कोणाला तरी काढलें असावें. त्यानें सभोंवतीं नेत्र फिरविले मात्र, तोंच त्याला प्रेतांचे ढीग दिसले! त्यांतच एक नुकतेंच काढलेलें प्रेत त्याला दिसलें. तें त्याच्या प्रत्यक्ष मित्राचें होतें. त्याचे डोळे बाहेर आले होते, व जीभही बाहेर आल्यानें धुळींत लोळत होती! आतां कांहीं वेळानें हीच आपली दशा होणार; व या अनेक प्रेतांत आपलेंही प्रेत पडणार! असे विचार त्याच्या मनांत आले. त्या मांगांनीं त्याचे कपडे काढले. त्यामुळें त्याला आपलें कृश व अस्थिपंजर झालेलें शरीर दिसलें. हें शरीर पूर्वीं कसें धष्टपुष्ट होतें! त्याला स्पर्श करण्याचें सामर्थ्य कोणाला होतें! पूर्वीं त्याची किती जोपासना होत असे! पण त्याची आतां काय दशा झाली आहे! त्याला कोण स्पर्श करीत आहेत! आणि तें आतां कोणत्या स्थळीं आहे!! त्या मांगांनीं त्याच्या कृश झालेल्या मांड्या धरल्या व त्याला सुळावर देण्याकरितां उंच उचललें. "हाय! हाय! आतां मृत्यु! मृत्यु!!" हे विचार त्याच्या

मनांत आलें व तो आपला शरण न जाण्याचा निश्चय पार विसरला; आणि भान न राहून तो एकाएकीं ओरडला "दया करा! दया करा!!" पण त्या प्रसंगीं त्याची प्रार्थना ऐकणार कोण!

"छेः! हें संभवत नाहीं." प्रतापादित्य-हल्लींचा कांतिवर्मा-विचार करतो "खचित् मी झोंपेंत आहें, हें खरोखरींचे प्रकार नसून सर्व स्वप्न आहे." असा विचार करीत झोंपेंतून उठण्याचा जसा प्रयत्न करावा तसा प्रयत्न तो करूं लागला. व या स्वप्नांतून-भ्रमांतून-जागाही झाला; आणि लागलींच त्याला कळलें कीं, आपण हल्लीं प्रतापादित्य तर नव्होंत; पण कांतिवर्माही नव्होंत; तर कोणी तरी खालच्या कोटींतले प्राणी आहोंत. हें कळतांच त्याला अत्यंत आश्चर्य वाटलें.

तो प्राणी-पूर्वदेहांचा प्रतापादित्य-एका घनघोर अरण्यांत हिरवी कोंवळी हरळ खात होता. त्याच्या जवळच एक पाडस बागडत होतें, तें उड्या मारीत मारीत त्याजवळ येऊन स्तनपान करूं लागलें, हें पाहून त्याला वाटलें कीं, आपण एक हरीणी असून हें जवळ खेळत असलेलें पाडस आपलेंच आहे. यामुळें त्याला खेद व आश्चर्यही वाटलें; व एक-पक्षीं समाधानही वाटलें. आतां त्याला मातृसुखाचा अनुभव आला.

याप्रमाणें चरत असतां, आपल्याकडे कांहीं सणसण करीत येत आहे असें त्याला वाटलें तोंच तें त्याच्या कुशींत जोरानें शिरलें. तो बाण होता. त्यामुळें त्याला अत्यंत वेदना होऊं लागल्या. त्या वेदना होऊं लागतांच त्यानें आपल्या पाडसास पाजणें टाकलें व तसाच आपल्या कळपाकडे पळ काढला. त्याच्याबरोबर तें पाडसही पळूं लागलें. इतक्यांत दुसरा एक बाण सूं सूं करीत आला, तो त्या पाडसाच्या मानेंतून आरपार निघाला. त्यामुळें तें कोलमडून पडलें; व केंविलवाणें ओरडत गडबडा लोळूं लागलें. तें पाहून आईच्यानें तेथून जाववेना! ती तेथेंच निश्चल उभी राहिली. तें मूल गडबडा लोळतच होतें. इतक्यांत तेथें कोणी एक नर-पशु आला व त्यानें त्या मुलाचा-आईला वाटलें आपलाच-कंठ चराचर चिरला! हें अघोर कृत्य पाहून ती हरिणी मोठ्यानें किंकाळ्या फोडूं लागली!

" छे: हें खरें नाहीं. हें सुद्धा स्वप्न आहे." असें प्रतापादित्यास वाटलें. त्यानें पुनः पूर्ववत् उठण्याचा प्रयत्न केला. " खचित् मी कांतिवर्मा नव्हे, हरिणीही नव्हे, तर प्रतापादित्य आहें."

तो मोठ्यानें ओरडला आणि त्याच वेळीं त्यानें कारंजांतून आपलें डोकें वर काढलें......तों तो वृद्ध तपस्वी जवळ उभा असून कमंडलूतून आपल्या डोक्यावर पाणी ओतीत आहे, असें त्याला दिसलें. हें पाहून प्रतापादित्याला सुटल्यासारखें झालें. तो इतका घाबरला होता कीं, त्याची भीति अजून यत्किंचितही कमी झाली नव्हती. तो ह्मणाला, " हाय हाय ! मी किती भयंकर यातना सहन केल्या ! आणि त्या किती तरी वेळपर्यंत ! !

" किती वेळ ? राजा तूं पाण्यांत बुडी घेतलीस व वर डोकें उचललेंस. हें पहा. या कमंडलूतून अर्धें पाणीही मी ओतलें नाहीं ! आतां तरी माझ्या भाषणाचा तुला अर्थ कळला काय ? "

प्रतापादित्यानें यावर कांहीं उत्तर केलें नाहीं, मात्र तो भीतियुक्त दृष्टीनें त्याच्याकडे पहात होता.

" आतां तरी तुला समजलें का " तो वृद्ध म्हणतो " कीं, कांतिवर्मा तूंच, आणि जे योद्धे त्वां मृत्युसदनीं पाठविलेस, तेही तूंच ? इतकेंच नव्हे, तर आजपर्यंत जीं श्वापदें तूं शिकारींत मारिलींस तीही तूंच होय. तुला वाटलें कीं, आत्मा काय तो आपल्यांतच वास करतो. पण हें तुझ्या नेत्रांवरील मायापटल मीं दूर केलें. आणि दुसऱ्यास दुःख देणें म्हणजे तें आपण आपणासच दुःख करून घेण्याजोगें आहे, हें मीं तुझ्या निदर्शनास आणून दिलें. सर्व प्राणिमात्रांत जो आत्मा आहे, तो एकाच विश्वात्म्याचा अंश आहे; तुझ्यांतील आत्मा हा त्याचा यत्किंचित् एक अंशमात्र आहे. आणि त्यापैकीं जो अंश तुझ्या वांट्यास आला आहे, त्याचाच तूं सदुपयोग अथवा दुरुपयोग करूं शकशील. पुनः हेंही लक्षांत असूं दे कीं,—

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः[1] ॥ ५ ॥

---

१ उद्धरावें स्वचित्तातें प्रपंची बुडवूं नये ।
मित्र हें आपुलें चित्त, शत्रुही चित्त आपुलें ॥ अ० ६.

बंधुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रवत् ॥ ६ ॥[1]

तुझा आत्मा आणि इतरांचा आत्मा ज्या कारणामुळें विभक्त झाले आहेत, तीं कारणें जेव्हां तूं नाहींशी करशील, ह्मणजे जेव्हां तुझी—

अयं निजः परोवेति गणना लघुचेतसाम् ।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ॥[2]

अशी उदार वृत्ति होईल तेव्हांच तुझी 'आत्मोन्नति' होईल. पण जेव्हां तूं आपल्यांतच काय तो आत्मा आहे, असा अकुंचित् दृष्टीनें विचार करशील, व आपल्यास सुख होण्यासाठीं दुसऱ्याचे प्राण खर्ची घालशील, तेव्हां तुला सुख व्हावयाचें तर लांबच राहिलें पण त्या योगें तूं आपला 'आत्म–घात' मात्र करून घेशील. दुसऱ्यांत वास्तव्य करीत असलेल्या आत्म्यांचा आपण संहार करूं, अशी तूं जर प्रौढी मिरवीत असशील, तर ती व्यर्थ आहे. कारण—

न जायते म्रियते वा कदाचि—
न्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो
न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ २० ॥[3]

---

१ मित्र त्याचेंचि तें चित्त, जें स्वरूपेंचि जिंकिलें ।
अनात्मज्ञास शत्रुत्वें वर्ते चित्ताचि शत्रुवत् ॥

**गीता अ०६–वामन.**

**ओवी.**

२ आपपर हा विचार । अधम जनांचा अधमाचार ॥
उत्तम पुरुषाचा निर्धार । विश्वकुटुंब आपुलें ॥

**मुक्तेश्वर.**

३ न हा होतो मरतो वा कधींही । देहासंगें होउनी होत नाहीं ॥
अजा नित्या शाश्वताया पुराणा । देहाद्दश्या मारितां मारवेना ॥ अ० २

**नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।**
**न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः ॥ २३[1] ॥**

ज्या ज्या लोकांचा तूं आजवर संहार केलास त्यांचीं शरीरें मात्र गेलीं, पण त्यांचा आत्मा अमर आहे. तुला वाटलें कीं, त्यांचा प्राण घेऊन आपलें आयुष्य आपण वाढवूं, पण हें अशक्य आहे. काल आणि आकाश हे आत्म्याला परिमित करूं शकत नाहींत. एक क्षणभर देह धारण करणारांचा आत्मा, एक सहस्र वर्षें देह धारण करणारांचा आत्मा आणि तुझा आत्मा व ह्या सृष्टींतील दृश्य आणि अदृश्य प्राण्यांचा आत्मा, हे समसमानच होत. आत्म्याचा संहार करणें हें अशक्य आहे. कारण " आत्मा, " हाच काय तो अमर आहे.

**ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ।**

हा विश्वाचा जो पसारा दिसतो त्याचें कारण माया हें होय. मायेमुळेंच हा आभास होतो, पण वस्तुतः पाहतां हें सर्व स्वप्न होय. तुला जें दिसतें तें खरें नव्हे. **ब्रह्म** हेंच काय तें खरें आहे. " इतकें म्हणून तो गुप्त झाला.

दुसरे दिवशीं **प्रतापादित्यानें कांतिवर्म्यास** आणि त्याचे सर्व सेवकांस बंधमुक्त केलें. नंतर त्यानें आपल्या मुलास राज्याभिषेक करून घडलेल्या गोष्टीचा विचार करावयास आपण अरण्यांत निघून गेला. कांहीं कालानंतर तो पुनः आपल्या राज्यांत आला, व 'आत्मा हा एकच आहे, आणि जेव्हां आपण दुसऱ्याला पीडा देतों तेव्हां ती दुसऱ्याला देत नसून आपण आपणालाच करून घेतों,' असा उपदेश करीत तो पृथ्वीच्या पाठीवर भ्रमण करूं लागला.

---

१ याला न तोडिती शस्त्रें, याला अग्नी न जाळितो ।
न पाणी भिजवी याला, न करी शुष्क वायुही ॥ अ० २

वामन.

# शेवटीं सत्याचाच जय होतो.

**तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ।**
**असक्तो ह्याचरन् कर्म परमाप्नोति पूरुषः ॥**

श्रीमद्भगवद्गीता ।

सुमारें पन्नास वर्षें झालीं. **उज्जनीस आनंदराव** या नांवाचा एक सावकार राहात असे. त्याचें एक आडतीचें दुकान असून मालकीचा एक मोठा वाडा होता. तो मोठा श्रीमंत सावकार होता, असें जरी ह्मणतां यावयाचें नाहीं, तरी तो मध्यम स्थितींतला होता, असें ह्मणावयास कांहीं चिंता नाहीं.

**आनंदराव** हा तरतरीत बुद्धीचा, देखणा व गमती असून गाण्यांतही बराच तरबेज होता. लहानपणीं तो फार हूड असे; कारण, तो एक तर श्रीमंताचा मुलगा; तशांत बापाचा एकुलता एक असल्यानें फारच लाडका होता. त्यानें कांहीं केलें, तरी त्याचे वडील म्हणावयाचे " आहे, पोरच आहे. त्याला कळूं लागलें, कीं आपोआपच तो आपले सर्व चाळे सोडील. " या भाषणानें तर त्यास टवाळकी करण्यास जास्तच उत्तेजन मिळत असे. पण परमेश्वराची कृपाच ह्मणावयाची, कीं लग्न झाल्यानंतर लवकरच त्याचे एकामागून एक असे सर्व चाळे नाहींसे झाले.

**आनंदरावास** एक चुलता होता, तो **भोपाळ** शहरीं व्यापार करीत असे. त्याचा **आनंदरावावर** फार लोभ होता. तो निपुत्रिक वारला. त्यामुळें त्याची सर्व संपत्ती व त्याचप्रमाणें त्याचें **भोपाळ** येथील दुकान हें सर्व **आनंदरावास** मिळालें. त्या दुकानांत कांहीं भानगड उपस्थित झाली, ह्मणून तेथील मुनीमानें दुकानांतील व्यवस्था पहावयास स्वतः **आनंदरावास** बोलाविलें होतें. प्रसंगच पडला, मग करणार काय ? **आनंदरावास भोपाळला** जावयाचा बेत करावाच लागला. आणि लागलाच जावयाचा दिवसही ठरविण्यांत आला.

प्रातःकालचा समय. **आनंदराव** मोठ्या कष्टानें **आनंदीबाईचा** निरोप घेत होता. त्यावेळीं त्या तरुण व प्रेमळ दंपत्यास अल्पकालपर्यंत होणाऱ्या वियोगाचें अनिवार दुःख होत होतें. **आनंदीबाई** तर बोलूनचालून स्त्री. ती

डोळ्यास पदर लावून ह्मणते, " मी खरेंच सांगतें, आज कीं नाहीं, बाहेर जाणें चांगलें नाहीं. आज सकाळीं मला भलतेंच स्वप्न पडलें !"

" याचें कारण मजवर तुझें अलोट प्रेम आहे. तुझ्या मनांत सारा विचार माझ्याच संबंधीं चालतो. अग ध्यानीं मनीं तें स्वप्नीं. "

" तें कांहीं असो. पण माझें पदर पसरून इतकेंच मागणें आहे कीं, निदान आजच्या दिवस तरी बाहेर गांवीं जाऊं नये. "

**आनंदरावास** का या विरहापासून आनंद होत होता ! पण करणार काय ! त्यांना निकडीचें बोलावणें आलें होतें. ते बळेंच हंसून तिची समजूत करावयाची म्हणून ह्मणतात, " वेडी कुठली ! अग स्वप्नें जर अशी खरीं होऊं लागलीं तर आपणाला कोणचा तरी उद्योग करितां येईल काय ? उद्योग करावयाचा नाहीं, तर मग सुख तरी कसें होणार ? आपलें सुख चिरकाल राहावें, म्हणूनच ना ही एवढी यातायात करावयाची ? मग उद्योग न करून कसें चालणार ? पुनः असें पहा कीं, मला तेथें पुष्कळ दिवस थोडेंच राहावयाचें आहे ? काम आटपलें, कीं मग तेथें पळभरही न थांबतां मी लागलाच परत येईन. तुला असें वाटतें का, कीं मला तुझी व बाळांची कांहीं काळजी नाहीं ? मला आठ दिवसांपेक्षां अधिक थांबावें लागणार नाहीं. इतक्या अवधींत तुला भीति कसली वाटते ? "

" मला भीति कसली वाटते, तें कांहीं सांगतां येत नाहीं. पण मला कसेंसेंच वाटतें. राहून राहून भडभडून येतें. "

" हें स्वाभाविकच आहे. पण मनाला आवरलें पाहिजे ना ! "

" तें एक असो. पण मला आज पहांटेस एक स्वप्न पडलें, त्यामुळें मला चैन कसें तें पडत नाहीं. "

" स्वप्नाची इतकी भीति ! "

" पहांटें पडलेलीं स्वप्नें खरीं होतात, असें परवाच त्या शेजारच्या **म्हाळसाबाई** म्हणत होत्या. "

" **म्हाळसाबाई** म्हणत होत्या अन् तें तुला खरें वाटतें ! भोळी रे भोळी ! आतां या भोळेपणाला काय म्हणावें ! बरें तें असो. पण तुला

भीति वाटण्याजोगें असें स्वप्न तें कोणतें पडलें, तें तरी मला कळूं दे. ” **आनंदराव** म्हणाले.

“ आपण **भोपाळाहून** परत घरीं आला. मी आपल्याला भेटावयास आलें, तोंच एका विधवाबाईनें माझा हात धरून मला मागें ओढलें; तरी मी धडपड करीत आपल्याकडे येऊंच लागलें, इतक्यांत आपण डोक्यावरचें पागोटें काढलें. तों काय ? सर्व केस पांढरे झालेले ! ! ”

**आनंदीबाईच्या** स्वप्नातील विधवाबाईचा प्रकार ऐकून आनंदराव दचकले. तथापि ते ऐकलें न ऐकलेंसें करून म्हणतात, “ हात् तिच्या ! इतकेंचना ! मी म्हणत होतों, आजच न जाण्याजोगें तुला स्वप्न तरी कोणतें पडलें ! पण हें स्वप्न तर उत्तम आहे ! कारण परगांवाहून मी सुखरूप तर आलों ना ? आणखी ज्यास्त तुला काय पाहिजे, सांग. ‘ केस पांढरे झाले ? ’ ते होणारच. आतां हे केस आणखीं किती दिवस काळे रहावयाचे ? ”

असें म्हणून **आनंदरावानें** आपल्या पत्नीचें कसें बसें समाधान केलें, आणि आपण लवकरच परत येऊं, अशाप्रकारची पुष्कळ आश्वासनें देऊन तो **भोपाळास** जावयाकरितां एकदाचा निघाला.

## ( २ )

**आगरला** जाईपर्यंत वाटेंत म्हणण्याजोगें कांहीं घडलें नाहीं. नाहीं म्हणावयास **आनंदरावाला अमृतराव** या नांवाचा एक गृहस्थ **आगरच्या** वाटेंत भेटला. ते दोघेही ओळखीचे म्हणून एकाच–**आनंदरावाच्या**–गाडींत बसले. वाटेंत त्यांचें व्यापारासंबंधीं बरेंच भाषण झालें. त्यांत **अमृतरावानें आनंदरावास** असें सांगितलें कीं, “ मला **धनपूरगांवीं** एका सावकारास आठ हजार रुपये द्यावयाचे आहे, व त्याच प्रित्यर्थ मी तिकडे जात आहें. ”

सूर्यास्ताच्या वेळीं ते **आगर** शहरीं येऊन पोहोंचले ! तेथें रात्रभर मुक्काम करावा असें त्यांनीं ठरविलें. कारण **अमृतरावाजवळ** बराच ऐवज असल्याकारणानें त्यांना रात्रीं प्रवास करितां येईना; शिवाय **आनंदरावाचा रस्ता** येथूनच दुसऱ्या दिशेला वळत होता.

त्या गांवाला लागूनच वेशीबाहेर एक सराय होती, तेथें ते उतरले. सामानाची सर्व व्यवस्था लावल्यावर आनंदानें गोष्टी बोलत त्यांनीं फराळ केला. त्या सराईतल्या खोल्या फारच लहान असल्याकारणानें, ते मध्यें दार असलेल्या जवळ जवळच्या खोल्यांत आपआपला ऐवज उशाखालीं घेऊन गोष्टी बोलत पडले. **आनंदरावास** लवकर निजावयाची संवय होती; तशांत मोठ्या पहांटेस उठून मार्गस्थ व्हावें, असा त्याचा बेत असल्यामुळें तो लवकरच निजला.

**आनंदराव** मोठ्या पहांटेस उठला; व गाडीवानास जागें करून व त्यास गाडी जुंपण्यास सांगून, आपण सराईच्या चौकीदाराकडे गेला. तो सराईच्या मागें राहात असे. **आनंदरावानें** आपलें भाडें चुकतें केलें; नंतर तो **अमृतरावाच्या** खोलीकडे गेला. हें पाहून गाडीवान म्हणाला, " महाराज, आतां आपणाकडून उशीर होत आहे बघा. पल्ला लांबचा गाठावयाचा आहे, म्हणून लवकर निघाल तर चागलें. "

तरी **आनंदरावानें अमृतरावास** हांका मारल्याच; पण त्यानें ओ दिली नाहीं. तें पाहूत त्यास वाटलें, " उगीच त्यांना कशाला उठवा ? निजू द्या. कारण त्यांला जवळच जावयाचें आहे, व मला अजून लांबची मजल मारावयाची आहे. " असा विचार करीत तो गाडींत जाऊन बसला व गाडी चालू झाली.

त्याची गाडी सुमारे पंधरा मैल गेल्यावर **आनंदरावास** वाटलें कीं, आतां बैलांस घटकाभर विश्रांति द्यावी, व त्यांस चारापाणी घालून नंतर पुढील प्रवास करावा. त्याप्रमाणें त्यानें गाडीवानास गाडी थांबविण्यास सांगितलें, व त्यासही कांहीं खावयास सांगितलें. गाडीवानानें मुळींच कुरकुर केली नाहीं. त्यानें लागलीच गाडी थांबविली व आपण बैलास पाणी पाजण्यास घेऊन गेला.

ती गाडी वडाच्या एका विस्तीर्ण झाडाखालीं उभी केली होती. त्याच झाडाखालीं **आनंदराव** आपला फराळाचा डबा घेऊन गेला; व विहिरी-वर जाऊन त्यानें हातपाय धुतले, व येतांना एका भांड्यांत पाणी आणिलें आणि तो फराळ करावयास बसला.

इतक्यांत, **आनंदराव** आला होता त्याच दिशेनें एक गाडी भरधांव आली. तींतून एक गृहस्थ खालीं उतरला; त्याचे मागून दोघे शिपायी

उतरले. ते तिथे सरळ आनंदरावाकडे आले. त्यावेळीं त्यानें पहिलाच घास व तोही अगदीं तोंडाजवळ नेला होता; पण त्या नवख्या गृहस्थाला पाहून त्यानें तो घास खालीं ठेविला. तो गृहस्थ आनंदरावास विचारतो—

" आपण कोण आहांत, कोणीकडून आलांत, व कोठें जाणार आहांत ? "

" मी आपणास तें सर्व सांगेन, पण हरकत नसल्यास आपण मजबरोबर फराळ करावा."

आनंदरावाच्या या आदरपूर्वक केलेल्या भाषणाकडे दुर्लक्ष करून तो गृहस्थ विचारतो, " कालची रात्र आपण कोठें काढलींत ? तेथें आपण एकटेंच होता, कीं आपणाबरोबर आणखी कोणीं होतें ? रात्रीं आपल्याबरोबर असलेल्या गृहस्थास आपण आज प्रात:कालीं पाहिलेंत काय ? व आपण अगदीं पहांटेसच सराय कां सोडलीत. ? "

त्याच्या प्रश्नांचा असा भडिमार पाहून आनंदरावास फारच आश्चर्य वाटलें; तरी पण विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें त्यानें सावकाश व यथास्थितपणें दिलीं. नंतर तो त्या गृहस्थास विचारतो, " काहो, जसे एखाद्या चोरास प्रश्न करावेत, तसे तुम्हीं मला कां बरें प्रश्न करितां ? मी आपल्या घरगुती कामाप्रित्यर्थ प्रवास करीत आहे. मग आपणास मला असे प्रश्न करण्याची अवश्यकता काय ?"

" मी या भागांतील पोलिसांचा नाईक आहें; व मी असे प्रश्न करतों याचें निवळ कारण हें आहे कीं, काल ज्या गृहस्थाबरोबर आपण सारा दिवस घालविलात, त्या गृहस्थाचा खून झाला आहे ! ह्मणून आह्माला तुमच्या सामानाची तपासणी केली पाहिजे. "

असें म्हणून त्या नाईकानें आपल्या शिपायांस आनंदरावाच्या सामानाची तपासणी करावयास सांगितलें. शिपायांस आज्ञा होतांच ते आनंदरावाच्या गाडीजवळ गेले, व त्यांनीं तींतील एक एक सामान पाहण्यास प्रारंभ केला. त्या तपासणींत त्यांना आनंदरावाच्या पाकिटांत एक रक्तानें माखलेला सुरा सांपडला ! तो सुरा दिसतांच नाईक ओरडून त्यास विचारतो—" बोला हा सुरा कोणाचा ? "

आपल्या पाकिटांतून, त्या शिपायांनीं रक्तानें माखलेला सुरा काढलेला पाहून **आनंदराव** चपापला व अगदीं गडबडून गेला.

"आणि हा रक्तानें माखलेला आहे ! याचा अर्थ काय ?"

**आनंदरावानें** बोलण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या तोंडांतून शब्दच निघेना. तो अडखळत अडखळत म्हणाला "ममम...ला...मा म मा...हीत...ना...ना..."

हा प्रकार पाहून नाईक ह्मणतो "मला तर तूंच गुन्हेगार दिसतोस ! कारण तुह्मां दोघांशिवाय तेथें तिसरा कोणीही मनुष्य नव्हता. त्याचप्रमाणें तुझें भाषण व चेहरा हीं या दुष्ट कृत्याची साक्ष देत आहेत. तर आतां, त्या गृहस्थाचा गळा कसा कापलास, व त्याच्या किती रुपयांवर हात मारलास, हे सर्व निमूटपणें सांग पाहूं."

यावर, **आनंदरावानें** देवाची शपथ घेऊन सांगितलें कीं, "आम्ही रात्रौ भोजनोत्तर कांहींवेळ गोष्टी सांगत होतों हें खरें, पण मला त्यानंतर लवकरच झोंप लागली. मग मी त्याला डोळ्यानेंही पाहिलें नाहीं. घरून निघतांना मी बरोबर पन्नास रुपये घेतले होते. त्यांशिवाय माझ्याजवळ एक पैही जास्त नाहीं."

हें भाषण करीत असतां त्याच्या तोंडांतून शब्द नीट उमटेना, व त्याचा चेहराही पांढरा फटफटीत झाला. त्याचे आंगांत कांपरें भरलें. त्याची स्थिति हुबेहूब खऱ्या अपराध्याप्रमाणें दिसूं लागली.

नाईकानें त्याच्या मुसक्या बांधून त्यास गाडींत घालण्यास आपल्या शिपायांस आज्ञा केली. त्यावेळीं, अशा रितीनें आपल्यावर आकस्मिक् संकट आलेलें पाहून **आनंदरावास** रडूं कोसळलें. नाईकानें त्याच्या जवळचा सर्व माल जप्त करून, चौकशीसाठीं म्हणून त्यास **उज्जनीस** पाठविलें. सरकारांतून त्याच्या वर्तनाची गावांत चौकशी झाली; तींत असें निष्पन्न झाले कीं, लहानपणीं तो हूड होता खरा; पण अशाप्रकारचा अपराध करील, असें त्याचें वर्तन कधींही नव्हतें. नंतर त्याच्यावर खटला सुरु झाला; त्यांत त्यावर **अमृतरावास** ठार मारून आठ हजार रुपयांचा अपहार केल्याबद्दल पुरावा लागूं झाला !

( ३ )

आनंदीबाईस हें वर्तमान कळतांच तिनें रडून आकाश पाताळ एक केलें. तिला लहान लहान तीन मुलें होतीं, त्या सर्वांना बरोबर घेऊन ती आपल्या नवऱ्यास भेटावयाकरितां तुरुंगाकडे गेली. तेथें जाऊन पाहते तों तिला आंत जाण्याचा मज्जाव झाला. पण तिनें अधिकाऱ्याच्या अत्यंत विणवण्या करून आंत जाण्याविषयीं त्याची कशीबशी परवानगी मिळविली, व ज्या कोठडींत आनंदरावास ठेविले होते तिकडे ती जावयास निघाली.

या प्रसंगीं आनंदराव कैद्याचे वेशांत होता. त्याचा पूर्वीचा वेश जाऊन त्यावर खुनी मनुष्याचा वेश घालण्याची पाळी आली ! त्याच्या हातांत हातकड्या व पायांत शृंखला होत्या ! ! त्यास गजाचे खोलींत ठेविलें होतें. आनंदीबाईनें जेव्हां आपल्या प्रिय पतीस अशा भयंकर वेशांत पाहिलें, ते त्या कोमल अंत:करणाच्या अबलेच्या मनाला असह्य धक्का बसून ती एकाएकी मूर्च्छा येऊन पडली. तें पाहून मुलें " आई, असें गे काय करितेस ! अशी तेथेंच कां निजलीस ? " असे प्रश्न करून रडूं लागलीं. गरीब बिचारीं अर्भकें ! त्यांना हा प्रकार काय आहे, हें आकलन करण्याची शक्ति नसो, पण तीं फार घाबरून गेलीं. हा कल्पनातीत देखावा पाहून आनंदरावास रडें आवरेना ! त्यानेंही ओक्साबोक्शी रडावयास आरंभ केला !

कांहीं वेळानें आनंदीबाई शुद्धीवर आली व मुलांसह कशीबशी मोठ्या कष्टानें आनंदरावाच्या खोलीपर्यंत जाऊन पोहोंचली. बराच वेळपर्यंत त्य दोघांपैकीं कोणाच्याही तोंडांतून शब्द निघेना. सरतेशेवटीं आनंदराव विचारतो " तूं येथें कशाला आलीस? उन्हाचा त्रास कोण होत आहे ! शिवाय मुलांनाही बरोबर आणिलें आहेस ? "

" आपल्याला होत असलेल्या व्यथेपेक्षां हा त्रास जास्त का आहे ? "

मग तिनें आनंदरावास, एकंदर प्रकार कसा काय घडून आला तें विचारिलें. तेव्हां, त्यानें अथपासून इतिपर्यंत काय काय झालें होतें, तें सर्व सविस्तरपणें सांगितले. तें ऐकून ती ह्मणते—

" आतां, यांतून आपली सुटका व्हावयास काय करावें ? "

" मी महाराजास एक असा अर्ज करितों कीं, मी अगदीं निरपराधी असून माझा विनाकारण छळ होत आहे. "

" मी अशा प्रकारचा एक अर्ज महाराजास आधींच केला होता; पण तो नामंजूर झाला. "

यावर तो काय बोलणार ? जमिनीकडे दृष्टी लावून तो स्वस्थ बसला. ती ह्मणते " आपल्याला आठवते ना ? मी घरांतून निघतांना आपल्यास सांगितलें होतें कीं, आपण आज जाऊं नये. त्या वेळेला जाण्याची बुद्धि झाली नसती तर आज हा प्रसंग न येता ? "

" अग, याला कोण काय करणार ! माझें नशीबच खोटें. नशिबांत नाहीं, मग मला तशी बुद्धि होऊं नये यांत काय आश्चर्य ? 'आलें देवाजीच्या मना । तेथें कोणाचें चालेना.' दुसरें काय ! "

" परमेश्वरा, तूं खऱ्या व सत्वशील लोकांचा कैवारी असून आमच्या मागें असा दुष्टासारखा हात धुवून कसारे लागलास......"

" हं ! असें बोलूं नये. आपलें कर्म खोटें, त्याला परमेश्वर काय करणार ? अग, नशीबीं जें नाहीं तें आपल्यास कसें मिळणार ? ह्मणून, 'आलीया भोगासी । असावें सादर,' हें चांगलें नव्हे का ? "

इतक्यांत एक मुलगा ह्मणतो, " बाबा, तुह्मी आंत हो काय बसलांत ? बाहेर या आणि मला घ्याना. तुह्मी हे मळके कपडे कशाला घातलेत ? मी आपले कपडे देऊं का तुम्हाला ? "

यावर, त्याहून मोठा मुलगा ह्मणतो, " नको देऊस रे. तूं जर का येथें उघडा झालास, तर आई मार देईल बघ. अन् मग बसशील रडत."

हाच जर दुसरा एखादा प्रसंग असता, तर त्या दोघांनीं आपल्या मुलांचें किती तरी कौतूक केलें असतें ? तरी या वेळीं त्यांना मुलांचा राग आला, असें नाहीं; फक्त ते आपल्या दैवास दोष देत बसले. इतक्यांत तेथें एक शिपाई आला व ओरडून म्हणाला—

" बाई, तुह्माला आतां येथें ह्यापुढें बसण्याची परवानगी नाहीं, तेव्हां येथून जा कशा. "

या कठोर भाषणानें—भाषण कसलें, त्यांच्या कर्णरंध्रांत ओतलेलें तप्त तेलच तें—त्याचें अंतःकरण सारखें जळतच गेलें. पण करणार काय ?

**आनंदीबाईला** तेथून जाण्यावांचून गत्यंतर नव्हतें. तरी तिचा पाय तेथून निघेना, व तो निघावा तरी कसा ? शेवटीं शिपायानें जेव्हां तिला जाण्याविषयीं अगदीं निकरानें सांगितलें, तेव्हां त्या प्रेमळ नवराबाय-कोच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह सुरू झाला; मुलें तेथेंच राहण्याचा आग्रह करूं लागली; त्यांची कशी बशी समजूत करीत, व वारंवार आपल्या नवऱ्याकडे पहात, तिनें मोठ्या कष्टानें व नाइलाजानें आपला पाय तेथून काढला. या प्रसंगीं **आनंदीबाई** तेथून जात नसून तिचा देह पुढें जात होता, असें म्हटल्यास अधिक शोभेल.

इकडे **आनंदरावाची**ही तीच स्थिति झाली होती. त्याचा देह मात्र तुरुंगांत असून मन **आनंदीबाई** बरोबर जात होतें. तो तिच्याकडे एकसारखी टक लावून पहात होता. ती दृष्टीआड झाली तरी तो किती वेळ त्याच दिशेकडे शून्य दृष्टीनें पहात बसला होता. बऱ्याच वेळानें त्यानें एक मोठा उसासा टाकला व तो म्हणाला—

" आतां माझ्या बाळांचीं आणि हिची स्थिति काय होणार! आणि माझें तरी पुढें काय व्हावयाचें आहे, कोणाला ठाऊक! परमेश्वरा, हे सर्व-विश्वव्यापका! खरा खरा काय प्रकार आहे, हें तुलाच काय तें ठाऊक आहे. या जगांत खरें काय आणि खोटें काय आहे, हें जाणणारा तूंच. म्हणून, हे सर्व साक्षी प्रभो, मी तुझ्याकडे धांव घेत आहे. तुला सर्व प्रकार ठाऊकच आहे. मी तुला शरण आलों आहे. हे देवा, तूं दयासागर आहेस, तूं आपल्या दयेचा वर्षाव माझ्या बालकांवर व माझ्या बायकोवर कर. आतां, त्यांचें संगोपन करणारा तुजवांचून कोण आहे ? हे अनाथाच्या नाथा, **विश्वनाथा**, ह्या आह्मां दीन बालकांवर कृपा कर...."

त्याचा कंठ दाटून आला, त्याच्यानें पुढें बोलवेना. याप्रमाणें परमेश्वराचा धांवा करीत असतां, तो क्षणभर स्वत्व विसरला.

---

( ४ )

मोठ्या अपराध्यांना **ग्वाल्हेरीच्या** किल्ल्यांत ठेवण्याची चाल होती, त्याप्रमाणें **आनंदरावास**ही तेथेंच ठेवण्यांत आलें.

**आनंदरावानें** त्या तुरुंगांत पंचवीस वर्षें काढलीं!!! हा काल त्यानें कोणत्या मनःस्थितींत काढला, ह्याचें वर्णन करून सांगण्यापेक्षां, त्या बद्दल प्रत्येकानें स्वतःशींच विचार करावा. या अवधींत त्याचे केंस पांढरे शुभ्र झाले; दाढी पुष्कळ वाढली, तीही पांढरीच होती. तो आनंदाला कायमचा मुकला. हंसणें कसें तें त्यास जन्मतःच ठाऊक नसावें, असें त्याकडे पहाणारास वाटे. त्याचें कुबड निघालें असून तो हलु हलु चाले, भाषण अगदीं बेताचें करी, व ईशचिंतनांत आपला काल घालवी. सायंकाळीं तो नित्यनियमानें **तुकारामाचे** अभंग ह्मणे. त्यापैकीं तो एक अभंग नित्य म्हणावयाचा. तो अभंग हा—

**न करी तळमळ राहे रे निश्चळ। आहे हा कृपाळ स्वामी माझा ॥ १ ॥**
**अविनाश सुख देईल निर्वाणीं। चुकतील खाणी चौऱ्याशींच्या॥२॥**
**आणिक्या जीवा होईल उद्धार। तेही उपकार घडती कोटि ॥ ३ ॥**
**अहिक्य परत्रीं होशील सरता। उच्चारी रे वाचा रामराम ॥ ४ ॥**
**तुका ह्मणे सांडी संसाराचा छंद। मग परमानंद पावशील ॥ ५ ॥**

ह्या वेळीं **आनंदरावाचें** वय बरेंच झालें होतें, तरी त्याचा आवाज मधुर असून तो भक्तिभावानें अभंग ह्मणे, यामुळें त्याचें ह्मणणें इतकें गोड व बोधप्रद वाटे कीं, भाविक ऐकणारांस तेथून हलावेंसें वाटत नसे.

त्या तुरंगावर जेवढे ह्मणून अधिकारी येत, त्या सर्वांना **आनंदराव** हा अत्यंत आवडे. त्यांस **आनंदरावाच्या** वर्तनावरून असें वाटे कीं, यानें क्वचित् अपराध केला नसावा; पण त्यांना असें वाटून काय उपयोग? अशानें **आनंदरावाची** सुटका थोडीच होणार होती?

**आनंदरावाचे** सहवासांतले सर्व कैदी त्याला अत्यंत मान देत. तेथील कैद्यांना आपल्या सुखदुःखाविषयीं अधिकाऱ्यांपाशीं कांहीं बोलण्याचा जेव्हां जेव्हां प्रसंग येई, तेव्हां तेव्हां ते आपल्याकडून बोलण्यास **आनंदरावास** पुढें करीत. त्यांचीं आपसांत जेव्हां कधीं भांडणें होत, तेव्हां तीं मिटविण्याची पाळीही त्याजवरच येत असे.

या अवधींत **आनंदरावास** आपल्या प्रिय पत्नीचें व मुलांचें कांहींच वर्तमान कळलें नाहीं. ह्यामुळें जेव्हां जेव्हां त्याचें दुःख अनिवार होई, तेव्हां तेव्हां—

**‘ शोक क्षोभीं रोदन हृदयस्थैर्या नसे दुजी वाट । ’**

या आर्याधांत सांगितल्याप्रमाणें तो मनसोक्त रोदन करून आपलें अंतःकरण हलकें करून घेई. याशिवाय त्याचे हातीं दुसरें काय होतें ?

ह्याप्रमाणें आणखी कांहीं दिवस गेले. पुढें एके दिवशीं त्या तुरुंगांत आणखी कांहीं कैद्यांची भरती झाली. या नवीन आलेल्या कैद्यांभोंवतीं तेथील वहिवटलेले कैदी जमले व त्यांच्या भोंवतीं गराडा घालून त्यांना विचारूं लागले, “ आपण कोणच्या गांवचे ? आपण कोणता अपराध केला, म्हणून आपल्याला येथील हवा पाहण्याचा प्रसंग आला ?” आनंदरावही तेथें त्यांचीं संभाषणें ऐकत बसला होता.

या नवीन आलेल्या कैद्यांत एक धट्टाकट्टा पण साठ वर्षांचा कैदी होता. त्याचें तोंड गोवरें होतें, व कपाळ मोठें असून डोळे बटबटीत होते. त्याचे दांत चणे चावण्याजोगे मजबूत होते; व आवाज कणखर होता. तो आपणास कैद कां केलें हें तेथील सर्व मंडळीस सांगूं लागला. तो म्हणाला—

“ मित्रांनों, मी तुह्माला आपली हकीकत सांगतों, ती लक्षपूर्वक ऐकावी. एका गाडीला एक घोडा जुंपलेला होता. तो मी सोडून घेत होतों म्हणून मला पकडण्यांत आलें. नंतर मजवर चोरीचा आरोप ठेवण्यांत आला ! तरी बरें कीं मी तो घोडा चोरून नेत नसून सर्वा-समक्षच नेत होतों. असो. चौकशी होत असतांना मी न्यायाधिशास म्हणालों ‘ महाराज, माझें घर लांब होतें, तशांत मला फार घाई अस-ल्यानें मी बसावयास म्हणून तो घोडा घेणार घेतों. यांत माझा अपराध काय ? मी घरीं पोहोंचल्यावर, ज्याचा त्यास घोडा परत करणार होतों; इतकेंच नव्हे, तर त्या घोडेवाल्याचा खोळंबा केल्याबद्दल मी त्याचें नुकसानही भरून देणार होतों. पुनः हेंही लक्षांत ठेवण्याजोगें आहे कीं, गाडीवान हा माझा जिवलग दोस्त आहे. तो तर कांहीं बोलतच नाहीं व हे शिपाई बिचमें मेरा चांदभाई, कोण करणार ’ हें सर्व मी शपथे-वर सांगितलें. पण त्या गृहस्थाचे मनांत मला तुरुंगच दाखवावयाचा होता; तो खरें खोटें कशास पहातों ? तो ह्मणाला ‘ तें कांहीं आम्ही जाणत नाहीं. तूं चोरच आहेस ! ’ अन् काय दिली शिक्षा ठोठावून ! ! मी कोठें, केव्हां, कधीं व कोणाचा घोडा घेतला होता, हेंही त्यांना

सिद्ध करितां येईना! तसें म्हणा मी मागेंच एक मोठा अपराध केला होता; पण त्यावेळीं मला कांहीं एक झालें नाहीं! होणार कोठून? मी बंदोबस्तच तसा केला असल्यामुळें सांपडलों नाहीं. वास्तविक पाहतां त्यावेळेसच मी येथें यावयास पाहिजे होतों, पण यावेळीं मात्र उगीच सांपडलों (गोंधळून) पण...मी हें जें तुह्माला सांगतों, तें सारेंच खरें समजूं नका हो! यांत बरेंचसें खोटेंही आहे. कारण, मी जर खरें बोलणारा असतों, तर माझी स्थिति आज और असती!"

हें भाषण ऐकून सर्वांसच हसूं लोटलें. त्यांपैकीं एकानें त्याला विचारिलें, "तूं कोणच्या गांवीं राहतोस?"

"मी **उज्जनचा** राहणारा आहें. माझें नांव **शामाबापु.**"

"**उज्जन**" हीं अक्षरें ऐकतांच **आनंदरावांचें** लक्ष त्याच्याकडे साहजीकच वेधलें. त्यानें त्यास विचारलें, "असें काय? मग आपणास तेथील व्यापारी जो **आनंदराव** याची माहिती असेलच?"

"**आनंदरावाची** आणि माहिती? हंः हंः हंः हें काय विचारतां? अर्थात् त्यांची माहिती मला असलीच पाहिजे."

हें ऐकून **आनंदरावास** बरें वाटलें. त्याला आपल्या मंडळीची माहिती आज किती दिवसांत कळली नव्हती. त्याच्या डोक्यांत बायकोचे, मुलांचे व घरचे असे लाखो विचार आले. घरचें वृत्त मी कधीं ऐकेन, असें त्याला झालें. त्याची छाती धडधड उडूं लागली. तो सद्गदीत होऊन त्यास विचारितो—

"त्याच्या घरची सर्व मंडळी खुशाल आहेत ना?"

"त्यांची मंडळी होय? त्यांची बायको दुःखातिशयामुळें वेडी झाली. एकदां ती विहिरीजवळ उभी असतां 'ते आले, ते आले,—तुम्ही इकडे कशाला येतां? मीच तिकडे येतें' असें म्हणून तिनें विहिरींत उडी घेतली. त्या विहिरींतून तिला लोकांनीं काढिलें, पण ती लवकरच मेली. दोन्हीं लहान मुलें देवी येऊन मेलीं. थोरला मुलगा महाराजांनीं बाळगिला होता, पण तोही बिचारा नवज्वरानें गेला! आतां त्या व्यापाऱ्याचें घर व सर्व जमीनजुमला सरकारांत गेला आहे."

हे शब्द–शब्द कसले हे ! आनंदरावाला या भाषणांतील प्रत्येक शब्द ह्मणजे तो त्यास विजेच्यां आघाता सारखा वाटला !

---

( ५ )

नित्याप्रमाणें मंडळी बोलत बसली होती. शामाबापूला, हा मनुष्य आनंदरावाबद्दल इतकी विचारपूस कां करितो याचें आश्चर्य वाटलें; ह्मणून तो आनंदरावाला विचारितो—

" आपण कोठचे ? आणि येथें कोणच्या कारणामुळें आलांत ? "

आनंदरावाला आपल्या दुर्दैवाबद्दल एक चकार दब्दही काढावासा वाटत नव्हता. तो एक मोठा उच्छ्वास टाकून ह्मणतो—

" मी आपल्या एका अघोर कृत्याबद्दल येथें पंचवीस वर्षें आहें. "

" कोणत्या अघोर कृत्याबद्दल ? "

" मी ? मी माझ्या योग्य अपराधामुळेंच येथें आलों. " तो ह्मणाला. त्यास यापुढें कांहींच बोलावेंसें वाटेना. जवळच्या लोकांनीं मात्र तो तेथें कसा आला, त्याजवर कोणचा आरोप होता, अमृतरावाचा खून कसा झाला, आनंदरावाचे पाकिटांत सुरा कसा सांपडला, तो निरपराधी कसा आहे, वगैरे सर्व हकीकत सविस्तरपणे सांगितली. ती हकीकत ऐकून शामाबापूस वाटलें कीं, मागचें आपलें भाषण ह्मणजे आपण होऊनच आपल्या पायांवर धोंडा आपटून घेण्यासारखें होतें. त्याचा चेहरा उतरला; पण ही गोष्ट कोणाच्या लक्षांत येऊं नये ह्मणून तो ह्मणतो—

" वः, हें फारच चमत्कारिक दिसतें. तें एक असो. पण आपलें वय काय बरें असावें ? "

यावर आनंदरावानें कांहीं उत्तर केलें नाहीं. मग एकजण त्यास विचारितो, " शामाबापू, तुह्माला इतकें आश्चर्य कांहो वाटतें. तुह्मी यांना मागें कधीं पाहिलें होतें काय ? "

परंतु यावर कांहीं उत्तर न करितां तो ह्मणाला, " आज येथें आमची भेट झाली हें मात्र फार आश्चर्यकारक होय. "

हें वाक्य ऐकून **आनंदरावाला** आश्चर्य वाटलें. तो स्वगत ह्मणाला, " **अमृतरावास** कोणी मारिलें हें याला ठाऊक असेल काय ? असल्यास विचारून पहावे." असा विचार करून तो **शामाबापूस** विचारितो " या गोष्टीचें तुह्माला आश्चर्य वाटतें, याचें कारण तुह्माला खुनाच्या खटल्याविषयीं कांहीं माहिती असेल; अथवा तुह्मी मला पूर्वीं कधीं पाहिलें तरी असेल."

" **आनंदराव,** अहो हें काय विचारितां ! या जगांत गप्पांचा बाजार अहोरात्र भरला असतो. मग मी त्या खटल्याविषयीं ऐकूं नको तर कानात बोट घालून हिंडू कीं काय ? पण त्यास कीं नाहीं, बघा, फार दिवस-दिवस कां वर्षें झालीं. ह्मणून त्या विषयीं मी जें कांहीं ऐकिलें तें सर्व विसरलों बघा."

" त्या व्यापाऱ्यास कोणी मारिलें, हें तुम्ही ऐकलेंच असेल ? तें तरी तुह्माला स्मरतें काय ? "

यावर चमत्कारिक रीतीनें हंसून **शामाबापू** उत्तर करितो, " अहो, ज्याचे पाकिटांत रक्तानें माखलेला सुरा सांपडला, तोच खुन करणारा अन् काय ? पण असें कशाला पाहिजे ? घटकाभर समजा, मीच हा खून-पण छेः उदाहणांत तरी आपलें, तशांत निर्दोषी मनुष्याचें, नांव कशास घ्या ?—कोणी तरी खून केला. पण जोंपर्यंत त्याचा ठाव ठिकाणा नाहीं, तोंपर्यंत तो सावच असणार. हो. मी ह्मणतो तो साव कां नसावा ? पुनः तुह्मी असा विचार करीत नाहीं कीं, तुमच्या उशाखालीं पाकीट. त्यांत मुद्दाम सुरा लपविण्यासाठीं कोण भूत कां येतें ? दुसऱ्यानें तेथें सुरा ठेवावयाचा, ह्मणजे तुमची झोंप कुंभकर्णी आहे, हें ही त्याला आधीं माहित असलें पाहिजे; व तें त्याला कसें बरें माहित असावें ? **आनंदराव,** आपण सावच आहोंत, असें सांगण्यांत तुह्माला अजूनही भूषण बरें वाटतें ! "

या भाषणाचा **आनंदरावास** व त्याच्या मंडळीस फार राग आला; व ते सर्व तेथून उठून गेले. ह्या भाषणावरून **आनंदरावास** असें खात्रीपूर्वक वाटूं लागलें कीं, याच स्वारीनें तो खून केला असावा. त्याचा त्या रात्रीं मुळींच डोळा लागला नाहीं. त्याला फार दुःख होऊं लागलें. मागील सर्व गोष्टीचे त्याच्या मनांत विचार घोळूं लागले. त्या विचारांचा

त्याच्या डोक्यांत इतका अतिरेक झाला कीं, त्याचे आणि विचारांचे तादात्म्य झालें. त्याच्या समोर मागील गोष्टीचा नुसता चित्रपटच उभा राहिला नाहीं, तर पूर्वींचीं चित्रें-शब्दचित्रें नव्हत तर खरीं खरीं चित्रें—त्याच्या समोर उभी राहिलीं. त्या चित्रपटांत, आपण प्रवासास निघालों असतांना आपली बायको आढेवेढे कसें घेत होती, ह्याचें चित्र त्यास दिसलें. त्याला वाटलें, आपल्या समोर आपली बायको प्रत्यक्ष उभी आहे; इतकेंच नव्हे, तर ती 'आतां तरी पुन: बाहेर जाऊं नका,' असा काकुळतीनें आपणास आग्रह करीत आहे. त्याला आपलीं लहान लहान तीन अर्भकें दिसलीं. मोठा मुलगा काठीवर बसून 'घोडा, घोडा' असें ह्मणत धूम पळत आहे; धाकटा दुडु दुडु चालत आहे, पुनः पडत आहे; तिसरा पाळण्यांत स्वस्थ निजला आहे. देवानें सोन्यासारखी मुलें दिलीं—दिलीं असें ह्मणावयाचें मात्र! पण प्रत्यक्ष बापास त्यांना स्पर्श करितां येऊं नये!! त्याचप्रमाणें आनंदीबाईबरोबर आनंदांत घालविलेले दिवस व त्यावेळच्या सर्व गोष्टी जणु काय पुनः घडत आहेत, असें त्यास वाटलें. वडाचे झाडाखालीं बसून, पत्नीनें केलेलें फराळाचें जिन्नस आपण कसें काढिलें? व आनंदानें फराळ करणार—फराळ कसला! तोंडांत घास घालणार तोंच, कांहीं अपराध नसतां; ध्यानीं, मनीं व स्वप्नींही नसतां; आपणास पोलीसच्या नाईकानें कसें पकडलें; नंतर आपली चौकशी कशी झाली; पायांत शृंखला कशा पडल्या; पत्नी मुलासह तुरुंगांतही भेटावयास कशी आली; त्यांच्याशीं भाषणें कशी झाली; व त्यानंतर एक दोन नव्हे, तर पंचवीस वर्षें हा नरकवास आपल्याला कसा भोगावा लागत आहे; घरच्या मंडळीचें निधनवृत्त कसें कळलें; हें सर्व त्यास एका मागून एक आठवूं लागलें. दुःखभारामुळें तो घाबरा झाला. या सर्व गोष्टीचें त्यास इतकें दुःख झालें कीं, आतां अफू खाऊन जीव द्यावा असें त्यास वाटूं लागलें. पण तो ती तरी आणणार कोठून? या सर्व दुःखाचें कारण काय? तर त्या नीच मनुष्याची कृति! हा विचार मनांत येतांच आनंदरावाचे आंगांत कांपरें भरलें. त्यावेळीं त्याला असें वाटलें कीं, कांहीं होवो, त्या मनुष्याचा सूड उगविलाच पाहिजे. त्याच्या अंतःकरणाचा भडका उडाला होता. तो कांहीं कमी व्हावा, म्हणून तो परमेश्वराचें चिंतन

करूं लागला; पण चित्त कांहीं स्थिर होईना. मग त्या रात्रीं त्यास झोंप कोठून येणार ?

दुसरा दिवस उजाडला. पण त्या दिवशीं तो कोणांतच मिसळला नाहीं; व **शामाबापूकडे** तर त्यानें ढुंकूनही पाहिलें नाहीं.

पंधरा दिवस झाले, **आनंदरावास** झोंप कशी ती ठाऊक नव्हती. त्यामुळें त्यास प्रत्येक क्षणीं वाटे कीं, आतां आपणास वेड लागणार !

---

( ६ )

वाचकहो, पुढील भाग समजण्यास येथील खोल्यांच्या रचनेची थोडी बहुत माहिती करून घेतली पाहिजे. त्या तुरुंगांत खोल्यांच्या अनेक रांगा असत. प्रत्येक रांगेंत सुमारें वीसपर्यंत खोल्या असत. अमूक खोलींत अमूक एक कैद्यानेंच निजले पाहिजे, असा नियम त्यावेळीं सक्त रितीनें आमलांत आणिला जात नसें. यामुळें वाटेल तो कैदी वाटेल त्या खोलींत निजत असे. प्रत्येक खोलींत जमीनीस लागून मध्यभागीं एक लोखंडी गजाची खिडकी असे. ही खिडकी दोन खोल्या मधील भिंतीस असल्यानें पलीकडच्या खोलींत काय चालले आहे, हें अलिकडच्या खोलींत राहणारास दिसे.

एके दिवशीं रात्रीं **आनंदराव** विचार करीत चटईवर पडला असतां, त्याला शेजारच्या खोलींत कोणी तरी खणत असल्याचा आवाज ऐकूं आला. ह्मणून त्यानें वर सांगितलेल्या खिडकीवाटें, पलिकडे काय चाललें आहे, हें पाहिलें. तोंच, आंतून बाहेर जातां यावें ह्मणून भिंतीपाशीं खणत असलेला **शामाबापु** त्यास दिसला. **आनंदरावानें** तिकडे पहावयास व **शामाबापूनें आनंदरावाकडे** पहावयास एकच गांठ पडली. **आनंदरावानें** आपलें तिकडे लक्षच नाहीं असें दाखविलें. पण **शामाबापूस** तसें थोडेंच करितां येत होतें ? त्यानें आपलें काम अर्धवटच टाकिले; व गजापाशीं येऊन तो त्यास हलक्या आवाजांत म्हणतो, “ मी आपली सुटका व्हावी ह्मणून येथें खणीत असतों; व कोणास दिसूं नये ह्मणून या ठिकाणीं दिवसा कामळें टाकितों. आणि रात्रीं खणलेली माती पासोडींत घालून कोणच्या तरी

निमित्तानें संधी साधून ती मी बाहेर नेऊन टाकितों. पण ही गोष्ट बाहेर फुटूं देतां उपयोगी नाहीं. मी तुझीही सुटका करून देईन. पण जर का याबद्दल तूं कोठें मुखरस पाघळलास, तर मला त्याचें प्रायश्चित्त मिळेल! पण त्यापूर्वी तुला ठार करीन, हें ध्यानांत वागवून मग काय करावयाचें तें खुशाल कर."

या भाषणानें **आनंदरावास** अत्यंत संताप चढला. त्यामुळें त्याचें आंग लटलट कापूं लागलें. त्यास नीट बोलतां येईना. त्यानें जमीनीवर जोरानें हात आपटले व दृष्टी वर लावून तो ह्मणतो, "येथून सुटण्याची आतां माझी इच्छा नाहीं. व तुला मला मारावयास कांहीं नको; कारण मला तूं मारावयाचे अजून बाकी का ठेविले आहेस? आतां, या गोष्टीची परिस्फुटता न करण्याविषयीं जर ह्मणशील, तर इतकेंच सांगतों कीं, मला परमेश्वर जशी बुद्धि देईल त्याप्रमाणें मी करीन."

दुसऱ्या दिवशीं कैद्यांना जेव्हां कामावर नेले, तेव्हां एका शिपायाच्या लक्षांत आलें कीं, कोणचा तरी कैदी बाहेर माती नेऊन टाकितो. त्यानें ही गोष्ट नाइकास जाऊन सांगितली. त्यानें सर्व खोल्या तपासल्या, तेव्हां त्याला एका खोलींत खळगा खणलेला आढळला. त्यानें सर्व कैद्यांस आपल्यासमोर बोलावून आणिले व प्रत्येकास प्रश्न केला, "हा खळगा कोणी खणिला?"

तो प्रश्न ऐकतांच प्रत्येकजण आपल्या कानावर हात ठेवूं लागला. ज्या कोणांस ही गोष्ट ठाऊक होती त्यांना वाटलें, "गरीब बिचारा **शामा-बापु**! नांव कळलें तर व्यर्थ मरेमरेंतों मार खाईल!" आपल्या प्रश्नाचें उत्तर कोणीही देत नाहीं, असें पाहून नाईक **आनंदरावाकडे** वळला. कारण, त्याच्या खरेपणाची नाईकास पूर्ण खात्री होती. तो त्याला विचारितो, "वृद्धगृहस्था, तूं सत्य भाषण करणारा आहेस. तेव्हां, हा खळगा कोणी खणला, हें सांग पाहूं, माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे."

यावेळीं **शामा** एखाद्या बेरडासारखा उभा होता. तो, हा काय प्रकार चालला आहे, याचा आपणास जणु मागमूसही नाहीं, अशा तऱ्हेनें नाईकाकडे पहात होता. त्याचें लक्ष **आनंदरावाकडे** तर जणु मुळींच नव्हतें. नाईकाचा प्रश्न ऐकून **आनंदरावाचें** आंग पुनः कांपूं लागलें. बराच वेळ झाला, तरी काय उत्तर द्यावें हें त्यास सुचेना. तो स्वगत

विचार करूं लागला, "ज्यानें माझ्या आयुष्याची निरर्थक राखरांगोळी केली, त्याचा अपराध काय ह्मणून लपवावा? आजपर्यंत मी जें दुःख भोगिलें, त्याचा वचपा मी कां काढूं नये? पण, माझा त्याजविषयींचा संशय निराधार असला तर? व ह्याप्रमाणें जरी त्याचा प्राण घेतला, तरी मी त्यांत काय मिळविणार! मग आतां कसें बरें करावें?"

आपल्या प्रश्नावर त्याचें कांहीं उत्तर येत नाहीं असें पाहून नाइकानें त्याला पुनः तोच प्रश्न केला. तेव्हां **आनंदराव शामरावाकडे** पहात म्हणाला "महाराज, मला कांहीं सांगतां येत नाहीं; व याविषयीं मी कांहीं सांगावें, अशी परमेश्वराची इच्छाही दिसत नाहीं. आपण माझें वाटेल तें करावें. मी सर्वथैव आपल्याच स्वाधीन आहे."

याप्रमाणें **आनंदरावाचें** नकारात्मक उत्तर आलें, तथापि त्याचें मन वळविण्याचा नाइकानें पुष्कळच प्रयत्न केला; पण त्याचें आपलें एकच उत्तर होतें. यामुळें नाईकाला ही चौकशी त्यावेळीं तरी तहकूब करावी लागली.

---

## (७)

त्याच दिवशीची रात्र. **आनंदराव** आपल्या चटईवर पडला होता. त्यास निद्रा लागण्यातच होती. इतक्यांत एक मनुष्य अगदीं मुकाट्यानें त्याच्याजवळ आला, व चटईवर येऊन बसला. **आनंदरावानें** त्याच्याकडे पाहिलें, तों तो गृहस्थ **शामराव** होता. तो त्याला म्हणतो—

"तुला आणखी काय पाहिजे? येथें कशाला आलास?"

यावर **शामराव** कांहींएक बोलला नाहीं. हें पाहून **आनंदराव** उठून बसला आणि त्यास म्हणाला, "येथून निघून जा कसा! नाहींतर मी पहारेकऱ्यास हांक मारीन."

**शामराव** लवून ह्मणतो "मला क्षमा करा."

"कशाची?"

"**आनंदराव**, मी लहानपणापासूनच लुटारूचें काम करीत आलों आहे. तुह्मी कांहीं कामानिमित्त **भोपाळला** जातां असें मी ऐकिलें. तुह्मी पडला सावकार. तेव्हां लाग लागल्यास पहावा ह्मणून मी मुद्दाम गाडीवानाचें सोंग घेतलें, व आपणास **उज्जनीहून भोपाळला** घेऊन

चाललों. वाटेंत मी **अमृतरावाचें** आणि तुमचें भाषण ऐकिलें. त्यावरून, त्यांच्या जवळ बराच पैसा आहे असें मला समजलें. रात्रीं मीच त्याला सराईंत मारिलें व तुह्मालाही मारिलें असतें; पण मला बाहेर गडबड ऐकूं आली, ह्मणून मी घाबरून गेलों, तथापि प्रसंगावधानानें मी तुमच्या पाकिटांत सुरा लपविला, आणि तेथून पळालों. या कृत्यांत मी सराईवाल्यास सामील करून घेतलें होतें. त्यामुळें माझा बचाव होऊन तें प्रकरण तुमच्या गळ्यांत आलें. त्या चौकीदाराकडून मीच पोलिसास वर्दी देवविली. त्या बिचाऱ्यांना खरा प्रकार काय ठाऊक! त्यांनीं तुम्हाला पकडिले!..."

**आनंदराव** ही सर्व हकीकत शांतवृत्तीनें ऐकत होता. यावर काय बोलावें हें त्यास सुचेना. **शामरावानें** त्याचे पाय धरिले आणि तो काकुळतीस येऊन ह्मणाला, "**आनंदराव**, मला क्षमा करा. आतां मी सर्वांसमक्ष कबूल करणार कीं, या खुनांत **आनंदरावाचा** कांहींएक अपराध नसून सर्व अपराध माझाच आहे. म्हणजे तुमची सुटका होईल; व मग तुम्ही आपल्या घरीं जा."

'घर' हीं अक्षरें ऐकतांच **आनंदरावाचें** हृदय भरून आलें. तो म्हणाला, "गृहस्था, हें भाषण करणें अत्यंत सोपें आहे! पण मी आज हीं पंचवीस वर्षे तुरुंगांत कशीं बरें काढिला असतील?...आतां मी जाऊं कोठें? माझी बायको गेली, मुलेंही गेलीं!! आतां मला त्यांच्या भेटीस जाण्या शिवाय—मृत्यूशिवाय—दुसरा मार्ग नाहीं..."

**शामरावानें** अजूनही **आनंदरावाचे** पाय धरिले होते. तो म्हणतो, "क्षमा करा. माझ्या अपराधाबद्दल मला जे फटके मारिले, त्याचें दुःख आपल्या या शब्दापासून होणाऱ्या दुःखापुढें कांहींच नाहीं...आपली स्तुति करावी तितकी थोडीच आहे. मी आपल्या सर्व जन्माचें मातेरें केलें असूनही, आतां, खळगा खणल्याविषयीं जी चौकशी झाली, तींत आपण मजविरुद्ध एक अक्षरही काढिलें नाहीं. या आपल्या थोर कृतीनें मला आपल्या कृतकर्माचा पूर्ण पश्चात्ताप झाला आहे. **आनंदराव**, माझ्यासारखा अधम या पृथ्वींत दुसरा कोणीही नसेल!"

हे शब्द बोलत असतां, **शामरावाच्या** डोळ्यांत आंसवें आलीं व तो रडूं लागला. हें पाहून **आनंदरावही** रडूं लागला. तो ह्मणाला—"परमेश्वर तुला आपल्या अपराधाची क्षमा करो."

हें भाषण केल्यानें **आनंदरावास** जरा हलकें वाटलें. खरा खुनी कोण आहे, हें त्यास समजलें नसल्यानें आपल्या छातीवर एक मोठी धोंड पडली आहे, असें त्यास हा वेळपर्यंत वाटत होतें. ती धोंड गेल्यानें त्याला या जगांत कोणत्याही प्रकारची आशा उरली नाहीं. नाहीं ह्मणावयास त्याला आतां एकच इच्छा होती व ती—मृत्युची.

**आनंदरावानें शामरावास** आपला अपराध कबूल न करण्याविषयीं पुष्कळच सांगितलें; तथापि, त्याच्या भाषणाकडे लक्ष न देतां त्यानें खुनाचा सर्व प्रकार नाईकास जाऊन सांगितला. नाईकानें तें सर्व प्रकरण व **आनंदरावाची** आजपर्यंतची वर्तणूक कशी होती, याची सर्व हकीकत, तेथील वहिवाटदाराच्या साह्यानें सरकाराकडे पाठविली. सरकारांतून **आनंदरावास** मुक्त करण्याचा हुकूम आला. तो हुकूम घेऊन नाईक **आनंदरावाच्या** खोलीकडे जाऊन पाहतो, तों त्यास **आनंदराव** आपल्या कामळ्यावर इहलोक सोडून परलोकीं—आनंदधामीं **आनंदीबाईस** भेटण्यासच कीं काय—गेलेला आढळला !

# तिघे वनवासी.

भक्ति भावें करी बैसोनि निश्चित । नको गोवूं चित्त प्रपंचासी ॥१॥
नको करूं कांहीं देवतापूजन । जपतप ध्यान तेंही नको ॥ २ ॥

तुकाराम.

बौद्ध* धर्माच्या भरभराटीचा काळ. बौद्ध भिक्षु स्वधर्म प्रसारार्थ सर्व पृथ्वीभर फिरत होते. अशा वेळीं एक नौका **नवद्वीपास** जात होती.

---

* बौद्ध धर्माचा प्रसार किती ठिकाणीं झाला, हें पुष्कळ वाचकांस ठाऊक नसण्याचा संभव आहे. ह्मणून, त्या विषयींची आमच्या वाचनांत आलेली माहिती आह्मी येथें देतों. या धर्माचा प्रसार **काबूल**, **सुमात्रा**, व **सिलोन** तों **सैबेरियापर्यंत** सर्व **आशियांत** तर झाला होताच, पण या बौद्ध भिक्षूंनीं **कोलंबस** जन्मण्याचे कित्येक शतकें आधीं ( इ० स० ५०० चे सुमारास ! ) **अमेरिकेंत** आपल्या धर्माची ध्वजा फडकविली होती. हा **अमेरिकेचा** शोध, **हिंदुस्थानांतून** पांच बौद्ध भिक्षु देशांतरास गेले होते, त्यांनीं लाविला. या प्रवासासंबंधीं **काबूलच्या** अधिकाऱ्यानें **चीनच्या** बादशहास पत्र लिहिलें होतें, तें पत्र **चीन**च्या राजवाड्यांत अजून जपून ठेविलें आहे ! या पत्र त्या अधिकाऱ्यानें **अमेरिकेच्या** प्रवासाची सविस्तर माहिती दिली असून, आपण स्वतः तेथें जाऊन बौद्ध धर्माचा पाया भक्कमरितीनें घालून आलों आहोंत, असेंही त्यांत लिहिलें आहे.

बौद्धांच्या शिल्पकलांचे व मूर्तींचे आज जे तेथें शेष सांपडतात, त्यासंबंधीं प्रो० **फ्रायर** यांनीं एक अप्रतिम लेख लिहिला आहे. त्यांत यासंबंधीं सविस्तर वर्णन केलें आहे. या लेखांत त्यांनीं **मेक्सिकोमध्यें** सांपडलेल्या बुद्धाच्या मूर्तीसंबधानेंहीं लिहिलें आहे. या मूर्तींपैकीं कांहीं मूर्ति तर **मेक्सिकोंतील** 'अजायबघरांत' (Museum) आहेत. त्या देशांतील पुष्कळ गांवांचीं व स्थानांचीं नांवें हीं बौद्ध नांवावरूनच पडलीं आहेत. उदाहरणार्थः Guatamala (**गौतमालय**) तसेंच '**शाक्य**' पासून Sacatapee, Sacanurss

तीं निरनिराळ्या ठिकाणीं उतरणारे बरेंच प्रवासी बसले होते. वारा अनुकूल असल्यामुळें नौकायनास अडथळा कसा तो मुळींच होत नव्हता. बरीच मंडळी नाविकाजवळ बोलत बसली होती. तो नाविक एका विविक्षित दिशेकडे बोट करून त्या मंडळीस कांहीं दाखवीत होता, व ती मंडळी त्या दिशेकडे पहात होती. त्या नौकेंत **वसुभूति** या नांवाचा एक बौद्ध भिक्षु बसला होता. त्याला **नवद्वीपास** धर्मप्रसारार्थ जावयाचें होतें. तोही त्या जमलेल्या मंडळीकडे आला व त्याच दिशेकडे पाहूं लागला. पण त्याला तेथें समुद्राच्या चकचकण्याशिवाय कांहीं दिसेना. ह्मणून तो त्या मंडळीच्या जवळ जवळ जाऊं लागला. त्याला पाहून मंडळी आदरानें दूर झाली. तो ह्मणाला " सद्गृहस्थहो, असें दूर होण्याचें कांहीं कारण नाहीं. आपणास मजकडून कांहीं त्रास होऊं नये अशी माझी फार इच्छा आहे. (त्या नाविकाकडे वळून) हा सद्गृहस्थ काय ह्मणत आहे, तें ऐकावयास मी येथें आलों आहे."

तेथें जमलेल्या मंडळींत एक बराच धीट मनुष्य होता, तो **वसुभूतीस** ह्मणाला, " महाराज, हा नाविक आह्मांला अरण्यवासी लोकांविषयीं कांहीं सांगत होता, इतक्यांत आपण येथें आलांत."

" कोणचे अरण्यवासी लोक? मलाही त्यांची माहिती ऐकावयाची आहे. तुम्ही कोणत्या दिशेकडे बोट दाखवीत होता!" **वसुभूतीनें** त्याच मनुष्याला प्रश्न केला.

त्या मनुष्यानें समुद्रक्षितिजावर काळ्या ठिपक्या सारखें कांहीं दिसत होतें त्याकडे बोट केलें, आणि तो ह्मणाला " तें बेट? मी बोट करितों

---

इत्यादि. तेथील बुद्धाच्या एका प्रतिमेवर Sakomon (" **शाक्यमुनि** ") असं कोरिलें आहे. **कोलंबसाला**, रानटी लोकांस न शोभणाऱ्या अशा कांहीं गोष्टी **अमेरिकत** दिसल्या, याचें कोडें आतां उकललें! हे रानटी लोक आपल्या धर्मगुरुला अजूनही " **लामा** " ह्मणतात इकडे, व आजलाही त्यांच्या आश्रमांत आश्चर्यकारक वस्तु सांपडतात इकडे, लोकांनीं आपलें लक्ष पुरवावें, अशी **प्रो० फ्रायर** यांची सूचना आहे. अनादि कालापासून प्रत्येक धर्मकार्यांत आरंभस्थान पटकावणाऱ्या "**गणोबांची**" मुर्तिही या वस्तूंत सांपडली आहे!

"**पंजाबी**"वरून घेतलेला उतारा–"**हिंदुपट्रिअट**" १३ सप्टेंबर १९०९.

तिकडे पहा. तें बेट तुह्माला दिसत नाहीं काय? त्याच बेटांत ते अरण्यवासी मुक्तीसाठीं रहात आहेत."

**वसुभूति** त्या दिशेकडे पहात म्हणाला, "तुम्ही कोणचें बेट म्हणतां? मला तर त्या दिशेकडे कांहीं एक दिसत नाहीं."

"आपण या माझ्या बोटाच्या अनुरोधानें पहावें. तेथें क्षितिजाजवळ आपल्याला काळा ढग दिसत नाहीं काय? त्या ढगाखाली किंचित् डावीकडे एक काळा ठिपका आहे, तेंच तें बेट होय." तो मनुष्य म्हणाला.

त्या दिशेकडे **वसुभूतीनें** फार काळजीपूर्वक पाहिलें. पण लांबवर पाहण्याची त्यांस संवय नसल्यामुळें, त्याला कांहीं एक दिसेना. सूर्यबिंबामुळें चकचक करीत असलेल्या पाण्या शिवाय त्याला तेथें कांहीं एक दिसलें नाहीं. शेवटीं तो कंटाळून म्हणाला "तुम्ही काय सांगतां, तें मला कांहीं दिसत नाहीं. असो. पण तेथें रहात असलेले ते अरण्यावासी कोण आहेत?"

नाविक म्हणाला "ते कोणी पुण्यवान् लोक आहेत. मी त्यांजविषयीं कित्येक दिवस ऐकत होतों. पण गेल्याचे मागील वर्षींच काय तो मला त्यांना पाहण्याचा सुयोग आला."

"तुम्हाला तिकडे जाण्याचा योग कसा काय आला, हें मला सांगाल काय?"

नावाडी म्हणाला, "मी आपण होऊन तिकडे गेलों नाहीं; तर मजवर तसाच कांहीं प्रसंग आला होता." असें म्हणून त्यानें तो प्रसंग आपणावर कसा काय आला, हें त्यास निवेदन केलें. त्याचा सारांश:—एके दिवशीं रात्रीं समुद्र खवळला असतां तो नावाडी रस्ता चुकला; आपण कोठें आहोंत हें त्यास कळेना. रात्र झाली, पण जमीन लागण्याचें चिन्ह दिसेना. तशांत रस्ता अनोळखी. मध्यरात्रीं त्याची नांव एका खडकावर आपटली व तो त्या खडकावर जाऊन आदळला. सकाळीं शुद्धीवर येऊन पाहतो, तों त्यास कळलें कीं, आपण एका बेटावर आहोंत. मग तो त्या बेटावर इकडे तिकडे फिरत असतां, त्यास एक झोंपडी दिसली. तीजवळ एक वृद्ध मनुष्य

उभा होता. कांहीं वेळानें त्या झोंपडीकडे आणखी दोन मनुष्यें आलीं. त्यांनीं नावाड्यास खावयास कंदमुळें दिलीं, त्याचीं वस्त्रें वाळविलीं, आणि त्याची नांव पूर्ववत् चांगली करून दिली. याप्रमाणें त्यांनीं त्याच्या सर्व अडचणी दूर करून मग त्यास वाटे लाविलें.

ही सर्व हकीकत ऐकून **वसुभूति** विचारितो, " ते लोक कसे दिसतात बरें ? "

नावाडी म्हणाला, "त्या तिघांपैकीं एक लहान असून वांकलेला आहे. तो फार वृद्ध आहे. मला वाटतें, त्याच्या वयास कमींत कमी शंभर वर्षें तर सहज लोटलीं असावींत. तो इतका वृद्ध आहे कीं, त्याच्या पांढऱ्या दाढीस जरा जरा हिरवट रंग येऊं लागला होता. त्याचे आंगांत हरिणाजिन होतें. त्याचें तोंड हंसरें असून त्यावर सुर्याचें तेज झळकत होतें. दुसरा त्याहून उंच पण म्हाताराच होता. त्याचे आंगांत व्याघ्राजिन होतें. त्याची दाढी ऐसपैस असून तिचा रंग पिंगट होता. तो फार मजबूत होता. त्यानें माझी नाव पाण्यांत सहज लीलेनें भिरकविली. तो दिसण्यांत दयाळु आणि आनंदी आहे. तिसरा दुसऱ्यापेक्षांही उंच आहे. त्याची दाढी बर्फाप्रमाणें पांढरी शुभ्र असून ती त्याच्या गुडघ्यापर्यंत लोंबत होती. त्याची मुद्रा उग्र असून भ्रुकुटी ताठलेल्या होत्या. त्याचे आंगांत कांहींही नव्हतें. मात्र कटीभोंवतीं कसलेसें एक कातडें होतें."

**वसुभूतीनें** ही सर्व हकीकत लक्षपूर्वक ऐकिली, व त्यानें त्या नाविकास विचारिलें, " ते कांहीं बोलले काय ? "

"त्यांनीं बहुतेक वेळ आपलें काम निमूटपणें केलें. ते आपसांतही क्वचितच् बोलत. त्यांच्यापैकीं एखादा नेत्रसंकेत करी आणि बाकीच्या दोघांस त्यांचें मनोगत समजे. सर्वांत जो उंच होता, त्यास मी विचारलें 'तुम्ही येथें बरेंच दिवसांपासून राहतां काय?' हा माझा प्रश्न ऐकून त्यानें कपाळास आठ्या घातल्या, आणि आपण रागावलों आहोंत, हें दाखवावयास तो कांहीं पुटपुटला. सर्वांत जो वृद्ध होता, त्यानें त्या वृद्ध मनुष्याचा हात धरिला, आणि आपण हांसला. तोंच त्याचा राग गेला. तो वृद्ध 'आम्हांवर दया करा' इतकें म्हणून पुनः हांसला."

याप्रमाणें त्या नाविकाचें भाषण चाललें असतां, ती नाव त्या बेटाजवळ जवळ चालली.

मागचा धीट गृहस्थ पुनः तिकडे बोट करीत म्हणाला, "महाराज, आतां जर आपण इकडे पाहिलें, तर तें बेट आपणांस खास दिसेल असें मला वाटतें."

वसुभूतीनें त्या दिशेकडे पुनः पाहिलें. आतां त्याला खरोखरच तो काळा ठिपका—बेट—दिसला. तिकडे क्षणभर पाहून तो नावाड्यास विचारितो, "या द्वीपाचें नांव तुम्हाला माहीत आहे काय?"

नावाडी उत्तर करितो, "या बेटाला नांव असें कांहींच नाहीं. कारण या भागांत यासारखीं शेकडों लहान लहान द्वीपें आहेत. त्या प्रत्येकाला कोठवर नांवें देत बसणार?"

"तेथें वास्तव्य करीत असलेले अरण्यवासी मोक्षप्राप्तीसाठीं सारखा प्रयत्न करीत असतात, हें खरें आहे काय?" वसुभूतीनें प्रश्न केला.

"महाराज, लोक असें म्हणतात. पण त्यांत तथ्य कितपत आहे, हें कांहीं मला माहीत नाहीं. माझ्यासारख्या पुष्कळ नावाड्यांनीं त्यांना पाहिलें आहे. पण त्यांनांही, आपण जें विचारितां, तें कांहीं माहीत नाहीं."

"या बेटांत उतरून, त्या लोकांस पहावेसें मला फार वाटतें; पण हें जुळेल कसें?"

नावाडी म्हणाला, "ही नाव फार मोठी असल्यानें आम्हाला तिराजवळ जातां यावयाचें नाहीं. पण लहान डोंग्यांतून तिकडे कांहीं मंडळीस जातां येईल."

वसुभूति म्हणाला, "माझ्या मनांतून ते तीन अरण्यवासी मुनी पहावयाचे फार आहे"

वसुभूतीनें तेथें जाऊं नये म्हणून त्याचें मन वळविण्याचा नावाड्यानें पुष्कळ प्रयत्न केला. तो म्हणाला "मला आपल्याला तेथें पोंचवितां येईल हें खरें आहे, पण नवद्वीपास जाण्याकरितां इतके लोक बसले आहेत, त्यांचा वेळ व्यर्थ जाईल. महाराज, त्या लोकांना पाहण्यास्तव आपण जे परिश्रम घेणार आहांत, ते परिश्रम घेऊन त्यांच्यांत पाहण्याजोगें कांहीं नाहीं! कांहीं लोकांकडून मी तर असें ऐकिलें आहे कीं, ते म्हातारे महामूर्ख असून चातुर्यहीन आहेत. मी आपणाला फार काय सांगू! हे समुद्रांतले मासे जितकें भाषण करितात, त्यापेक्षां ते म्हातारे फारसे ज्यास्त भाषण करीत नाहींत!"

**वसुभूति** म्हणाला, “ त्यांना पाहण्याची मला फार इच्छा आहे. मी तुमचे श्रम वांयां जाऊं देणार नाहीं, इतकेंच नव्हे, तर तुमचें जें नुकसान होईल तेंही मी भरून देईन. मला एक डोंगा द्या. ”

आतां, नावाड्याची हरकत ती काय असणार! लोकांचाही कल सात्विक वृत्तीकडे ज्यास्त असल्यानें, **वसुभूतीच्या** जाण्यासंबंधानें त्या नाविकास कोणी कांहीं बोललें नाहीं. तो त्या द्वीपांत उतरणार, म्हणून लोकांची गर्दी त्याच्याजवळ पुष्कळ जमली. सर्व लोक त्या बेटाकडे पाहूं लागले. त्यापैकीं ज्यांची दृष्टी तीक्ष्ण होती, त्यांना त्या बेटावरील खडक आणि त्यावर असलेली झोंपडीही दिसली. सरते-शेवटीं एका मनुष्याला त्यावरील अरण्यवासीही दिसले. तो म्हणाला, “ नावाड्यानें सांगितलेल्या सर्व खाणाखुणा जमतात. तें तेथें–ते तिघेही तीरावर आहेत. त्यांच्या उजव्या बाजूला तो खडकही दिसत आहे. ( **वसुभूतीला** उद्देशून ) मी येथें उभा आहें, येथें येऊन जर आपण पाहिलें, तर मी काय म्हणतों तें सर्व आपल्याला दिसेल. ”

**वसुभूति** तेथें उभा राहून पाहूं लागला. त्याला तो उंच, ठेंगणा व वांकलेला असे तिघेही वनवासी हातांत हात घालून उभे असलेले दिसले.

नावाडी ह्मणाला, “आतां ही नाव बेटाकडे यापेक्षां ज्यास्त जवळ जाऊं शकणार नाहीं. आतां आपल्याला तिकडे जावयाचेंच आहे, तर आपण येथूनच डोंग्यांतून जावें. आपला डोंगा परत येईपावेतों आम्हीं ही नाव येथेंच उभी करितों. ”

**वसुभूति** त्या बेटाकडे जावयास डोंग्यांत बसून निघाला. तो जेव्हां बेटाजवळ दगडाचे फेकींत गेला, तेव्हां त्याला हरिणाजिन घातलेला, व्याघ्राजिन पांघरलेला, आणि तिसरा तो उंच, असे ते हातांत हात घातलेले तिघे अरण्यवासी उभे असलेले दिसले. कांहीं वेळानें तो डोंगा किनाऱ्यास लागला. **वसुभूति** त्यांतून उतरून बेटावर गेला. त्याला पाहतांच त्या तिघांनीं त्यास नमन केलें. त्यानें त्यांना आशीर्वाद दिला, हें पाहून त्यांनीं त्यास अधिक लवून नमन केलें.

**वसुभूति** ह्मणाला, “ मी असें ऐकिलें आहे कीं, तुह्मी येथें मोक्षप्राप्तीस्तव आला आहांत, आणि देवाचें स्तवन करीत असतां. मी

बुद्ध देवाचा एक पामर सेवक आहे, आणि त्याच्या कृपेनें मी लोकांस कांहीं धर्मज्ञान सांगत असतों. हे सत्पुरुषानों, मला तुह्मांला पहावयाची उत्कट इच्छा उद्भवली. ती पूर्ण होत आहे, हें पाहून मला फार आनंद झाला. आतां जमल्यास तुह्मांस कांहीं धर्मज्ञान सांगावें, अशी माझी फार इच्छा आहे. "

हें ऐकून ते वृद्ध एकमेकांकडे पहात हंसूं लागले. पण ते त्यावर कांहीं एक बोलले नाहींत.

**वसुभूति** म्हणाला " या बेटांत, मुक्तीस्तव आणि आपल्यास ईश्वराची सेवा घडावी यास्तव, तुह्मी काय काय करीत असतां ? "

हें ऐकून दुसऱ्या वनवाशानें एक सुस्कारा टाकिला, आणि सर्वांत जो वृद्ध होता त्याकडे पाहिलें. तो हांसत ह्मणाला " परमेश्वराची सेवा कशी करावी, हें आह्माला ठाऊक नाहीं. हे बुद्धसेवका, आह्मीं आमचीच सेवा करितों; आणि आपली उपजीविका करितों. "

" तें खरें. पण तुह्मी परमेश्वराचें स्तवन कसें करितां ? " **वसुभूतीनें** विचारिलें.

तो वृद्ध ह्मणाला " ऐक, आह्मीं परमेश्वराचें स्तवन कसें करितों ती–

**त्रिमूर्ति आह्मी त्रिमूर्ति तुह्मी आह्मां रक्षावें । "**

हे शब्द त्या वृद्ध मनुष्यानें जसे उच्चारिलें, तसें त्या तिघांनीं आपलें नेत्र आकाशाकडे लाविलें व ते तिघे एकदम म्हणाले—

**त्रिमूर्ति आह्मी त्रिमूर्ति तुह्मी आह्मां रक्षावें ।**

**वसुभूति** हंसला आणि म्हणाला, " यावरून हें उघड दिसतें कीं, तुम्हीं दत्तमहाराजाविषयीं कांहींतरी ऐकिलें असावें. मला वाटतें, तुमच्या प्रार्थनेंत बरेच दोष आहेत. तथापि, हे संतानों ! तुमचा भाव पाहून माझें प्रेम तुमच्यावर बसलें आहे. तुमच्या एकंदर प्रकारावरून आपण परमेश्वराची स्तुति करावी, त्यास संतुष्ट करावें, ही जी तुमची इच्छा ती मला समजली. तथापि त्याची सेवा कशी करावी, हें तुम्हांला अवगत नाहीं. तसेंच तुमचा स्तवनाचा मार्गही चुकला आहे. मी तो तुम्हांला सांगतों, ऐका. हे सत्पुरुषांनों, मी जो मार्ग तुम्हांला सांगणार आहे, तो

माझा स्वतःचा नसून, तो धर्मग्रंथांत सांगितलेला आहे. सर्व लोक त्याचेंच अनुकरण करितात."

नंतर **वसुभूतीनें बुद्धदेव** कोण होते, त्यांनीं लोकांचें कल्याण व्हावयास काय काय केलें, त्यानीं स्थापिलेल्या धर्माचा प्रसार कसा झाला, हें सर्व त्यांस सांगितलें. तो म्हणाला, "तो आमचा आदिगुरु होय. त्यानें स्थापन केलेलाच धर्म काय तो शाश्वत आहे. म्हणून त्याला आपण शरण गेलें पाहिजे. पुनः हेंही लक्षांत असूं द्या कीं, **बुद्ध**, धर्म, किंवा संघ हे केवळ प्रार्थनेनें आपल्यास तारणार नाहींत. ही त्रयी आदर्श म्हणून डोळ्यांसमोर ठेवावी. हे सत्पुरुषांनो, मनुष्यमात्रास जी मुक्ति मिळावयाची ती केवळ त्यांच्या प्रयत्नाच्या सामर्थ्यावरच अवलंबून आहे. मोह, लोभ, द्वेष इत्यादि रिपूंचें समूळ निर्मूलन करा, ह्मणजे तुम्हाला मोक्षाची प्राप्ति सत्वर होईल."

हें भाषण ते वनवासी लक्षपूर्वक ऐकत होते; पण त्याचा प्रकाश त्यांच्या मनावर कितपत पडला, तें हरि जाणे ! पण ही गोष्ट **वसुभूतीच्या** लक्षांत मुळींच आली नाहीं. त्याचें सारें लक्ष आपल्याच भाषणांत होतें. तो म्हणाला, "मीं सांगितलें तें नीट लक्षांत ठेवा. व मी म्हणतों तें म्हणत जा. हं—'**बुद्धं** शरणं गच्छामि'—म्हणा—"

पहिला म्हणाला, "**बुद्धं** शरणं गच्छामि"

पण, दुसऱ्यानें ते शब्द उच्चारतांना पुष्कळ चुका केल्या. आणि तिसऱ्याला तर ते शब्द शुद्ध रितीनें उच्चारतांच येईनात. त्याच्या डोईवरील जटा तोंडावर आल्यानें, तशांत त्याच्या तोंडांत एकही दांत नसल्यानें त्याचा शब्द साफ येईना.

**वसुभूतीनें** पुनः तेच शब्द उच्चारिले. आणि त्या वृद्ध वनवाशांनीं त्याचें अनुकरण केलें. तो एका दगडावर बसला, व ते तिघे त्याच्या तोंडाकडे पहात तो जें काय ह्मणे, तें उच्चारीत त्याच्या समोर उभे राहिले. त्यानें या कामीं सर्व दिवसभर परिश्रम केले. त्या तिघांना स्पष्ट ह्मणतां यावे ह्मणून त्यानें एक शब्द एकदां, दहादां पन्नासदां, शंभरदां, वाटेल तितक्यांदा उच्चारावा, पण तो त्यांच्याकडून शुद्ध ह्मणवून घ्यावा. त्यांनीं प्रमाद करावे, आणि यानें ते पुनः पुनः शुद्ध करावे. याप्रमाणें त्यानें त्यांस जेव्हां सर्व प्रार्थना व मागें सांगितलेला उपदेश शिकविला, व ते नुसते शुद्धच ह्मणणार नाहींत, तर आपण येथून गेल्यानंतर याचें

६

चांगलें स्मरण ठेवतील, अशी आपली खात्री करून घेतली, तेव्हां त्यांस सोडिलें. मधल्यास प्रार्थना लवकर आली आणि तो ती घडाघड ह्मणूंही लागला. **वसुभूतीनें** त्याकडून ती पुनः पुनः ह्मणवून घेतली. त्याचें ऐकून दुसरे दोघेही ती ह्मणूं लागले.

ह्या सुमारास सूर्यास्त होऊन चंद्रोदय झाला. चंद्रबिंबाचें पाण्यांत परावर्तन पडूं लागलें. मग **वसुभूतीनें** त्यांचा निरोप घेतला. त्या तिघांनीं जमीनीपर्यंत लवून त्यास नमन केलें. त्यानें त्या तिघांस उचलून धरिलें व प्रेमभावानें आलिंगन दिलें. नंतर 'मी सांगितल्याप्रमाणें नित्य प्रार्थना करीत जा व वर्तत जा,' असें सांगून तो डोंग्यांत बसला व पुनरपि आपल्या नावेकडे निघाला.

तो नावेकडे येत असतांना ते तिघे वृद्ध मोठमोठ्यानें प्रार्थना ह्मणत होते. ती सर्व **वसुभूतीस** अगदीं स्पष्टरीतीनें ऐकूं येत होती. ती होडी जसजशी नावेकडे येऊं लागली, तसतसें त्यांचें ह्मणणें कमी कमी ऐकूं येत, शेवटीं मुळींच ऐकूं येईनासें झालें. तथापि चंद्रप्रकाशांत ते तिघे—सर्वांत ठेंगणा मध्यें, उजवीकडे सर्वांत उंच, व डावीकडे मधला, असें उभे असलेले अद्यापि दिसत होते. **वसुभूति** नावेंत बसला व ती चालूं झाली. तो नावेच्या मागल्या बाजूस बसून त्या द्वीपाकडे पहात होता. कांहीं वेळपर्यंत त्यास ते तिघेही दिसत होते. कांहीं वेळानें ते दिसेनासे झाले. तथापि तें बेट अजून दिसतच होतें. सरते शेवटीं तेंही दिसेनासें झालें. आतां त्याला त्या बाजूला चंद्रकिरणें पाण्यावर नृत्य करीत असलेलीं दिसत होतीं.

रात्र जास्त होऊं लागली तशी बहुतेक मंडळी निजूं लागली. **वसुभूतीला** मात्र झोंप घ्यावीशी वाटेना. तो त्या वृद्ध वनवाशांसंबंधानें विचार करीत त्या बेटाच्या दिशेकडे पहात होता; आणि मनांत तो विचार करीत होता, "प्रार्थना व मोक्षाचें साधन हें आतां आपल्याला चांगलें अवगत झालें, हें पाहून त्यांना फार आनंद होत असेल." अशा लोकांकडे आपल्याला सुदैवानें जाण्याचा प्रसंग आला, याबद्दल त्यानें **बुद्धदेवाचे** फार उपकार मानिले.

याप्रमाणें विचार करीत त्या दृष्टिआड झालेल्या बेटाच्या दिशेकडे पहात **वसुभूति** बसला होता. चंद्रप्रकाश पाण्यावर परावर्तन

त्याच्या नेत्रासमोर चकचक करीत होता. जणूकाय चंद्रानें आपल्या किरणांची पांढरी शुभ्र चादरच समुद्रावर घातली होती. कांहीं वेळानें त्याला त्या चादरीवरुन कांहीं पांढरेंच आपणाकडे येत आहे, असें दिसलें. तो समुद्रांतील एखादा प्राणी आहे, अथवा एखादी लहान नाविका आहे, याचा त्यास निर्णय करितां येईना. त्याला अतिशय आश्चर्य वाटून तो त्या दिशेकडे लक्ष लावून पाहूं लागला. तो स्वगत ह्मणाला, "ती आपल्या मागून येणारी एखादी नाव असावी. मात्र इतकेंच कीं, ती नाव या नावेपेक्षां त्वरेनें येत आहे. पळापूर्वीं ती किती मागें होती! व आतां पहावें तों ती किती तरी जवळ आली आहे! (लक्षपूर्वक पाहून व जरा थांबून) छेः छेः! ती नाविका खास नव्हे! कारण नाविकेची गति इतकी कोठून असणार! पण तें कांहींका असेना? आह्माला गांठावयास तें फार त्वरेनें येत आहे, इतकें मात्र खचित्."

तें काय आहे, याचा वसुभूतीस उलगडा होईना. ती नाव नव्हती, पक्षी नव्हता, किंवा समुद्रांतील एखादा प्राणीही नव्हता. त्यानें नावाड्यास हाक मारिली आणि त्याला विचारिलें, "गड्या, तिकडे पहा, तें काय आहे तें?" हें वाक्य उच्चारित असतांच तें काय आहे याचा वसुभूतीस उमज पडला, तथापि त्यानें आपलें वाक्य पूर्ण केलेंच. ते तिघे वृद्ध वनवासी होते! वसुभूतीस गांठावयाचें ह्मणून ते समुद्रावरून पळत येत होते. हा प्रकार पाहून नावाडी भयाभीत झाला. तो ह्मणाला, "अरे बापरे! हे लोक तर जमीनीप्रमाणेंच पाण्यावरून पळत येत आहेत!"

या गडबडीनें इतर उतारू जागे झाले, आणि तेथें बरीच गर्दी जमली. ते अरण्यवासी हातांत हात घालून व बाजूचे दोघे 'नाव थांबवा, नाव थांबवा' असें खुणवीत पळत येत होते. ते तिघेही चालतांना पाऊलें टाकीत नव्हते, तर उतारावर ज्याप्रमाणें मनुष्य घसरतो, त्याप्रमाणें त्यांचीं पाऊलें पाण्यावर घसरत होतीं. नाव थांबविण्यापूर्वीच ते तिघे तेथें आले, आणि एका सुरांत ह्मणाले, "हे बुद्ध देवाच्या सेवका, तूं जी प्रार्थना आह्मांला शिकविलीस, ती आह्मी सर्व विसरून गेलों. जोंपर्यंत आह्मी ती पाठ ह्मणत होतों, तोंपर्यंत आम्हांला ती स्मरत होती. पण क्षणभर आम्ही म्हणणें सोडिलें, तों त्या प्रार्थनेंतील एक एक शब्द आठवेनासा

झाला. आणि आतां तर तुह्मी सांगितलें त्यांतील आम्हांला कांहींच आठवत नाहीं. आम्हांला ती प्रार्थना पुनः शिकीव."

वसुभूतीनें त्यांना नमस्कार केला व तो त्यांस म्हणाला, "परमेश्वर-भक्तांनो, तुम्ही जी प्रार्थना करितां तीच त्याला मान्य आहे. तुमच्या चरित्रापासून मला पुष्कळ बोध झाला, तो हाः—त्याची प्रार्थना करितांना निरर्थक शब्द घालूं नये. अंतःकरणापासून जें निघेल तेंच उच्चारावें. आमच्या प्रार्थनेंत निरर्थक शब्द फार. मोठे लोक ते शब्द वापरतात म्हणून आम्हींही तेच उच्चारितों. आपली प्रार्थना कशी काय होते, इकडे आमचें लक्ष फार. जें कांहीं आपल्याला समजत नाहीं तें, व ज्याचें अर्थही ठाऊक नाहीं ते, असे निरर्थक भाग प्रार्थनेंत कधींही नसावे. आमच्या मनांत काय चाललें आहे, हें परमेश्वराला माहीत आहे. तो अर्थाकडे पहात नाहीं, भावाकडे पहातो. ज्यावर आपला भाव आहे तेंच आपण आचरावें, ह्मणजे आपणास हा भवसागर तरावयास सुलभ पडतें. संतांनों, मी तुह्मांला काय शिकविणार! तुम्हींच मला शिकविलें च माझे डोळे उघडिले." वसुभूतीनें त्यांना पुनः नमन केलें.

हें भाषण ऐकतांच त्या तिघांनीं आपली पाठ फिरविली; व ते त्या बेटा-कडे गेले. सूर्योदय होईतोंपर्यंत त्या बेटांतून सर्व रात्रभर तेजाचा सारखा प्रकाश पडत होता.

# आमुच्या जीवना प्रेमाचा आधार.

( १ )

पोट लागलें पाठींशीं । हिंडवितें देशोदेशीं ॥ १ ॥
पोटाभेणें जिकडे जावें । तिकडे पोट येतें सवें ॥ २ ॥
जप-तप अनुष्ठान । पोटासाठीं जाले दीन ॥ ३ ॥
पोटें सांडियेली चवी । नीचापुढें तें नाचवी ॥ ४ ॥
पोट काशियानें भरे । तुका म्हणे झुरझुरू मरे ॥ ५ ॥

सुमारें चाळीस वर्षें झालीं, **पंढरपुरास रामाजी** या नांवाचा एक चांभार रहात असे. तो घरचा फार गरीब असल्यानें, आपला संसार कसाबसा चालवीत असे. पुढें कांहीं दिवसांनीं दक्षिणेंत एक मोठा दुष्काळ पडला, त्या दुष्काळांत त्यास आठ आठ दिवस खावयास नीट अन्नही मिळूं नये. मूठभर चणे खावयास मिळाले, म्हणजे नशीब समजावयाचें. अशा स्थितींत काल कंठण्यापेक्षां आपल्याला मरण येईल तर बरें, असें त्यास वाटे. पण तें त्याच्या हातचें नव्हतें. तो रोज **विठोबाच्या** दर्शनास जावयाचा व त्याला आपली दुःखद कहाणी सांगावयाचा. त्याच वेळीं **श्रीधरपंत** या नांवाचे एक गृहस्थ **विठोबाच्या** दर्शनास नित्य येत असत. त्यांनीं या गृहस्थास तेथें रोज पहावें, यामुळें तो त्यांच्या परिचयांतला झाला होता. एक दोनदां तर त्यांनीं **रामाजीचे** करुणा उत्पन्न करणारे शब्द ऐकिले, त्यामुळें त्यांना त्याची दया आली. **श्रीधरपंत** हे **इंदूरचे**, पण कांहीं कामानिमित्त ते **पंढरीस** गेले होते. ते त्यास म्हणाले:—

“ तूं माझ्याबरोबर **माळव्यांत** चलतोस काय ? तेथें दक्षिणी जोडे करणारा कोणीही नाहीं; पुन्हां इकडच्यापेक्षां तिकडे स्वस्ताईही फार आहे. मग काय, तुझा विचार ठरतो तें मला सांग. ”

हे शब्द ऐकून **रामाजीनें विठोबाकडे** पाहिलें. त्याचें तें पाहणें फार केविलवाणें होतें. तो म्हणाला, “ या पोटासाठीं, हे **पंढरीनाथा !**

मला तुला सोडण्याचा प्रसंग यावा ना ? " त्याच्या डोळ्यांतून अश्रु येऊं लागले. बरें, त्यानें 'येत नाहीं' असें तरी कोणच्या भरंवशावर सांगावयाचें ? तो श्रीधरपंतास म्हणाला, "महाराज, माझा विचार काय ठरतो, तें मी तुम्हाला एक दोन दिवसांत कळवीन."

यावर श्रीधरपंत म्हणाले, " मी या शहरांत आणखी आठ एक दिवस आहे. तोंपर्यंत तूं खुशाल विचार कर. व नंतर जो काय तुझा विचार ठरेल, तो मला येऊन कळीव."

इतक्या वर्षे तो पंढरीस राहिलेला, तशांत पंढरीनाथाचा पराकाष्ठेचा भक्त. पण करणार काय ! या पोटापुढें कोणाचा इलाज चालतो ? त्याचा पंढरींतून पाय निघेना. पण कांहीं इलाज नाहीं म्हणूनच त्यानें श्रीधरपंताच्या म्हणण्यास रुकार दिला. प्रथम सासरीं जातांना जी मुलींची स्थिति होते, तीच स्थिति पंढरी सोडतांना रामाजीची झाली. त्याचें यथार्थ वर्णन तुकारामबोवांनीं केलें आहे. ते म्हणतात—

कन्या सासऱ्यासी जाये । मागें परतोनी पाहे ॥ १ ॥
तैसें जालें माझ्या जीवा ॥ कधीं भेटसी केशवा ॥ २ ॥
चुकलिया माये । बाळ हुरुहुरु पाहे ॥ ३ ॥
जीवना वेगळी मासोळी । तुका तैसा तळमळी ॥ ४ ॥

---

## ( २ )

देवाची पूजा हे भूतांचें पालण । मत्सर तो सीण बहुतांचा ॥ १ ॥
रुसावें फुगावें आपुलीया वरी । उरला तो हरी सकळही ॥२॥
तुका म्हणे संतपण याचीं नांवें । जरी होय जीव सकळांचा ॥३॥

रामाजीला इंदुरास येऊन आतां वीस वर्षे झालीं होतीं. इतक्या अवधींत स्वतःच्या मालकीचें त्यानें एक घर बांधिलें होतें. तो दरवर्षी आपल्या बायकोमुलांसह पंढरपूरच्या वारीस जात असे. पहिले पहिले त्यास जसा पैसा मिळाला तसा पुढें मिळेनासा झाला. तशांत पंचवीस रुपये तर त्याच्या वारींत खर्च हें व्हावयाचेच. म्हणून त्यास पुन्हां

पैशाची मारामार पडूं लागली. आंगास कपडालत्ता नीट न मिळो, तथापि त्यास पोटास मात्र खावयास भरपूर मिळे.

**रामाजी**चें घर छावणींत होतें. तो नवीन तऱ्हेचे जोडे करावयास शिकला व त्यांचाही खप बाजारांत होऊं लागला. त्याला जी कांहीं प्राप्ति होई, ती बहुतेक खाण्यापिण्यांतच जाई. त्याच्यापाशीं कपडेही नीट नव्हते. हिंवाळ्याच्या दिवसांत, आंगांत घालावयास, नवराबायकोस मिळून एकच डगलें होतें. तें तरी नीट असावयाचें होतें! पण त्याच्या चिंध्या झाल्या होत्या. "येत्या हिंवाळ्यांत आंगांत घालावयास कांहीं तरी जरूर करूं," असा बेत करून त्यांना एक वर्ष झालें होतें, व दुसऱ्या हिंवाळ्यास प्रारंभही झाला होता. डगलें करावयाचें तर जवळ कांहीं पैसे पाहिजेत, म्हणून त्यानें पांच रुपये जमविले होते. ते बायकोनें ज्वारीच्या माटांत बुडाशीं चिंध्यांत बांधून लपवून ठेविले होते. हिंवाळ्यासाठीं जें डगलें करावयाचें, तें तो कातड्याचें करणार होता. त्या डगल्यासाठीं **गुणाई**नें त्यास रोज टोमणे मारावे, पण याची त्यास संवय झाल्यानें तो तें काम चालढकलीवर टाकूं लागला.

एके दिवशीं **रविवारीं**, तो फार पहांटेस उठला, व कातडें खरेदी करावयाचें म्हणून लवकर निघण्याच्या तयारीस लागला. त्यास **महू** गावांत हाटास जावयाचें होतें. तें गांव कांहींसें लांब असल्यामुळें आपणास परत यावयास बराच वेळ होईल, म्हणून त्यानें न्याहारी केली व आठ आण्याचे पैसे घेऊन तो हाटास जाण्यास निघाला. जातांनां तो मनाशीं विचार करुं लागला, "आठ आण्याचे पैसे पुष्कळ झाले. कारण, मला पाटलांपासून दहा रुपये घेणें आहे. ते व हे मिळून आपलें काम सहज भागेल." ज्या गावांत हाट भरत असे, त्याजवळच्या खेड्यांतच त्याचीं कुळें राहत असत.

कांहीं वेळानें **रामाजी महू** गांवांत पोहोंचला. तेथें गेल्याबरोबर तो आपल्या एका कुळाकडे गेला. त्याच्या टापऱ्याजवळ पोहोंचतांच '**दौला** पटेल हो **दौला** पटेल,' अशा त्यानें हांका मारिल्या, पण ओ देतो कोण! त्यानें पुष्कळ कंठशोष केला, तेव्हां एकदाचें दार उघडलें. पाहतो, तों ती **दौला** पटेलाची बायको होती. ती त्यास म्हणाली, "पटेल सध्यां घरीं नाहींत. ते मोठ्या पहांटेसच कोणीकडे निघून गेले

तें **राम** जाणें. पण जातांना ते मला सांगून गेले कीं, ‘ आज **रामाजी** रुपये मागावयास बहुतेक येईल. पण त्याला सांग कीं, सध्यां सवड नाहीं. पण यापुढें चालढकल न करितां, मी पुढच्या आठवड्यांत तुम्हांला रुपये खचित् देईन. पुढेंही हाटासाठीं त्याला येथें यावेंच लागेल तर म्हणावें जातांना रुपये घेऊन जा. ”

हें ऐकून **रामाजी** म्हणाला, “ पाटील जेडे तर मोठ्या तगाद्यानें घेऊन जातात ! व पैसे देतांना ‘ आतां या, मग या, ’ असें म्हणतात ! आतां या हाटांत चामडें तरी कशाचें घेऊं, व घरीं पोराबाळांस खायला तरी काय घालूं ? ”

“ हें सर्व खरें, मला काय अडचणी कळत नाहींत ! पण मी तरी बाई काय करणार ? आतां असें करा, पुढच्या वेळेस ते जाण्याच्या आधींच येथें या, व त्यांचा चांगला पिच्छा पुरवा. आजही ते भेटले असते; पण तुम्ही कीं नाहीं जरा उशीरानेंच आलां. नाहींतर त्यांची भेट खचित् झाली असती. म्हणून मी सांगतें, पुढील खेपेस उशीरां येऊं नका. नाहींतर पैसे मिळणार नाहींत. कारण ते माझ्या हातांत कांहींएक ठेवीत नाहींत. न जाणों मी तुम्हांस देईन म्हणून ! घरांतला प्रकार कोणालाही कांहीं सांगूं नये. पण---पण सांगतेंच झालें ! ”

या भाषणानें **रामाजी** आनंदला. गरीब बिचारा ! त्या बाईनें केलेली लबाडी त्याचे लक्षांत आली नाहीं. तो म्हणाला “ बरें, पुढच्या वेळीं ह्यापेक्षांही लवकर येईन. ” असें म्हणून तो दुसऱ्या कुळाकडे जावयास निघाला, व इकडे बाईनें दरवाजा लाविला, आणि झालेली हकीगत घरांत येऊन नवऱ्याला सांगितली.

**रामाजी** दुसऱ्या कुळाकडे गेला. या स्वारीनें **म्हसोबाची** शपथ घेऊन सांगितलें कीं, “ **रामाजी**, काय सांगूं ! प्रत्येक वेळीं तेंच्या तेंच सांगितलें, तर तुला खोटें वाटेल. मलाही तसेंच वाटलें असतें. पण तुला अगदीं खरें सांगतों, मजजवळ सध्यां कांहीं नाहीं. नाहीं म्हणावयास चार आणे आहेत. खोटें वाटत असेल तर घरांत येऊन पहा. ” असें म्हणून त्यानें **रामाजी**पुढें चार आणे टाकिले.

या कुळानें त्यास आज आठ आठवडे सारखें चाळविलें होतें. शेवटीं याची त्यास लाज वाटूनच कीं काय, त्यानें त्यास चार रुपयांपैकीं आज

चार आणे दिले ! मग तो तिसऱ्या कुळाकडे गेला. पण त्याच्या झोंपडीस कुलूपच होतें ! त्याला एकंदर दहा रुपये घेणें होतें, पण त्यांपैकीं चार आणेच काय ते वसूल झाले. त्यानें असा विचार केला कीं, आपण प्रत्येक आठवड्यास एकाच दुकानदाराकडून कातडें खरेदी करितों, म्हणून तो आज आपल्याला उधारीवर माल देईल. असा विचार करून तो हाटांत गेला, व तेथें त्या दुकानदारास प्रश्न केला कीं, उधारीवर चामडें देतोस काय ? पण त्यानें उत्तर केलें, "तुझी माझी तोंडओळख आहे खरी, पण इतक्यानेंच मी तुझ्यावर कसा विश्वास टाकूं ?"

हें ऐकून तो स्वगत म्हणाला, "माझ्यापासून सर्व लोक उधारीवर माल नेतात; पण मला मात्र कोणीही उधारीवर माल देत नाहीं ! दिवसभर मरमर मरावें; पण पुरते पैसेही मिळत नाहींत ! मी तर अशा अडचणींत आहें, व उधार दिलेले पैसे मागावयास गेलों कीं, पाटील म्हणतात, 'मजजवळ द्यावयास पैसे नाहींत.' नसतील. पण त्यांच्याजवळ खावयास अन्न, मालकीची जमीन, भाजीपाला, झालें, गुरेंढोरें सर्व कांहीं आहेत. पण माझी वाट काय ! आजकाल संसार वाढल्यानें नुसत्या भाकरी खाल्ल्या तरी पांच आणे पुरत नाहींत." असा विचार करीत तो रिक्तहस्तें घराकडे परत यावयास निघाला.

या वेळेस **बडेसाहेबांच्या** बागेकडे वांक घेऊन जो रस्ता निघतो, तेथें **रामाजी** होता. तेथें झाडांची फारच गर्दी आहे. त्यानें सहज समोर पाहिलें, तों त्यास एका विस्तीर्ण वृक्षाच्या मागें कांहीं पांढरें दिसलें. संध्याकाळची वेळ. तशांत वृक्षांची घनदाट छाया असल्यानें तेथें प्रकाश चांगला पडला नव्हता, म्हणून **रामाजी** तिकडे डोळे ताठून पाहूं लागला. पण तें काय आहे हें कांहीं त्यास ओळखितां येईना. तो विचार करूं लागला, "या ठिकाणीं पूर्वीं कधीं पांढरा दगड नव्हता. पण छे, छे, हा दगड खचित् नव्हे, मग काय, बैल ? छे **बडेसाहेबांच्या** बागेंत आणि बैल ! हें शक्यच नाहीं. अन् तें जरी शक्य असलें, तरी तो बैलासारखा दिसत नाहीं. त्याला तर माणसासारखें डोकें दिसत आहे ! पण हें डोकें तर भारीच पांढरें दिसतें आहे ! मनुष्य म्हणावा, तर तो तेथें काय बरें करीत असावा ?" तें काय आहे, हें नीट दिसावें म्हणून

तो आणखी त्यासन्निध गेला, आणि त्याकडे पाहून म्हणाला, "खचित तो मनुष्यच आहे. मग तो मेलेला कां असेनां !"

तो खरोखरच मनुष्य होता. तो याप्रसंगीं मोठ्या शोचनीय स्थितींत असल्यानेंच कीं काय, दिगंबर स्थितींत बसला होता. तें पाहून रामाजीस भीतीनें घेरिलें. त्याला वाटलें, "याला कोणीतरी—चोरांनीं—लबाडून ठार मारिलेलें दिसतें. व आपला सुगावा लागूं नये म्हणून, त्या बहाद्दरांनीं ह्याला ह्या झाडाखालीं टाकून खचित् पळ काढला असावा मी जर या गोष्टींत हात घातला, तर भलतेंच एखादें लचांड गळ्यांत यावयाचें. त्यापेक्षां येथून पळ काढा कसा ! येथें नुसतें उभें राहण्याचो देखील चोरी आहे !"

रामाजीनें लागलेंच पाय उचलिले व तो तेथून कांहींसा लांब गेला; पण मागें वळून पाहण्याची त्याची जिज्ञासा कमी होईना ! त्यानें मागें वळून पाहिलें, तों तो मनुष्य पूर्वींसारखा बसला नसून आपल्याकडे पहात आहे, असें त्यास दिसलें. त्याला आतां पूर्वींपेक्षां ज्यास्तच भीति वाटली. तो मनांत विचार करूं लागला, "या मनुष्याकडे जावें, कीं पळ काढावा ! पण मी जर त्याच्याजवळ गेलों, तर एखादें संकट तर नाहींना उपस्थित होणार ! कोण व कसा मनुष्य आहे, कोणीं सांगावें ! तो मनुष्य चांगल्या उद्देशानें आलेला दिसत नाहीं. तसा असता, तर चोरट्या सारखा बसता ना ! मी त्याच्याजवळ जावें, व त्यानें माझा गळा दाबावा ! ह्मणजे सर्व कारभार आटपला ! उद्यांचें मरण आजच यावयाचें ! बरें, चोर ह्मणावा, तर नागवा बसला आहे ! त्याच प्रमाणें मजकडे पहातही आहे ! पण मजवर चाल करून येत नाहीं ! छे, हा चोर नाहींच. तर कोणी गरीब मनुष्य दिसतो. आपण त्याला मदत करावी. पण ह्याला घरीं न्यावें कसें ? मी चांभार पडलों. बरें, जरी तो मजबरोबर आला, तरी आह्मांला तो ओझेंच व्हावयाचा ! ! अशा नंग्या मनुष्यास घेऊन जाऊन मी करणार काय ? त्याला द्यावयास मजजवळ काय आहे ? बाबा पंढरीनाथा ! या फंदांतून मला सोडीव."

जणूं काय आपणांस तो मनुष्य दिसलाच नाहीं, अशा रीतीनें आपल्या मनाचें समाधान करीत रामाजी पुढें चालला. पण त्याचें मन त्यास खाऊं लागलें. तें त्यास पुढें जाऊं देईना, मागें खेंचूं लागलें.

रामाजीही बेताल नसल्यानें थांबला. तो स्वगत ह्मणतो, " तूं वेडा तर नाहींना झालास ? तूं हें करून तरी काय राहिला आहेस ? पंढरपुरास असतांनां तुजवर कोणचें संकट आलें होतें, हें तूं विसरलास वाटतें ? दर वर्षी पंढरीच्या वाऱ्या तरी कां करितोस ? तो मनुष्य दारिद्र्यानें पीडिला असून त्याची तुजपेक्षां अधिक वाईट स्थिति आहे. मागें तुजवर असाच प्रसंग आला असतां तुझी दशा कशी झाली होती, याची आठवण कर. धिःकार असो तुला मूर्खा ! "

त्यानें आपला पळून जाण्याचा बेत फिरविला, व तो तसाच त्या नग्न मनुष्याकडे गेला.

रामाजीनें जेव्हां त्यास निरखून पाहिलें, तेव्हां त्यास आढळून आलें कीं, तो मनुष्य तरुण आहें, व त्याच्या आंगावर व्रण वगैरे काहीं नाहीं. पण तो दमलेला व भुकेलेला असा दिसत होता. त्यानें मांडी घातली असून नजर छातीकडे लाविली होती. त्याला डोळे उघडण्याची शक्ति नाहीं, असें दिसे. रामाजी त्याच्या आणखी जवळ गेला. त्याची चाहूल ऐकून त्या मनुष्यानें आपले नेत्र उघडून मान वर केली, व त्याच्याकडे पाहिलें. त्याची ती मुद्रा पाहून रामाजीस वाटलें, " बस ! याला आपल्या घरीं नेलेंच पाहिजे. " त्यानें आपल्या आंगांतील डगलें काढिलें, व तें त्यास देऊन तो ह्मणतो, " हें आंगांत घालावयास घे. मी जातीचा चांभार आहे हेंही सांगून ठेवितों. बोल, माझ्या घरीं चलावयाची तुला इच्छा आहे काय ? "

त्या गृहस्थानें माननें हो ह्मटलें, तें पाहून रामाजी ह्मणतो, "चल. आटप तर लवकर."

असें ह्मणत त्यानें त्यास हात देऊन उठविलें. त्या मनुष्यास जवळून पाहिल्यावर रामाजीस कळून चुकलें कीं, त्याचें शरीर स्वच्छ व सुस्थितींत आहे. त्याच्या हातापायांचा आकार उत्तम, शरीर प्रमाणशीर, चेहरा मोहक व ममताळू आहे. रामाजीनें आपलें डगलें त्याच्या खांद्यावर घातलें, पण त्यास त्या डगल्याच्या बाह्या सांपडेनात. ह्मणून रामाजीनें तें त्याच्या आंगांत चांगलें व्यवस्थेशीर घालून दिलें. व त्यास डोक्यावर घालावयास ह्मणून तो आपलें सहा हात लांबीचें झिरझिरें

पागोटें देऊं लागला. पण त्याचें डोकें टकलें असल्यानें त्यास उघडें चालणें प्रशस्त वाटेना. व त्या अनोळखी गृहस्थाचे डोक्यावर केंस होते, ह्मणून त्यास पागोटें देण्याची रामाजीस आवश्यकता दिसून आली नाहीं. पण नेसावयास? त्याच्याजवळ त्याला नेसावयास देण्याकरितां कांहीं नव्हतें. ह्मणून त्यानें पागोटें फाडून त्याची एक लंगोटी केली, व एक बारीक पदर काढला, व त्यास करगोटा घालून लंगोटी घातली. ह्याप्रमाणें त्यास सज्ज केल्यावर रामाजी ह्मणतो, " हं, आतां ठीक झालें. माझें घर येथून जवळच आहे. पण तेथपर्यंत तुझ्यानें चालवेल ना? नाहींतर दुसरी कांहीं सोय करितां येईल."

यावर त्या गृहस्थानें 'आपल्याच्यानें चालवेल' अशा अर्थी मान हालविली, व तो रामाजीकडे कृतज्ञ दृष्टीनें पाहूं लागला. पण त्यानें तोंडांतून एक अक्षरही काढिलें नाहीं. रामाजी त्यास ह्मणतो " तूं बोलत कां नाहींस? चल आतां आपण घराकडे जाऊं. चांगलें चालतां येत नसलें, तर ही माझी काठी टेंकावयास घे. चल, टाक पाय आतां."

असें ह्मणून रामाजीनें चालावयास आरंभ केला, व तो गृहस्थही मागें न रेंगाळतां रामाजीबरोबर चालूं लागला. रस्ता आक्रमित असतां रामाजी त्यास विचारूं लागलाः—

" तूं राहतोस कोठें ? "

" मीं इकडचा नाहीं. "

" मला वाटलेंच तसें. कारण तूं जर इकडच्या भागांतला असतास, तर मला ओळखितां आला असतास. तूं या ठिकाणीं कसा आलास?" रामाजीनें विचारलें.

" तें कांहीं मला सांगतां येत नाहीं."

" तुला कोणी वाईट रीतीनें वागविलें कीं काय?"

" मला कोणी वाईट रीतीनें वागविलें नाहीं, तर ईश्वरानें मला माझ्या अपराधाबद्दल शिक्षा केली आहे."

"तुझी येथेंच रहावयाची इच्छा आहे, कीं कोठें बाहेर जावयाची आहे?" रामाजीनें विचारलें.

"मी कोठेंही गेलों, तरी तें मला सारखेंच."

हें उत्तर ऐकून **रामाजीस** आश्चर्य वाटलें. तथापि तो मनुष्य कांहीं लफंगा दिसेना. इतकेंच नव्हे, तर तो शांततेनें बोलत होता.

**रामाजी** मनांत ह्मणाला "मनुष्य कांहीं गैरवाजवी दिसत नाहीं. मग आपली मागील हकीगत कां सांगत नाहीं कोण जाणें? तें कांहीं का असेना. सध्यां तर याला आपल्या घरीं न्यावें. मग पुढच्यापुढें पाहतां येईल."

या वेळेस अगदीं तिनीसांजा झाल्या होत्या, व थंडीही वाजूं लागली होती. **रामाजीचें** घर जसजसें जवळ येऊं लागलें तसतशी, कांतडें न आणल्याबद्दल आपली बायको काय ह्मणेल, याची त्यास काळजी वाटूं लागली. "आतां कातडें न आणल्याबद्दल ती माझें कांडण काढणार! तशांत हा मनुष्य तर अगदींच कफल्लक आहे. आज आह्मांला पाहून गुणाईला कांहीं आनंद होणार नाहीं."

याप्रमाणें बायकोचें स्मरण झालें ह्मणजे त्यास फार वाईट वाटे; पण त्या गृहस्थाकडे पाहिलें ह्मणजे आपण त्यास कोणच्या स्थितींतून वांचविलें, याचें स्मरण होऊन त्याला आनंद होई. या दोन्ही विचारांच्या खेंचाखेंचींत **रामाजीची** स्वारी घरीं चालली होती.

वाचकहो, आतां त्याची बायको आज सकाळपासून काय करीत होती तें आपण पाहूं. कारण दोन विचारांच्या खेंचाखेंचींत, **रामाजीची** वास्तविक स्थिति काय झाली होती हें सांगणें कठीण असल्यानें, त्यास आतां येथें सोडलेलें बरें.

---

(२)

**भ्रतारासी भार्या बोले गुजगोष्टी । मज ऐसी कष्टी नाहीं दुजी ॥१॥**
**अखंड तुमचें धंद्यावरी मन । माझें तों हेळण करिती सर्व ॥ २ ॥**
**जोडीतसां तुह्मीं खाती येरचारें । माझीं तंव पोरें हळहळती ॥ ३ ॥**
**ठाकतें ठमकतें जीव मुठी धरुनि । परि तुम्ही अजुनी न धरा लाज ४**

तुकाराम.

संसार तापें तापलों मी देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥ १ ॥
ह्मणऊनि तुझे आठवीले पाय । ये वो माझे माय पांडुरंगे ॥ २ ॥

तुकाराम.

नवरा हाटास गेल्यानंतर **गुणाईनें** लांकडें फोडिलीं, पाणी भरिलें, स्वयंपाक केला व पोरांस भरविलें. घरांतील सारा केरकचरा काढून तें स्वच्छ केलें व तें बरेंचसें सारविलें. नंतर आपण स्वतः जेविली.

**रामाजीचें** तें घर! तें कितीसें मोठें असणार? त्याची रुंदी तीन खण असून दौड दोन पाटांची होती, व मागल्या बाजूस ओसरी असून मोठें आंगण होतें. त्या आंगणास कमरेइतक्या उंचीचा कोट होता. पावसाळ्याच्या दिवसांत तो तेथें वेल लावी. त्या घरास पुढील बाजूस ओटा होता त्यावर रामाजी हिंवाळ्याच्या दिवसांत उन्हांत बसे. त्या घराच्या मधील खणास दरवाजा, व बाजूच्या दोन्ही खणांस एक एक खिडकी होती. त्यापैकीं एका खिडकीपाशीं तो जोडे शिवावयास बसे. भिंतीपाशीं दोन बांक व एक खुर्ची होती. या खुर्चीचे पुढचे दोन पाय तुटले होते. तेथे त्यानें दोन ओबडधोबड लांकडें लाविलीं होतीं. तीवर त्यानें चामड्याच्या गाद्या ठेविल्या होत्या. त्या घरास माळा असून त्याची उंची ओणव्यानें चालावें लागेल इतकी होती.

असो. **गुणाईचें** जेवण झालें तरी तीन भाकऱ्या शिलकीस उरल्या. त्या **रामाजीच्या** वांट्याच्या होत्या. तिला वाटलें, आतां स्वयंपाक आज पुनः करावा लागतो कीं काय कोणास ठाऊक! जर स्वारी बाहेरूनच जेवून आली तर आज कांहीं स्वयंपाक करावयास नको; व जरी जेवून आली नाहीं, तरी मी कांहीं स्वयंपाक करावयाची नाहीं! सांगेन, घरांत कणीक फार नाहीं ह्मणून! असा विचार करीत ती बाहेर आली. तेथें **रामाजीचें** एक फाटकें कुडतें खुंटीवर टांगलें होतें, तें तिनें घेतलें व ती खिडकीपाशीं जाऊन शिवीत बसली. तें कुडतें इतकें फाटलें होतें कीं, त्यांत चार सुपाऱ्या बांधून ठेवूं असा तिनें विचार केला असता, तर आपल्या प्रयत्नांत तिला कितपत यश आलें असतें, कोणास ठाऊक? तें शिवीत असतांना, **रामाजी** कोणत्या प्रकारचें कातडें हिंवाळ्यांत बंडी करावयासाठीं आणील, याविषयीं तिचे विचार चालले होते. " आमच्या

घरचे म्हणजे शुद्ध **सांभाचा** अवतार ! त्या मेल्यांनीं कातडें खरेदी करण्यांत यांना फसविलें नाहीं म्हणजे मिळविली ! तसे म्हणा आमच्या घरचे चांगलेच आहेत; गैरवाजवी कांहीं नाहींत. पण मेला स्वभावच भारी भोळा. लहान मूल कां दुकानांत येईना, त्याला ते कधींही फसविणार नाहींत. पण यांना मात्र रस्त्यावरचें लहानसें पोरही फसवील ! बाजार करावयास आठच आण्यांचे पैसे घेऊन गेले आहेत खरे, पण त्यांना दहा रुपयेही घेणें आहेत. मनासारखें कातडें खरेदी करावयास दहा रुपये कांहीं कमी नाहींत. गेल्या सालीं, कपडे नीट नसल्यानें आमचे असे हाल झाले आहेत कीं, ते सांगतां पुरवणार नाहींत. ते सांगावयाचे म्हणजे एक मोठा ग्रंथच व्हावयाचा ! एक डगलें दोघांत ! म्हणजे आहे तरी काय ! ! व थंडी पाहिली तर ही अशी ! भरदिवसां जरी बाहेर जावयाचा प्रसंग आला, तरी जीवावर येई. मग नदीवर जाऊन कपडे धुवावयाचे म्हणजे कोण ते हाल ! नको त्याची आठवण ! पोटासाठीं तर पाहिजेच. म्हणून लोकांचें आर्जव करावयास त्यांना बाहेर जावें लागे. व थंडी ह्मणणार मी मी ? घरांत होते नव्हते ते कपडे ते अंगांत घालीत. मग मला घालावयास या लुगड्याशिवाय काय रहाणार ! तें घरीं आले, कीं मी ते कपडे घालावे व नदीवर पाणी आणण्यास व धुणें धुवावयास जावें. भोग आहे झालें पाठी मागें, तो भोगिलाच पाहिजे. **पंढरी** सोडा वाटेल तें करा. नशीबांतच जर नाहीं तर काय मिळणार ? पण तेंच नशीबांत जर असलें, तर रानांत जाऊन बसलों तरी **लक्ष्मी** हात धुवून पाठीमागें लागते. पण आमचें नशीबच मुळीं खोटें. मग त्याला कोण काय करणार ?”

यावेळीं रात्र पडूं लागली होती म्हणून तिनें दिवा लाविला. **रामाजीची** यावयाची वेळ होऊन गेली, तरी अजून तो येत नाहीं, हें पाहून तिला काळजी वाटूं लागली. ती दिव्यापाशीं **रामाजीची** वाट पहात शिवीत बसली होती. इतक्यांत दाराची कडी वाजली. टांके मारतां मारतां सुई कुडत्यांत राहिली, ती पुरती न खेचतां मध्यें तशीच ठेवून ती दार उघडावयास गेली, दार उघडून पाहते, तों तिला आढळून आलें कीं, आपल्या नवऱ्याच्या आंगांत डगलें नसून त्यानें बाजारांतून कातडेंही आणिलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर आपलें डगलें आंगांत घातलेला एक लहंभारती बरोबर आणिला आहे. दरवाजा उघडतांच **रामाजी** घरांत

आला. त्या गृहस्थानें सहजगत्या वर पाहिलें तों **गुणाई** दिसली मात्र, त्यानें आपलें डोकें खालीं घातलें, व तो दरवाज्यांतच निश्चल उभा राहिला.

**गुणाईनें** त्याला निरखून पाहिलें, तों त्याच्या आंगांत डगल्याशिवाय कांहीं नाहीं; व नवऱ्याकडे पाहिलें, तों त्याच्या जवळ कातड्याचा गठ्ठा नाहीं; इतकेंच नव्हे तर तो ओशाळलेला आहे. तिची अगदीं निराशा झाली, तिनें कपाळास आंठ्या घातल्या, व ते काय करितात हें पहावें म्हणून ती चुलीजवळ जाऊन बसली. पलीकडच्या दालनांत चूल असल्यानें तेथून बाहेरचें सारें दिसे. **रामाजीनें** पागोटें काढिलें व तें खुंटीवर ठेवून जवळच खुर्ची होती, तिजवर तो आपल्या टकल्या डोंक्यावर हात फिरवीत जाऊन बसला. **गुणाई** फार रागावली आहे, हें त्यानें ओळखिलें; पण जणूं काय घरांत सर्व कांहीं सुरळीत चाललें आहे, अशा रीतीनें तो आपल्या बायकोस म्हणतो, " हं, चल, जरा बाहेर ये पाहूं; व घरांत कांहीं असेल तर आम्हांला वाढ. " नंतर त्या पाहुण्यास म्हणतो " तूं असा उभा काय आहेस ? या बांकावर येऊन बैस. " तो गृहस्थ बांकावर जाऊन बसला.

इकडे **गुणाईनें रामाजीचे** हे शब्द ऐकिले, पण ती कांहींएक बोलली नाहीं. मात्र त्या दोघांकडे तिनें एकदां क्रमवार पाहिलें व ' अहाहा ! दिवे ओंवाळावे, दिवे ! ' अशा अर्थी मान हालविली. **गुणाई** स्वभावानें फार भोळी पण तोंडाची मोठी खबरदार होती. एकदां का तिनें आपल्या तोंडाचा पट्टा सोडला, म्हणजे ती कोणच्या प्रकारचा भडिमार करील याचा कांहीं नेम नसे. **रामाजीनें** तिच्या मानहालविण्याकडे लक्षच दिलें नाहीं. तो नूतन गृहस्थास म्हणाला, " तुला फार भूक लागली असेल, नाहीं ?" नंतर बायकोस म्हणाला, " आज कांहीं भाकरी केल्या आहेत कीं नाहीं ? मी सकाळचा उपाशी असल्यानें मला फार भूक लागली आहे."

आतां मात्र तिचा राग विकोपास गेला. ती चुलीजवळूनच एकदम उसळून म्हणते, " होय केल्या आहेत, बरं मग ?"

" मग काय असावयाचें ? आणून वाढ त्या."

" पण त्या तुमच्यासाठीं नाहींत ! तुम्हीं आज हाटांत कातडें खरेदी करावयास गेलांत, पण तेथें स्वतःची अक्कल मात्र विकून आलांत ! हिंवाळ्यासाठीं एक बंडी करावयाची. पण तें राहिलें एकीकडेच ! व तुम्ही

स्वत:ची बंडी मात्र गमवून आलांत ! चांगलें केलें बरें ! बरें, इतकें करून तरी स्वारी थांबली काय ? तर नाहीं ! या भिकारड्यास आपल्याबरोबर हादडावयास आणिलें ! आतां मीं तुमच्या उरावर घालूं तरी काय ? अन् घालावयास जरी असलें, तरी मी तें साफ घालणार नाहीं. काय समजलांत !"

"काय समजावयाचें तें समजलों. बस, पुरें झालें आतां. जीभेस उगीच शिणवूं नकोस. असलें भाषण करण्यापेक्षां मीं या मनुष्याला कां आणिलें, हा कोण आहे, हा कोणच्या स्थितींत मला सांपडला, वगैरे हकीगत तरी विचार. नेहमीं नेहमीं अभद्र भाषण करून ती जीभ मात्र विघडवून घेतेस. एर्वी तेर्वी यास जेवावयास घालावयाचेंच; मग प्रसन्न अंत:करणानें घातलेंस, तर त्यांत तुझें कांहीं वेचतें ?"

"इतकें जें बोललांत, त्यापेक्षां तुह्मींच जर आपल्या पैशाचें काय केलेंत, हें सांगतां तर—......"

**रामाजीनें** आपल्या कुडत्याच्या खिशांत हात घातला व बारा आण्याचे पैसे काढून ते तिच्यापुढें टाकिले.

"हे घे पैसे. कर्जदारांपैकीं कोणीही पैसे दिले नाहींत. **दौला** पाटील घरीं नव्हता. **खेमा** पाटलाजवळ पैसे नव्हते. नाहीं ह्मणावयास चार आण्याचे पैसे होते, ते त्यानें दिले. **तुळारामाच्या** घरीं गेलों होतों, पण त्याच्या दारास कुलूप होतें. पैसेच कोणी दिले नाहींत, मग मी तरी कातडें आणणार कोठून ? आतां पुढच्या खेपेस..."

**गुणाईनें** घाई करून ते पुढें टाकलेले पैसे तात्काळ उचलिले व ती ह्मणते, "आज भाकऱ्या नाहींत व पीठही नाहीं. तुह्मीं जगांतले सर्व भिकारडे गोळा करूं लागलांत तर..."

"हं. आतां थोडीशी जीभ आवरा. दुसऱ्यास काय बोलावयाचें तें ऐकण्यापूर्वी माणसानें असें आपलें पांडित्य पाघळूं नये..."

"अहाहा ! तुमच्यासारख्या **सांभा—सांभ** कसले त्याच्या पुढच्या-कडून काय पण ब्रह्मज्ञान ऐकतें आहें ! जणूं काय मला इकडच्या स्वभावच माहीत नाहीं. आज पंचवीस वर्षें तुमच्याबरोबर काढिलीं आहेत. काय समजलांत ! तुमच्यासारख्या फटिंगाशीं माझें लग्न लावूं नये, असे बाबा

नेहमीं आईस ह्मणत. खरोखर किती दूरदर्शी ते ! पण आइ कसली ऐकते ! पण आईला तरी इकडचा स्वभाव काय माहीत ? ती माझ्यासारखीच भोळी. ती ह्मणे 'गुणाई, काळजी करूं नकोस, रामाजी तुला चांगलें सांभाळील.' अहारे ! काय पण आमचा सांभाळ चालविला आहे !! ”

**रामाजी** तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करूं लागला, पण **गुणाई** त्याला एक शब्द बोलूं देईल तर शपथ. त्याच्या एका शब्दास ती त्याला दहा वाक्यें ऐकवी; आणि गेल्या पंचवीस वर्षांत तिच्या दृष्टीनें त्यानें जितक्या कांहीं आगळिकी केल्या होत्या, त्याही ती उकरून काढूं लागली. ह्याप्रमाणें ती त्याला पुष्कळ बोलली. पण उलट जबाब येत नाहीं, असें पाहून ती संतापली; व धांवत धांवत जाऊन तिनें त्याच्या कुडत्याची बाही धरिली. तिनें त्यावर आपला भडिमार कायम ठेविला होता. “त्या भिकारड्यास तुह्मी जी बंडी दिली, ती माझ्या माहेरची आहे. मी आतां तिला हात देखील लावणार नाहीं. टाक हें माझें कुडतें. जेव्हां तेव्हां तुह्मी माझेच कपडे घालतां. नंदीबैल कुठला ! मेल्याला पटकी कां नेईना ! ” **गुणाईला** भाषणाचा कैफ चढला. तिची शुद्ध गेली.

**रामाजीवर** आजचा प्रसंग पहिल्यांदा आला नव्हता. तथापि आपल्या बायकोनें तिऱ्हाइतासमोर आपली अशी संभावना करावी, हें त्याला नीट वाटलें नाहीं; तिला बोलण्याचा हा प्रसंग नव्हे, हें तो जाणून असल्यानें तिच्या भाषणावर तो चकार शब्दही बोलला नाहीं. त्यानें आंगांतील कुडतें काढिलें, पण काढतां काढतां त्याची आंतली बाजू बाहेर आली. तें पुनः पूर्ववत् करून तो तिला देणार, पण **गुणाईला** इतका धीर कोठला ? तिनें तें **रामाजीच्या** हातून एकदम खेंचलें व आपल्या खांद्यावर टाकलें. आणि घराबाहेर पडावयाचें ह्मणून ती दाराजवळ गेली. आपल्या रागाचा वचपा अजून निघाला नाहीं, व तो पाहुणा कोण आहे ही आपली जिज्ञासा तृप्त झाली नाहीं, या दोन विचारांचा तिच्या डोक्यांत गोंधळ उडाला. पुढें जावें कीं मागें परतावें याचा निश्चय होण्यापूर्वीच ती मागें परतली.

(४)

आर्त भूताप्रति । उत्तम योजावया त्या शक्ति ॥ १ ॥
फळ आणि समाधान । तेथें उत्तम कारण ॥ २ ॥
अल्पें तो संतोषी । स्थळीं मांपडे उद्देशीं ॥ ३ ॥
सहज संगम । तुका ह्मणे तो उत्तम ॥ ४ ॥

गुणाई नवऱ्यास ह्मणते, "तो जर चांगला मनुष्य आहे, तर त्यानें दिगंबर वृत्ति धारण करावयाची नव्हती. याबद्दल, त्याला कांहीं मनाची नसो–पण जनाची तरी लाज वाटावयास पाहिजे होती! आंगांत एक देखील कुडतें नसावें, ह्मणजे आहे तरी काय? तरी ह्मणे (वेडावून) 'तो चांगला आहे' काय, चांगला आहे ह्मणजे! आहे तरी काय?"

"तेंच तर मी सांगण्याचा प्रयत्न करीत होतों"

"मग सांगा. तो तुह्माला कोठें भेटला?"

"तो मला नवलख्याचे बंगीच्यांत भेटला. मी तेथील नदीजवळच्या आमराईतून येत असतां, हा एका झाडाआड बसलेला मला दिसला. गुणाई, पंढरीनाथानें मला जर त्यावेळीं याच्याकडे पाठविलें नसतें, तर याचे दिवस पुरते भरले होते. कोणच्या मनुष्यावर केव्हां, आणि कसा प्रसंग येईल, हें कांहीं सांगतां येत नाहीं. मला त्याची दया आली ह्मणून मी त्यास घरीं आणिलें. त्याचे आंगावर एक सूतही नव्हतें, ह्मणून मी त्यास आपली–तुझी–बंडी दिली. गडे गुणाई, रागावूं मात्र नकोस. तुकोबा नाहीं कां ह्मणत—

मरणाची कारे नाहीं आठवण!

आपणालाही एक दिवस मरा..."

'मरावयाचें' हें शब्द अभद्र वाटून ती कांहीं क्रोधपर भाषण करणार; तोंच त्या नूतन गृहस्थाकडे तिची दृष्टी गेली, व ती स्तब्ध झाली. यावेळीं तो गृहस्थ बांकावर मांडी घालून व भोंवतीं हाताचें वेटोळें देऊन बसला होता. त्याची दृष्टी छातीकडे लागली होती; आणि भोंवयास आंठ्या पडलेल्या असून नेत्र मिटलेले होते. जणु काय तो अतिशय दुःखग्रस्त होता. गुणाई गप्प बसलेली पाहून रामाजीला धीर आला; व तो म्हणाला,

" आपली दुष्काळात काय गत झाली होती, हें माहीत आहेना ? त्यावेळीं आपल्याकडे जर कोणी पाहिलें नसतें, तर आपली काय अवस्था झाली असती ? पण आपला सारा भार **विठोबावर** असल्यानें, त्यानें आपल्या मदतीस **श्रीधरपंतांस** पाठवून दिलें. **गुणाई,** देवावर तुझा विश्वास नाहीं काय ? त्याची भक्ति करावीशी नाहीं का वाटत तुला ?"

**गुणाईनें** हे शब्द ऐकिले व तिनें त्या गृहस्थाकडे पाहिलें. त्याला पाहतांच तिचें अंतःकरण द्रवलें. ती घरांत गेली व उरलेल्या जाडया भाकरी आणून तिनें त्या त्यांच्यापुढें ठेविल्या, व तोंडीं लावावयास कांदे आणि मिरच्या आणून दिल्या. हें तिचें वर्तन पाहून **रामाजीस** फार समाधान वाटलें. **गुणाईनें** तेथें पाणी आणून ठेविलेंच होतें, त्यानें त्या दोघांनी आपले हात धुतले व जेवावयास आरंभ केला.

**गुणाई** घरांत गेली आणि कणीक घेऊन तिनें आणखी कांहीं भाकरी केल्या व त्या त्यांना वाढल्या. व सर्वांनंतर आपण जेवली. तिच्या अंतःकरणांत त्या बुवाविषयीं अत्यंत दया उत्पन्न झाली. ती बाहेर आली, तेव्हां तो बांकावर बसला होता. तिला पाहतांच त्यास हंसूं आलें. तिनें तेथील खरकटें काढिलें. नंतर ती बोलावयास आली. ती त्यास विचारूं लागली—

" तुम्ही कोठून आलांत ?"

" मी इकडचा नाहीं. "

" पण तुम्हीं **नवलख्याचे** बगीच्यांत कसे आलांत ? "

" मला कांहीं तें सांगतां येत नाहीं." तो गृहस्थ म्हणाला.

" तुम्हाला कोणी लुटलें कीं काय ? "

" नाहीं, मला कोणी लुटलें नाहीं. **वैकुंठनाथानें** मला माझ्या अपराधाबद्दल शिक्षा केली, म्हणून मजवर असा प्रसंग आला."

" हे सांगतात, त्याप्रमाणें तुम्ही झाडाआड खरोखरच पडलां होतां काय ? " **गुणाईनें** विचारिलें.

" होय, तशा स्थितींत मला **रामाजींनीं** पाहिलें, व माझा त्यांना कळवळा आला. त्यांनीं माझ्या आंगांत आपलें डगलें घातलें, व मला घरीं आणिलें. तुम्ही मला जेवूं घालून मजवर उपकार केलेत; या

उपकारांबद्दल देव तुमचें खचित्, कल्याण करील." गुणाई उठली व खिडकीपाशीं ती जें कुडतें शिवीत बसली होती, तें तिनें त्यास दिलें. नंतर ती घरांत गेली, व एक तीन हात लांबीचें फाटकें धोतर होतें, तें तिनें त्यास आणून दिलें. ती म्हणाली, "तुमच्यापाशीं आंगांत घालावयास कुडतें नाहीं व नेसावयासही कांहीं नाहीं, तर हें घ्या. आतां रात्र फार झाली आहे, म्हणून येथेंच निजा. आंगाखालीं हे चामड्याचे तुकडे घ्या, ह्मणजे तुमच्या आंगांत ऊब येईल."

त्यानें तें कुडतें व धोतर घेतलें. कुडतें आंगांत घातलें व धोतर नेसला. तदनंतर तिनें सांगितलेल्या जागीं तो जाऊन निजला. गुणाईही जाऊन अंथरुणावर पडली. पण तिला कांहीं केल्या झोंप येईना. कारण राहून राहून तिच्या डोक्यांत पाहुण्याविषयीं विचार येत. त्यानें आपल्या घरांतील सांठा संपविला; त्यास आपण एक कुडतें व एक धोतर दिलें; आधींच घरांत कांहीं नाहीं, तशांत हा गृहस्थ म्हणजे दुष्काळांत तेरावा महिना, असा प्रकार झाला. हे विचार तिच्या डोक्यांत येऊं लागले म्हणजे तिला दुःख होई. पण आपण केलेल्या साह्यामुळें त्यास झालेलें समाधान व त्याचा हंसरा चेहरा हें आठविलें, कीं तिला आनंद होई. हे दोन परस्पर विरुद्ध विचार गुणाईला स्वस्थ पडूं देईनात. आपल्याप्रमाणें रामाजीही जागाच आहे, हें पाहून ती त्याला म्हणालीः—

"काहो?"

"काय?"

"आपण त्यास उरलेंसुरलें अन्न व वस्त्रेंही दिलीं. आतां आपली पुढची वाट काय? उद्यांचा दिवस कसा जाईल, हरि जाणे. बहुतेक उसनें आणावें लागणार."

"अगदीं भिकारीही उपाशीं मरत नाहींत, मग आपण तर उद्योग करणारे व धट्टेकट्टे आहोंत. पंढरीनाथाला आपली काळजी आहेच. तो आपणाला उपाशीं कसा बरें मरूं देईल?"

गुणाई कांहीं वेळ उगी राहिली. तथापि कांहीं वेळानें ती पुनः ह्मणते, "मनुष्य दिसतो आहे सरळ; पण कोठला आहे, कोठून आला, कसा आला, हें तो सांगत कां नाहीं कोण जाणे!"

" मला वाटतें त्याचा परिस्फोट न करण्यास तशींच कांहीं कारणें असतील. "

" कायहो ? "

" काय ? "

" आपण सर्वांस मदत करितों पण उलटपक्षीं आपणांस कोणी मदत करीत नाहीं, हें कसें काय ? "

यावर काय उत्तर द्यावें, हें रामाजीस सुचेना. तो म्हणाला, "आतां रात्र बरीच झाली व उद्यां कामेंहीं पुष्कळ करावयाचीं आहेत, तर आतां निजूं कसे ! "

---

(५)

**नसावें ओशाळ । मग मानिती सकळ ॥ १ ॥**
**जाय तेथें पावे मन । चाले बोलिलें वचन ॥ २ ॥**
**राहों नेदी बाकी । दान ज्याचें त्यासी टाकी ॥ ३ ॥**
**हो वा वाटे जन । तुका म्हणे सार्टीं गुणां ॥ ४ ॥**

**रामाजी** सकाळीं उठला. मुलें अजून निजलींच होतीं. त्यांचा पाहुणा तें कुडतें घालून व तें धोतर नेसून बाहेर बांकावर, वर पहात बसला होता. त्याचा चेहरा कालच्यापेक्षां आज अधिक तेजस्वी दिसत होता. **रामाजी** त्याच्याकडे बाहेर आला आणि त्यास म्हणाला, " मित्रा, पोटास भाकरी आणि या अवधूत शरीरास वस्त्र पाहिजे. आपणास जर जिवंत रहावयाचें आहे, सर धंदा हा केलाच पाहिजे. तर सांग पाहूं, तुला कोणचें काम येतें बरें ? "

" मला कोणचेंही काम करितां येत नाहीं. "

हें त्याचें उत्तर ऐकून **रामाजीस** फार आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, " तें खरें. पण शिकावयाची इच्छा असल्यास मनुष्याला काय शिकतां येणार नाहीं ? तो या जगांत वाटेल तें शिकूं शकेल. "

" मनुष्यास जर वाटेल तें काम करितां येणें शक्य आहे, तर मलाही तें करितां येईल. "

“ टीक आहे. बरें, पण तुझें नांव काय ? ”

“ विजय. ”

“ ‘विजय’ हें नांव तर फारच चांगलें व गोड आहे. बरें तर, विजया, तुला आपली हकीगत कोणास सांगावयासारखी वाटत नाहीं, तें ठीक आहे. कारण ती तुझी खुषी आहे. पण आपणास कांहीं खावयास मिळावें अशी जर तुझी इच्छा असेल, तर तुला काम हें केलेंच पाहिजे. मी सांगतों तें जरी तूं काम करशील, तरी तुला दुसरीकडे जेवावयास व रहावयास जाणें नको. ”

“ परमेश्वर आपलें भलें करो. तुह्मीं मला जें कांहीं शिकवाल तें शिकण्यास मी एका पायावर तयार आहे. ”

हें ऐकून रामाजीनें कांहीं दोरा घेतला व आपला पाय लांब करून आंगठ्या भोंवतीं तो दोरा गुंडळिला, आणि दोन्हीं हातांत त्या दोऱ्याचे दोन्ही पदर घेऊन त्यास भराभर पीळ देऊन त्याला दाखविला. विजय हें लक्षपूर्वक पहात होता. त्यानें तें तेव्हांच उचलिलें. तो म्हणाला, “ हें तर फार सोपें आहे. हें पहा. ” असें म्हणून त्यानें आपल्या हातांत दोरा घेतला व रामाजीनें दाखविल्याप्रमाणें त्यानें त्यास पीळ देऊन दाखविला. नंतर रामाजीनें त्यास दोऱ्याला मेण लावावयाला शिकविलें. तदनंतर चामडें कोणीकडून कापावें व कसें कापावें, तें नीट कापलें नाहीं तर वायां कसें जातें, हें दाखविलें. या नंतर सुई घेऊन टांके कसे मारावे तें त्यानें विजयास दाखविलें. रामाजीनें दाखविलेल्या त्या सर्व गोष्टींत विजयानें आपलें प्राविण्य तेव्हांच प्रगट केलें. रामाजी त्याला जें जें काय दाखवी तें तें तो तेव्हांच शिके.

याप्रमाणें विजय रामाजीचे घरीं काम करूं लागला. तीन चार दिवसांतच तो असें काम करूं लागला कीं, जणु काय तो जन्मापासूनच हा धंदा करीत आला असावा, असें पहाणारांस वाटावें. तो अविश्रांत काम करी. त्याचें खाणें बेताचेंच होतें. एकंदरींत विजयापासून रामाजीस कोणच्याही प्रकारचें नुकसान नसून त्यास प्रत्येक रीतीनें फायदाच होता. एका खिडकीपाशीं तो व एकीपाशीं रामाजी काम करावयास बसत. तो घराबाहेर बहुधा जात नसे. घरांतील मंडळीशींही काम असेल तरच बोलावयाचा; नाहींतर मुक्यासारखा स्वस्थ बसावयाचा. तेथें एक

विठोबाची व एक गजेंद्रमोक्षाची अशा दोन तसबिरी होत्या. त्यांकडे व त्यांतही गजेंद्रमोक्षांतील विष्णूकडे—पाहात तो स्वस्थ बसावयाचा. त्यानें कोणाशीं विनोद केला नाहीं व गुणाईकडे पाहून तो जें एकदां हंसला होता, त्या शिवाय पुन्हां कधीं हंसलाही नाहीं.

पळ, घटका, प्रहर, दिवस, आठवडे, महिने असें करितां करितां एक वर्ष निघून गेलें. विजय रामाजीच्या येथेंच काम करीत असे व रहात असे. आपल्या कामांत त्याची इतकी कीर्ति झाली कीं, जोडयाचा प्रश्न निघाला ह्मणजे विजयाचें नांव पहिले निघावयाचें. ज्याचे त्याचे तोंडीं विजयाचेंच नांव झालें. तो नीट नेटकें, व्यवस्थित रीतीनें व वेळच्या वेळीं काम करी, ह्मणून मोठमोठ्या लोकांकडूनही रामाजीकडे मधून मधून काम येत असे.

( ६ )

काळ जवळिच उभा नेणां । घालीं झापडी खुंटी कानां ॥ १ ॥
कैसा हुशार सावध राही । आपुला तूं आपुले ठायीं ॥ २ ॥
काळ जवळिच उभा पाहीं । नेदीं कोणासि देऊं कांहीं ॥ ३ ॥
काळें पुरविली पाठी । वरुषें जालीं तरी साठी ॥ ४ ॥
काळ भोंवताला भोंवे । राम येऊं नेदी जिव्हें ॥ ५ ॥
तुका म्हणे काळा । कर्म मिळतें तें जाळा ॥ ६ ॥

सकाळची वेळ. एके दिवशीं रामाजी व विजय काम करीत असतांना, त्यांच्या दारापुढें एक घोडागाडी उभी राहिली; व घंटा वाजली. त्या गाडीवरचा सईस लागलाच खालीं उतरला व त्यानें गाडीचें दार उघडिलें. तींतून एक ऐटींत पोषाख केलेला काळा साहेब उतरला. तो आपल्याच घरीं येत आहे हें गुणाईनें पाहिलें व तिनें लगबगीनें दार उघडिलें. त्या साहेबाचें नांव थिक्हेड होतें. तो रामाजीचे दाराजवळ आला. तें दार त्याच्या खांद्याइतकें जेमतेम उंचींत होतें, व त्याच्या शरीराची व दाराची रुंदी जवळ जवळ सारखी होती. तो मोठ्या मारामारीनें आंत शिरला व आपण होऊनच

बांकावर जाऊन बसला, कारण खुर्चीवर बसण्याची सोयच नव्हती! या समयीं रामाजीची फारच तारांबळ उडाली. कारण असा गृहस्थ त्याच्या घरीं पूर्वी कधींही आला नव्हता. रामाजीनें त्यास दोनतीनदां लवून रामराम केला.

थिक्हेड् साहेब धापा टाकीत विचारतात, "तुह्मां दोघांपैकीं ह्या दुकानाचा मालक कोण आहे?"

(हा संवाद साहेब बहादुरांच्या मोडक्यातोडक्या हिंदींत झाला. तो मुळाप्रमाणें दिल्यास कंटाळवाणा होईल. ह्मणून तसा दिला नाहीं.)

"जी महाराज, हुजूर, सरकार, ! मी, आपला ताबेदार." रामाजी लवून ह्मणाला.

त्या साहेबाबरोबर एक 'बॉय' (छोकरा) त्याची आज्ञा झेलावयास आला होता, तो दारांतच उभा होता. त्याकडे पाहून साहेब ह्मणतात "ए छोकरा, जाव. गाडी (मे) का चमडा लाव."

तो मुलगा धांवत धांवत गाडीकडे गेला आणि त्यानें आपल्या धन्यानें सांगितलेल्या चामड्याचें पुडगें आणिलें. व तें त्या बांकावर ठेविलें. तें पाहून साहेब ह्मणाला, "इसकी गठान खोलो."

साहेब बहादुरांचा हुकूम लागलीच पाळण्यांत आला. त्यानें पुडगें उघडिलें आणि थिक्हेड साहेबांच्या हातांत चामडें दिलें. नंतर साहेबानें तें चामडें रामाजीस दाखविलें व ह्मणाला—"हें पाहिलेंस का कसें आहे तें?"

"होय सरकार. हें रशियन चामडें दिसतें."

"तें मलाही दिसतें. पण आहे कसें काय?"

"फारच उत्तम."

"'फारच उत्तम'! कधीं बापजन्मांत बेट्यानें पाहिलें असेल तर! याची किंमत वीस रुपये आहे वीस रुपये!"

त्या लहानशा तुकड्याची ही भारी किंमत ऐकतांच तो बिचारा दचकला. "महाराज, मी गरीब मनुष्य. मला असें चामडें कोठून दिसणार?"

"तसेंच, ठीक बोललास. याचें चांगले बूट करून दिले पाहिजेत."

" होय, सरकार; आपल्या आज्ञेप्रमाणें तयार करून देईन."

थिक्‌हेड साहेबांचें डोकें जरा गरम होऊन ते ह्मणतात, " ह्मणे, 'करुन देईन' तें मला नको. तुला करितां येतील किंवा नाहीं, तें बोल. हें काम कोणासाठीं करावयाचें आहे, हें चांगलें लक्षांत ठेव; आणि कातडें कसें आहे, याचीही आठवण ठेव. एक टांकाही न निघतां व आकारही न बदलतां वर्षभर जाईल असा चांगला जोडा झाला पाहिजे. असें जर करितां येत असेल तर उचल हें कातडें, व कापाकापीस लाग. व असें जर करितां येत नसेल, तर तसें सांग. जर सांगितल्याप्रमाणें जोडा झाला नाहीं, किंवा मध्येंच कोठें आकार बिघडला, अथवा टांका उसवला, तर लक्षांत ठेव, कैदेंत टाकीन. पण जर मी सांगितल्याप्रमाणें तो वर्षभर टिकला, तर तुला तुझ्या मेहनतीबद्दल दहा रुपये देईन."

ह्या अटी ऐकून रामाजी घाबरा झाला. त्या गृहस्थास काय उत्तर द्यावें, हें त्यास सुचेना. आतां काय करावें, अशा अर्थी त्यानें विजयाकडे पाहिलें; आणि त्यास कोंपरानें रोंवून तो हळूच विचारितो, " काय बुवा, घ्यावें का हें काम हातांत? बोल."

' घ्यावयास कांहीं हरकत दिसत नाहीं ' अशा अर्थी विजयानें मान हालविली. तें पाहून रामाजीस पुष्कळच धीर आला, व त्यानें त्या गृहस्थाच्या अटी मान्य केल्या. तें पाहून थिक्‌हेड साहेबांनीं आपलें कातडें रामाजीच्या स्वाधीन केलें, व त्यास आपल्या पायाचें माप घ्यावयास सांगितलें. रामाजीनें आपले हात स्वच्छ केले; व एक कागद घेऊन तो त्याच्या पायाचें माप घेऊं लागला. त्याच्या पावलाचें माप सतरा इंच होतें. नंतर रामाजी त्याच्या पायाच्या पोटऱ्या मापूं लागला; पण कागद कांहीं पुरेना, कारण त्या पोटऱ्या ह्मणजे केळीचे खांबच होते.

" पहा, जोडा तंग होता कामा नये."

" जी नाहीं व्हावयाचा सरकार." असें ह्मणत त्यानें कागद फाडून लांब केला, व पोटऱ्यांचें माप घेतलें. इतक्यांत त्या गृहस्थाचें लक्ष विजयाकडे जाऊन त्यानें रामाजीस विचारिलें, "हा मनुष्य कोण आहे?"

" सरकार तो माझा मदतगार आहे "

"लक्षांत ठेव. मी सांगितल्याप्रमाणें जोडा बरोबर वर्षभर गेलाच पाहिजे."

**रामाजीनें**ही या वेळीं **विजयाकडे** पाहिलें. त्याचें लक्ष या वेळीं साहेबाकडे नसून त्याच्या मागें जणुं काय कोणी उभे आहे, त्याकडे आहे असें **रामाजीस** वाटलें. तिकडे पाहतां पाहतां **विजयास** हंसूं आलें, व त्याचा चेहरा पूर्वीपेक्षां सतेज दिसूं लागला. हें पाहून **थिक्‌हेड** साहेब संतापानें ओरडून ह्मणतात, "माझा जोडा मुदतींत होईल किंवा नाहीं, इकडे लक्ष द्यावयाचें सोडून दांत काय विचकतोस. सुवर कोठला ? "

" आपल्या ' स्लीपर्स ' ( चपल्या )—"

" क्या कहता है सुवर !—" **थिक्‌हेड** साहेबांचें डोकें गरम झालें.

**रामाजी** ह्मणाला " हुजूरांनीं तिकडें लक्ष देऊं नये. कारण जोड्याची जिम्मेवारी मी घेतों."

" बरें तर, मी सांगितलेलें सर्व लक्षांत असूं दे." असें ह्मणून साहेब बहादुरांनीं आपलें विशाल शरीर उचलिलें आणि मार्गस्थ होऊं लागले. पण दाराबाहेर वाकून जांवयाचें लक्षांत न राहिल्यामुळें, स्वारींचें डोकें ताडकन् दाराच्या चौकटीवर आपटलें. त्यामुळें रागानें पुटपुटत व डोकें चोळीत ते निघून गेले.

तो लांब गेलेला पाहून **गुणाई** ह्मणाली, " कसा मेला पोळासारखा माजला आहे ! त्याची रग जिरवावयास पटकी शिवाय कोणीही समर्थ नाहीं. धटिंगण कुटला ! "

**रामाजी विजयास** ह्मणाला, " आपण या साहेबाचें काम हातांत घेतलें आहे खरें; पण त्यामुळें आपणास पुढें पश्चात्ताप होईल, असें कांहींही करितां उपयोगी नाहीं. तें कांतडें फार महाग असून गृहस्थ शीघ्र-कोपी आहे. काय करील आणि काय नाहीं, कोणीं सांगावें ? त्याच्या कामांत आगळीक अगदीं होतां कामा नये. चल तर, तुझी नजर चांगली बसली आहे व हातही झटझट चालतात. तर हें माप घे व त्याप्रमाणें त्याच्या बुटासाठीं हें कांतडें काप पाहूं. "

**रामाजीनें** सांगितल्याप्रमाणें **विजयानें** साहेबांचें काम करण्यास सुरवात केली. त्यानें तें कातडें घेतलें व जमीनीवर पसरिलें. नंतर तें दुमटून तो कापूं लागला. या वेळीं **गुणाई** त्याचें काम पहात सहज बसली

होती. तिला त्याची कातडें कापण्याची तऱ्हा पाहून आश्चर्य वाटलें. तिनें त्याला बूट करितांनां अनेकदां पाहिलें होतें, पण आतां पाहतें तों तो तें कातडें बूटाकरितां कापतात तसें कापीत नसून, निराळ्या तऱ्हेनेंच कापीत आहे. ही चूक **विजयास** बोलून दाखवावी असें तिला वाटलें पण ती मनांत ह्मणाली, "या साहेबाचे जे जोडे करावयाचे, ते असेच करावयाचे असताल. आपणास त्यांतील तऱ्हा आणि खुब्या काय ठाऊक? आजपर्यंत जोडे करण्यांत यानें चूक केली नाहीं, इतकेंच नव्हे, तर सर्वांत उत्तम जोडें बांधणारा हा, अशी त्याची ख्याति आहे. त्यास अक्कल शिकविणारी मी कोण? यापेक्षां आपण कांहीं न बोललेलें ठीक नव्हे काय?" असा विचार करून **गुणाई** स्तब्ध बसली.

इकडे **विजयानें** तें कातडें कापलें व तो शिवूंही लागला. त्याची शिवण्याची तऱ्हा पाहून असें वाटे कीं हा 'स्लीपर' शिवीत असून बूट कांहीं शिवीत नाहीं. हें पाहून **गुणाईस** पुनः आश्चर्य वाटलें. तथापि ती यावेळीही कांहीं एक बोलली नाहीं. **विजय** आपलें काम दुपारचे बारा वाजेतोंपर्यंत करीत होता. इतक्यांत **रामाजी** भाकरी खावयास उठला त्याचें लक्ष **विजयाकडे** सहजगत्या गेलें. पाहतो, तों तो बूट करीत नसून 'स्लिपर' करीत आहे! तें पाहून त्याच्या तोंडांतून स्वगत अवचित् उद्गार बाहेर पडले, "आः आः हें काय!! ह्या गृहस्थानें उभ्या वर्षांत चूक कशी ती केली नाहीं, असें असतां ह्यानें आज ही अक्षम्य चूक कशी केली! सर्व कातड्याचा नाश झाला! साहेब आला ह्मणजे मी त्यास काय सांगू? मी गरीब पडलों. याची किंमत तरी कोठून भरून देऊं." नंतर तो **विजयास** ह्मणाला, "मित्रा, हें रे तूं काय करीत आहेस? तूं 'स्लिपर्स' करावयाच्या असें चुकीनें ऐकिलें असेल, ह्मणून तुला मी मुद्दाम सांगितलें कीं, त्या साहेबांस बूट करावयाचे. आणि असें असूनही तूं 'स्लिपर्स'च करीत आहेस, याला काय ह्मणावें?"

**रामाजी** या प्रमाणें बोलत होता; इतक्यांत 'दरवाजा खोला' असा जरा लांबूनच आवाज ऐकूं आला. तो आवाज आपणासच अनुलक्षून आहे कीं काय, हें पाहावयास **गुणाईनें** खिडकीवाटें बाहेर पाहिलें, तेव्हां तिला अढळून आलें कीं, एक मनुष्य घोड्यावरून उतरून आपल्या घराकडेच घाईघाईनें येत आहे. तिनें पटकन् दार उघडिलें, तों तो

स्वार तेथें येऊन थडकलाही. त्यानें विचारलें, " रामाजीचें घर हेंच आहे काय? "

रामाजी पुढें होऊन ह्मणाला, " होय, आपली काय आज्ञा आहे?"

" कांहीं वेळापूर्वी तुमच्या येथें एक बडे–जाडे–साहेब आले होते ना? "

" होय. "

" त्यांच्या मेमसाहेबांनीं मला तुमच्या घरीं पाठविलें आहे. "

" बूटासाठीं कीं काय? "

" होय, त्याच संबंधांत."

हे त्या स्वाराचे शब्द ऐकतांच रामाजीच्या छातींत धस्स झालें. तो 'आ' करून त्याच्याकडे वेडया सारखा पाहूं लागला. स्वार पुढें ह्मणाला:—

" पण आतां बूट कांहीं नकोत, कारण साहेब वारले! "

" छे: ! हें शक्य तरी आहे काय? चार घटका पूर्वी तर ते...."

" त्यांनां कांहीं छातीचा आजार होता. त्यामुळें ते एकाएकीं आटपले. पण त्यांत आपल्याला कांहीं एक कळणार नाहीं. मेमसाहेबांनीं सांगितलें आहे कीं, साहेबांनीं जें तुह्मांला कातडें दिलें आहे, त्याचें आतां बूट न करितां ' स्लिपर्सच ' करा."

' स्लिपर्स ' हे शब्द ऐकतांच, आपल्या छातीवरची मोठी धोंड गेली, असें रामाजीस वाटलें. तो आश्चर्यानें ह्मणाला " काय, ' स्लिपर्स '! "

" होय, ' स्लिपर्स ' कारण साहेबलोकांत मेल्यानंतर ' स्लिपर्स ' घालण्याची चाल आहे. तुह्मांला सांगितलेलें काम लवकर करा. कारण त्यांना आतांच नेणार आहेत. "

विजयानें ' स्लिपर्स ' तयार केल्याच होत्या. त्यानें त्या एका कपडयानें साफ पुसल्या, व एकमेकींनां जोडून कागदांत गुंडाळिल्या; आणि त्या कागदाभोंवतीं एक दोरा गुंडाळून त्यानें त्या स्वाराचे स्वाधीन केल्या.

---

( ७ )

**बैसोनी निश्चळ करीं त्याचें ध्यान । देईल तो अन्नवस्त्र दाता ॥ १॥**
**काय आह्मां करणें आधिक सांचूनी । देव जाला ऋणी पुरवीता॥ २॥**

दयाळ मयाळ जाणें कळवळा । शरणागतां लळा राखों जाणं ॥३॥
नलगे मागणें सांगणें तयासि । जाणे इच्छा तैसी पुरवी त्याची॥४॥
तुका ह्मणे लेई अंगीं । विठ्ठल हा जगीं तूंच होसी ॥ ५ ॥

दुसरें वर्ष संपलें. तिसरें लागलें. तें गेलें. चवथें लागलें. अशीं सहा वर्षें निघून गेलीं. **विजय** तेथेंच रहात असे. त्याचें वर्तन पूर्वी प्रमाणेंच होतें. तो कधीं बाहेर जात नसे, व कामाशिवाय कधीं कोणाशीं बोलत नसे. या सहा वर्षांत तो अवघा दोनदांच हंसला होता. पहिल्यांदा—**गुणाईनें** त्यास भाकर वाढली तेव्हां, व दुसऱ्यांदा—**थिक्हेड** साहेब आले होते तेव्हां. **रामाजीचा विजयावर** फार लोभ जडला होता. आतां तो त्यास ‘ तूं कोठून आलास ’ असा प्रश्न कधींही करीत नसे. कारण त्यास अशी भीति वाटे कीं, ‘ न जाणो आपण जर याला असा प्रश्न केला; तर तो घर सोडून जावयाचा एखादा.’

एक दिवस ही सर्व मंडळी आपआपलें काम करीत बसली होती. **गुणाई** आपल्या गृहकृत्यांत गढली होती. मुलें इकडून तिकडे व तिकडून इकडे अशीं बागडत होतीं. **रामाजी** एका खिडकीपाशीं शिवीत बसला होता, व **विजय** दुसऱ्या खिडकीपाशीं शिवीत बसला होता. त्या मुलांपैकीं एक मुलगा **विजयाच्या** गळ्यांत हात घालून पाटीवर लोंबकळूं लागला. तो खिडकींतून बाहेर पहात **विजयास** ह्मणाला, “ काका, काका, तें पहा हो, एक बुवाजी दोन मुलींसह आपल्याकडेच येत आहेत. एक मुलगी—पण पाहिलेंत कां काका ?—ती पांगळी आहे थोडीशी ! ”

हें त्या मुलाचें भाषण ऐकून **विजयानें** आपलें काम तसेंच टेविलें, व तो खिडकींतून डोकें काढून बाहेर पाहूं लागला. त्याला खिडकींतून बाहेर बघतांना पाहून **रामाजीस** फार आश्चर्य वाटलें. कारण विजय खिडकीपाशीं बसे खरा, पण या उभ्या सहा वर्षांत त्यानें खिडकींतून सडकेकडे एकदांहीं पाहिलें नव्हतें. पण यावेळीं तो खिड-कीला टेंकून बाहेर कांहीं तरी निरखून पहात आहे, असें **रामाजीस** दिसलें. तेव्हां असें पाहण्याजोगें आहे तरी काय, ह्मणून तोही बाहेर पाहूं लागला, तों एक संभावित गृहस्थ सहा वर्षांच्या दोन मुलींसह आप-ल्याकडे येत आहे, असें त्याला दिसलें. तो जसजसा जवळ येऊं लागला

तसतसे **रामाजीस** वाटूं लागलें कीं हे गृहस्थ आपल्या परिचयातलेच आहेत. तो फार वेळ बुचकळ्यांत पडला नाहीं. कारण तो गृहस्थ दुसरा तिसरा कोणी नसून **श्रीधरपंत** आहेत, हें त्यानें लागलीच ओळखिलें. **श्रीधरपंत** आज आपल्या घराकडे येत आहेत असें पाहून त्याला फार आनंद झाला. कारण किती झालें तरी ते त्याचे अन्नदाते होते. तो त्यांना घ्यावयास बाहेर गेला.

**रामाजी** त्यांना रामराम करून हंसत ह्मणतो, "कसें काय रावसाहेब? आनंदांत तर आहांत ?"

" मी आनंदांत आहे, पण तूं? "

" रावसाहेब मीही आपल्या कृपेनें आनंदा...."

" हा वेड्या! त्यांत माझीरे कृपा कसली. त्यापेक्षां **विठोबाच्या** कृपेनें ह्मण. त्यानें मला बुद्धि दिली त्या प्रमाणें मी केलें. मग त्यांत..."

" रावसाहेब, त्यानें मला बुद्धि दिली, त्याप्रमाणेंच मीही बोललों." **रामाजी** हंसत हंसत ह्मणाला.

त्यानें **श्रीधरपंताला** आंत नेलें, व मोठ्या सन्मानानें खुर्चीवर बसविलें.

" या मुलींना जोडे करावयाचे आहेत. ह्मणून मी तुझ्याकडे आलों आहे. लहान मुलांचे जोडे ह्मटले ह्मणजे तिकडे कोणीही लक्ष देत नाहीं, वेळेवर ते करीतही नाहीं, यदाकदाचित् तयार करून दिलेच, तर ते साधारण केलेले असावयाचे! तूं ओळखीचा, तशांत तुझी आजकाल कीर्तीही लांबवर पसरली आहे. पण ओळखीचा चोर अन् जीवानिशीं मारी, तसा कांहीं प्रकार न होवो!"

" रावसाहेब, हें काय बोलतां! मी कराराबाहेर वागतच नाहीं. तशांत तुह्मी माझे अन्नदाते..."

" पुष्कळ झालें आतां तें. आधीं या मुलीचें माप घे पाहूं." असें ह्मणून **श्रीधरपंतांनीं** अधु पायाच्या मुलीस आपल्या मांडीवर घेतलें व ते पुढें ह्मणाले, " या दोन्ही मुलींचे पाय अगदीं सारखेच आहेत. पण हिचा हा डावा पाय अधु असल्यानें त्या पायाचा जोडा उजव्या पायापेक्षां किंचित् लहान करावया."

**रामाजी** त्या मुलीचें माप घेऊं लागला. त्या वेळीं त्याचें लक्ष **विजयाकडे** सहज गेलें. तो या वेळीं आपल्या हातांतील काम तसेंच ठेवून त्या मुलीकडे लक्ष लावून पहात होता. हें पाहून **रामाजीस** आश्चर्य वाटलें. त्या मुली लक्ष वेधण्याजोग्या होत्या हें खरें, तथापि **विजयाचे** पहाण्यावरून जणु काय त्या मुलींचा आणि त्याचा परिचय पूर्वीपासूनच असावा, असें त्यास वाटलें. तरी त्यानें आपलें माप घेण्याचें काम चालू ठेविलें होतें. **रामाजीनें** उजव्या पायाचें माप घेतलें व डाव्या पायाचें माप घेत असतां तो ह्मणाला, " या मुलीचा पाय असा कसा झाला, रावसाहेब ! अहाहा, किती सुरेख ही मुलगी आहे. हिचा हा पाय जन्मापासूनच अधु आहे कीं नंतर कांहीं झालें ?"

" हिचा पाय जन्मापासून असा नव्हता. तिच्या आईनें पाय चेंगरल्यामुळें तो असा अधु झाला."

**गुणाई** ही इतका वेळ स्तब्ध बसली होती. आपल्या मुलीचा पाय चेंगरणारी अशी ती हलगर्जी बाई कोण असावी, याचें तिला आश्चर्य वाटलें. या मुली कोणाच्या आहेत, हें कळवून घेण्याच्या जिज्ञासेनें ती ह्मणाली, " मला पहिलें वाटलें होतें कीं, या मुली धनीसाहेबांच्या असाव्यात, पण त्या मुली आपल्या नाहींत असें आतां वाटतें. "

" **गुणाबाई** या मुली माझ्या नाहींत आणि त्या माझ्या नात्यांतल्याही नाहींत. तथापि मीच यांना जन्मापासून सांभाळितों."

" रावसाहेब, आपण यांचे वडील नसून त्यांना आपला लळा तर फार दिसतो. आपण खरोखर दयासागर आहांत. ह्या मुली आपल्या नाहींत हें मला माहीत नव्हतें."

" तुला हें कोठून माहीत असणार ? कारण **महू** सोडून मला सहा वर्षे झालीं." **श्रीधरपंत** ह्मणाले.

" मी तेथें हाटास नेहेमीं जातों व त्या वेळीं तुमचा तपास नित्य करीत असतों. तेथें मला कळलें कीं, **रामपुऱ्यास** आपली बदली झाली !"

" होय, हेंच खरें आहे. **महू** सोडण्याच्या आधीं आठ एक दिवसांपासूनच मी या मुलींस सांभाळावयास लागलों. त्या गोष्टीला आज सहा

**वर्षें** लोटलीं. आतां तूंच सांग कीं, यांना माझा लळा लागूं नये तर काय व्हावें? तिनें यांना आंगावर वाढविलें, त्याच वेळीं मला एक मुलगा झाला होता. पण परमेश्वराची अशी इच्छा होती कीं, त्यानें जगूं नये व मी या मुलींवर—या निराश्रित अर्भकांवर प्रेम करावें. कदाचित् याचसाठीं माझ्या मुलास देवानें नेलें असावें."

"या मुली कोणाच्या आहेत?" **रामाजीनें** विचारलें.

**श्रीधरपंत** त्या मुलींचा वृत्तांत सांगूं लागले—"या मुलींच्या वडिलांचें नांव **रघुनाथराव.** ते आमच्या शेजारीं कित्येक दिवस रहात असत. गृहस्थ मोठा सुशील व सज्जन असल्यानें तो आह्मां सर्वांसच आवडे. तथापि त्यांतल्या त्यांत माझा आणि त्याचा विशेष परिचय होता. तो विशेष देवभक्त असल्यानें मी त्याच्या येथें नित्य भजनास जात असे. **रघुनाथराव** हे भजनाचे फारच भक्त! भजन करीत असतांना त्यांची ती तन्मय झालेली मूर्ति अजून डोळ्यांसमोर दिसते. एकदां का त्यांचें '**गुरुमहाराजा गुरु। जय जय परब्रह्म सद्गुरु**' सुरू झालें, ह्मणजे दोन दोन तास ते नागासारखे डुलत राहावयाचे. त्यावेळची त्यांची स्थिति ह्मणजे 'ब्रह्मानंदीं लागली टाळी अन् तेथें देहातें कोण सांभाळी' अशा पैकीं व्हावयाची. असे ते निस्सीम देवभक्त होते. **रघुनाथरावास** सारा दहा रुपयेच काय तो पगार होता. पण घरांत तो आणि त्याची बायको अशीं दोन माणसें असल्यानें खर्चाची कधीं फारशी ओढाताण झाली नाहीं. त्यांची बायको **अन्नपूर्णाबाई** ही घरकामांत दक्ष व टापटिपीची असल्यानें, त्यांना कांहींएक पहावें लागत नसे. **अन्नपूर्णाबाईच्या** दक्षतेमुळें त्यांना पैशाची वाण कधींही भासली नाहीं. नवराबायकोंत फार प्रेम असल्यानें ते सदा आनंदी असत. कालांतरानें त्यांची बायको गरोदर राहिली. नऊ महिने अगदीं भरले तोंच—दुर्दैवच ह्मणावयाचें!—**रघुनाथरावांस** नवज्वर झाला व बिचारा, 'बायकोचें पुढें काय होईल,' हेंच बडबडत देवाधीन झाला!! या अनिष्ट व अवचित् प्रसंगामुळें **अन्नपूर्णाबाईची** काय दशा झाली असेल, याची कल्पनाच करावयाची. तिला नवऱ्याशिवाय दुसरें कोणीही आप्त नव्हतें. तशांत, तिचें आपल्या पतीवर अलोट प्रेम होतें. मग, नवऱ्याची अशी वाट लागलेली पहातांच तिचें दोन दिवस भान जावें, यांत काय बरें आश्चर्य! मला कांहीं

तें दुःख पाहवेना. नवरा बुधवारीं रात्रीं गेला, व रविवारीं सकाळीं ती बाळंतीण झाली! तिला दोन जुळ्या मुली झाल्या, त्या ह्या. तिची व्यवस्था कशी काय ठेवावी, हें मला कळेना. गांवढेंच तें! तेथें कोणाचें साह्य मिळणार? आमच्याकडून होईल ती खटपट आह्मी करीत होतों. बरें या प्रसंगीं आमची स्थिति तरी ठीक असावयाची होती? पण छेः! याच दिवसांत माझी बायको एक महिन्याची बाळंतीण. ह्मणून तिला अन्नपूर्णा-बाईच्या मदतीस फारशी पाठवितां येईना. माझ्या आईला नीट दिसत नव्हतें. तरी तिला त्या बाईचे मदतीस पाठविलें. दुष्काळांत तेरावा महिना म्हणतात, तशी आमची स्थिति झाली. जेमतेम संध्याकाळ झाली. तों ती बाईही आटोपली असें समजलें!! त्यावेळीं या तान्ह्या मुलीचा पाय आपल्या आईच्या आंगाखालीं आला, म्हणून तो पाय कायमचा अधु झाला. असो. मग, या मुलींचें काय करावें हा प्रश्न पडला. मी घरांत जाऊन बायकोला सारी हकीगत सांगितली व तिचा सल्ला विचारला. तिनें मला अतिशय धीर दिला व सांगितलें कीं, 'त्या मुलीस मी स्वतः सांभाळीन. ज्या परमेश्वरानें त्यांना जन्मास घातलें, त्याला त्या मुलींची काळजी आहेच.' हे तिचे धीराचे शब्द ऐकून मला फार संतोष वाटला व तिच्याबद्दल माझा आदरभाव द्विगुणित झाला. मी तिला म्हणालों, 'तूं ह्मणतेस तें सर्व खरें, पण तुला तीन मुलें सांभाळतां येतील ना? नाहीं तर दुसरी कांहीं सोय करूं.' 'सोय करूं' असे शब्द मी उच्चारले खरे पण सोय कोणची करावयाची, हें मला दिसतच होतें! माझ्या भाषणावर ती म्हणाली, 'त्यांना सांभाळण्याचा माझा निश्चय झाला आहे. निश्चय असला ह्मणजे त्यांत यश हें आलेंच पाहिजे. आजपर्यंत एकाच वेळीं इतकीं मुलें मीं कधींही सांभाळलीं नाहींत, मग त्यांना आतां सांभाळतां येईल किंवा नाहीं, हें मीं कसें सांगूं? सध्यां त्यांना आणा तर खरें.' मी लागलींच रघुनाथरावाच्या घरीं जाऊन त्या मुलींना आणलें व बायकोच्या स्वाधीन केलें. नंतर त्या बाईचें जें कांहीं उत्तर-कार्य करावयाचें तें केलें.

"पहिले पहिले माझी बायको या अधु मुलीस फारशी पाजत नसे. कारण ही पुढें जगेल, अशीं चिन्हें त्यावेळीं दिसत नव्हतीं. तशांत तीन मुलांना पाजण्याचें सामर्थ्य तिच्या आंगीं कोठें होतें? म्हणून असा

पक्षपात करण्यांत येई. पण एक दोन दिवसांनीं माझा मुलगा गेला व **पंढरीनाथानें** या अधु मुलीचीही सोय लावून दिली. **रघुनाथरावांच्या** बायकोचें व माझ्या बायकोचें एकमेकींवर फार प्रेम असे. तशांत या मुलींची करुणास्पद स्थिति असल्यामुळें, तिला आपला मुलगा गेल्याचें फारसें दुःख न होतां, या मुलींवर ती फार जीव कीं प्राण करूं लागली. याच कारणामुळें मलाही या मुली आवडूं लागल्या. मला **विठ्ठलाच्या** कृपेनें हल्लीं एक वर्षभराचा मुलगा आहे. तथापि आमचें या मुलींवर पहिल्यासारखेंच प्रेम आहे."

ही हकीगत सर्वजण तटस्थपणें ऐकत होते. त्यांना एकप्रकारचा आनंद, सुख, दुःख, आश्चर्य, भीति, परमेश्वराविषयीं आदर वगैरे वाटलें. **रामाजी** म्हणाला, " आमचे महाराज म्हणतात—

**तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहे त्या अनंता आठवूनी ॥**

हें खोटें आहे, असें कोण ह्मणेल ?"

याप्रमाणें **रामाजी** बोलत आहे तोंच **विजय** बसला होता, त्या कोंपऱ्यांतून देदीप्यमान, व नेत्रांस असह्य असा प्रकाश पडूं लागला. यामुळें तें घर प्रकाशमय झालें. हा काय प्रकार आहे हें जाणण्याकरितां सर्व मंडळी त्या दिशेकडे पाहूं लागली, तों **विजय** वर आकाशाकडे पहात व हंसत आहे, असें त्यांस दिसलें.

---

## ( ८ )

**माझें परिसावें गाऱ्हाणें । सुखदुःखांचीं वचनें ॥ १ ॥**
**हाचि आम्हां ठाव । पायीं बिरोपाया भाव ॥ २ ॥**

तुकाराम.

**कोठें देवा बोलों । तुह्मां भीड घालूं गेलों ॥ १ ॥**
**दुर्बळा मागतां । त्याच्या प्रवर्तला घातां ॥ २ ॥**
**तुका ह्मणे नाहीं । मज कळलें ऐसें कांहीं ॥ ३ ॥**

**विजय** आपल्या जागेवरून उठला, आणि हातांतलें कामकाज ठेवून **रामाजीस** व **गुणाईस** नमस्कार करून म्हणाला, " धनीसाहेब, येतों मी

आतां. मला आज्ञा असावी. माझ्या कामांत व वागण्यांत आजपर्यंत जर कोठें चूक झाली असली, तर त्याची मला क्षमा करावी."

यावेळीं सर्वांचेंच लक्ष **विजयाकडे** होतें. सर्व खोलीभर जो प्रकाश पडला आहे, तो **विजयाच्या** आंगांतून येत आहे, हें पहातांच सर्व आश्चर्यानें स्तब्ध झाले. त्यांना कांहींच सुचेना. थोडा वेळ गेल्यावर सर्वांनीं **विजयास** साष्टांग नमस्कार घातला व **रामाजी** त्यास ह्मणाला, "महाराज आपण खचित् सामान्य मनुष्य नसून कोणी तरी दैवीपुरुष आहांत. आपणास प्रश्न करण्याचीही आमची योग्यता नाहीं, मग आपल्यासारख्यांस घाळगण्याची गोष्ट तर लांबच राहिली. आपल्यापुढें, आह्मी मानव ह्मणजे यत्किंचित् पामर व कीटक आहोंत. असें जरी आहे, तरी महाराज, मी आपणास जें विचारतों, त्याचें आपण कृपा करून उत्तर द्यावें."

"तुला काय विचारावयांचें आहे, तें खुशाल विचार."

"महाराज, आपण मला **नवलख्याचे** बगीच्यांत आढळलांत, तेथून मी आपणास घरीं आणलें. त्यासमयीं आपण अतिशय उदास होता. पण जेव्हां **गुणाईनें** आपलें पान वाढलें, तेव्हां आपली ती सर्व उदासीनता जाऊन आपण अधिक तेजस्वी दिसूं लागलांत व एकाएकीं हांसलांत, हें कसें काय? त्यानंतर तो साहेब जेव्हां बूट करविण्यास आपल्या येथें आला होता, तेव्हां आपण दुसऱ्यांदां हंसलात, व त्यावेळींही आपला चेहरा अधिक तेजस्वी दिसूं लागला. त्यानंतर पांच वर्षे गेलीं, पण त्या अवधींत आपण कधींही हंसला नाहीं, पण आज ह्या मुलींना पाहून आपण तिसऱ्यांदां हंसलांत, व आज तर आपलें तेज प्रत्यक्ष **सूर्याप्रमाणेंच** दिसत आहे; ह्या ज्या गोष्टी घडल्या त्यांचीं कारणें काय आहेत, तें जाणण्याची माझी इच्छा आहे!"

**विजय** ह्मणाला, "आज हें जें माझ्या आंगांतून तेज निघत आहे, याचें कारण **त्रैलोक्याधीश श्री भगवान् विष्णूंनीं** माझे सर्व अपराध पूर्णपणें क्षमा केले आहेत. मी तीनदां हंसलों, याचें कारण भगवानानें मला तीन गोष्टी शिकावयास **मृत्युलोकीं** पाठविलें होतें, व मी त्या या सहा वर्षांच्या अवधींत शिकलों. **गुणाईस** माझी दया आली; त्या वेळीं मला पहिली गोष्ट कळली. त्या वेळीं मी पहिल्यांदां हंसलों. नंतर तो साहेब बूट करावयास जेव्हां आला, तेव्हां मला दुसरी गोष्ट कळली व मी दुसऱ्यांदां

हंसलों. त्याचप्रमाणें, या मुलींना जेव्हां मी खिडकींतून पाहिलें, तेव्हां मला तिसरी व शेवटची गोष्ट समजली आणि मी तिसऱ्यांदां हंसलों."

**रामाजी** हात जोडून विचारितो, "महाराज, भगवानानें आपणास शिक्षा कां केली व त्यांनीं आपणास कोणच्या तीन गोष्टी शिकण्यास या भूलोकावर पाठविलें, हें कृपा करून सांगावें."

"मी देवाची अवज्ञा केली ह्मणून त्यानें मला शासन केलें. तुह्मांला मी तो सर्वच इतिहास सांगतों, ऐका. गृहस्थहो, मी **विष्णूचा** द्वारपाळ **विजय** आहे."

हें भाषण ऐकतांच सर्वांसच आपण धन्य आहोंत असें वाटल, कारण अशा देवदूताचें दर्शन होणें हें का लहान सहान भाग्य होय! सर्व लोक त्याच्याकडे आदरपूर्वक पाहूं लागले. **विजय** पुढें बोलूं लागला—

"**रघुनाथरावाची** हकीगत आतांच **श्रीधरपंतांनीं** तुह्मांला सांगितली. तीवरून तुह्मांला हें कळलेंच असेल कीं, ते महान् भगवद्भक्त होते. त्याचप्रमाणें त्यांची बायकोही पतिव्रता होती. ते **विष्णु**भक्त असल्यानें मी त्यांना देवाच्या आज्ञेप्रमाणें **वैकुंठांत** न्यावयास भूलोकावर आलों. नंतर तीन चार दिवसांनीं अन्नपूर्णाबाईस आणावयास मला भगवान् **विष्णूंनीं** पाठविलें. त्यांच्या आज्ञेप्रमाणें मीं पुनः **रघुनाथरावाच्या** घरीं गेलों. ती बाई खाटेवर अस्ताव्यस्त पडली होती. तिनें डोकें फोडून घेतल्यामुळें तें रक्तानें न्हालें होतें. तिचें मुख अत्यंत दुःखी दिसत होतें. ती दुःखातिशयामुळें वैतागून आपण होऊनच मरणाचे द्वारांत बसली होती. तिच्या जुळ्या मुली थोडीबहुत हालचाल करीत आपल्या आईपाशीं पडल्या होत्या. तिच्या आंगीं, मुलें उचलण्याची यत्किंचितही शक्ति नव्हती. ती बाई साध्वी असल्यामुळें तिनें डोळे उघडतांच मी तिला दिसलों. माझा हेतु तिला समजला. त्यामुळें तिला एकदम रडूं कोसळलें. हंसावें कीं रडावें तें तिला कळेना. एकदां तिला वाटे, आपण या हालांतून सुटलेलें बरें; व एकदां-आईच ती-तिला वाटे, आपल्या मागें या मुलींना कोण सांभाळणार! हा विचार तिच्या मनांत येतांच तिला फार दुःख होई. ती स्फुंदतस्फुंदत मला ह्मणाली, 'हे यमदूता—'

" 'मी यमदूत नव्हे. मी विष्णुदूत आहें.' तूं विष्णुभक्त असल्यामुळें मी तुला वैकुंठांत न्यावयास आलों आहें.

" 'बरें तर, हे विष्णुदूता, मला तूं सध्यां नेऊं नकोस. माझी सध्यां काय स्थिति आहे ती पहा—पण मी तुला 'पहा' काय ह्मणतें! तुला ती कळतच आहे. माझ्या नवऱ्यास जाऊन अजून पुरते चार दिवसही झाले नाहींत! घरची गरीबी कोण! मला कोणी लांबचेही नातेवाईक नाहींत, मग या बाळांचें कोण बरें संरक्षण करणार! यांनां आपल्या पायांवर उभे राहण्याची शक्ति येईपर्यंत मला यांच्याजवळ राहूं दे. मग तूं मला खुशाल ने. आईबापावांचून मुलांची काळजी कोण घेणार! त्यांच्याशिवाय मुलें जगूं शकत नाहींत.'

" हे त्या बाईचे दीनवाणे शब्द ऐकतांच मला तिची फार दया आली. तिला वैकुंठपुरीस आणावयास भगवानांनीं मला पाठविलें खरें, पण तिला आपल्या मुलींपासून न्यावेंसें मला वाटेना. पिण्यासाठीं म्हणून एका मुलीस मी तिच्या आंगावर ठेविलें व दुसरीस तिच्या हातांत दिलें. नंतर मी विष्णूकडे गेलों व त्याला त्या बाईची सर्व हकीगत सांगून मी ह्मणालों, 'देवा, त्या बाईची फार शोचनीय स्थिति आहे. तिच्या मागें त्या मुलींची काळजी घ्यावयास कोणीही नाहीं. ही शोकजनक स्थिति पाहून माझें अंतःकरण द्रवलें. ह्मणून मी तिला येथें आणिलें नाहीं. त्या मुली सज्ञान झाल्या, ह्मणजे मग ती बाई आपण होऊनच येथें यावयास तयार आहे.'

" ही माझी विनंती ऐकतांच भगवान् म्हणाले, 'जा, व त्या बाईचा प्राण आण; आणि मी सांगतों त्या तीन गोष्टी शिकून ये.'

" हें देवाचें अनपेक्षित भाषण ऐकून मी विचारमूढ झालों. त्या बाई-संबंधीं मीं त्याला कोठून बोललों, असें मला झालें. माझ्या तोंडांतून शब्द निघेनात. मी हात जोडून त्याच्याकडे पाहूं लागलों. तो पुढें म्हणाला, 'मनुष्यांत काय असतें, त्यास काय दिलें नाहीं, आणि तीं कशाच्या आधारें वांचतात या तीन गोष्टी शीकेतोंपर्यंत तुला मनुष्य रूपानें भूमीवर राहिलें पाहिजे. या तीन गोष्टी शिकलास कीं, मग तुला पूर्वीचें रूप प्राप्त होईल.'

" असा ईश्वरानें मला शाप दिला व उश्शापही दिला. देवानें सांगितल्याप्रमाणें मी पुनः पृथ्वीवर आलों व **अन्नपूर्णाबाई**चा प्राण तिच्या देहांतून काढून घेतला, त्यामुळें तिचें शरीर कोलमडून या मुलीचा पाय दुखावला व तो कायमचा अधु झाला. त्या बाईचा प्राण ईश्वराकडे न्यावयास म्हणून मी पुनः **वैकुंठास** जावयास उडालों, पण तितक्यांत सोसाट्याचा वारा सुटला त्यामुळें मला वर जातां येईना. अशा वाऱ्यांस मी पूर्वी कधींही जुमानलें नव्हतें. पण भगवानाचा शाप असल्यानें मला वर जातां येईना. माझ्या हातांतून त्या बाईचा प्राण निसटला, तो थेट **वैकुंठास** गेला; व मी मात्र **नवलख्याच्या** बगीच्यांत येऊन पडलों."

---

## (९)

**संताचिया गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःखलेश ॥ १ ॥**

तुकाराम.

**पाळिलों पोसिलों जन्मजन्मांतरीं । वागविलों करीं धरोनियां ॥ १ ॥**
**आतां काय माझा घडेल अव्हेर । मागें बहु दूर वागविलें ॥ २ ॥**
**नेदीं वारा अंगीं लागों आघाताचा । घेतला ठाईचा भार माथां ॥३॥**
**तुका म्हणे बोल करितों आवडीं । अविट तेचि गोडी अंतरीची ॥४॥**

आपणाबरोबर जो आज सतत सहा वर्षे राहिला व ज्यास आपण अन्न, पाणी आणि वस्त्रें पुरविलीं तो कोण आहे, हें **रामाजीस** व **गुणाईस** आतां कळलें. त्यांचे नेत्र आनंदाश्रूंनीं भरून आले. **श्रीधरपंतां**सही फार आनंद झाला. त्यांना वाटलें, **विठ्ठला**ची आपणावर कृपा म्हणून आज असा **विजयाच्या** भेटीचा योग आला.

**विजय** म्हणतो, " मीं तेथें अगदीं नग्न पडलों होतों. मनुष्यजातीस काय लागतें, त्यांच्या गरजा काय आहेत, ते कां जगतात, त्यांचा चरितार्थ कसा चालतो, त्यांचा जीवनक्रम कसा असतो, याची मला काडीभरही कल्पना नव्हती. अर्थात् मला भूक म्हणजे काय व वस्त्रें काय असतात, हेंही ठाऊक नव्हतें. कांहीं वेळानें मला थंडी वाजूं लागली व भूकही लागली, अंधःकारही हळु हळ पडूं लागला—अंधकार ह्मणजे काय पदार्थ

आहे, हेंही मला ठाऊक नव्हतें. मीं जेथें होतों तेथें एका झाडाजवळ लहानसें देऊळ होतें. थंडीपासून आपलें संरक्षण व्हावें, म्हणून मी देवळांत जाण्याचा विचार केला. पण तें फारच लहान असल्यानें मला आंत जातां येईना. मग करणार काय ! बाहेरच बसावें लागलें. मला भुकेचा आणि थंडीचा फारच त्रास होऊं लागला. इतक्यांत मला पावलांचा ध्वनि ऐकूं येऊं लागला, म्हणून मी ज्या दिशेकडून तो ध्वनि येत होता, त्या दिशेकडे पाहूं लागलों; तोंच एक मनुष्य स्वगत कांहीं भाषण करीत येत आहे, असें मला आढळून आलें. मनुष्यरूप प्राप्त झाल्यापासून पहिल्याप्रथम हाच मनुष्य मी पाहिला. त्याचें तोंड इतकें भयंकर दिसत होतें कीं, मी आपलें तोंड लागलींच फिरवून घेतलें. त्या मनुष्याच्या आत्मगत भाषणावरून मला असें समजलें कीं, तो मनुष्य निवळ संसारांत गुरफटला आहे. त्याचें लक्ष आपल्या मुलांचें, बायकोचें व आपलें पोट कसें भरावें इकडे होतें. दुःखितांना मदत करण्याचें त्याच्या मनीं येईना. मीं जेव्हां त्याचे दृष्टीस पडलों, तेव्हां त्याचे कपाळास सत्राशें आंठ्या चढल्या. त्या योगें तो मला अधिकच भयंयर दिसूं लागला. त्यानें तेथून पळ काढला; त्यामुळें मला जी थोडीशी आशा उत्पन्न झाली होती, ती नष्ट झाली. आतां काय करावें, याची मला विवंचना पडली. इतक्यांत तोच मनुष्य मजकडे परत येत आहे, असें दिसलें. मीं त्याच्या तोंडाकडे पाहूं लागलों, तों मला तो पूर्वीचा मनुष्य दिसेना. मला वाटलें, हा दुसराच कोणी मनुष्य आहे, इतकें त्याच्यांत अंतर पडलें होतें. मी पूर्वी जेव्हां त्याला पाहिलें, तेव्हां त्याच्या डोक्यावर मला एक क्रूर राक्षस दिसला होता; पण आतां पहातों तों त्यांत मला ईश्वराचा अंश दिसूं लागला. पूर्वी त्याच्या तोंडावर मृतकळा दिसत होती, पण ती आतां जाऊन त्यावर दैविक तेज झळकूं लागलें. त्यानें माझ्या आंगांत आपले कपडे घातले व मला आपल्या घरीं नेलें. त्याची बायको आमचें स्वागत करण्यास सज्ज होतीच. तिनें आपल्या तोंडाचा जो पट्टा सोडला होता, तो ‘ न भूतो न भविष्यति ’. या बाईचें तोंड मला त्या मनुष्यापेक्षांही भयंकर दिसलें. ती जें भाषण करीत होती, तें भाषण कसलें ! तिच्या तोंडांतून शब्द निघत नसून एक एक भयंकर अक्राळ विक्राळ राक्षस निघत आहे, असें मला दिसलें. राक्षसांची तिच्या भोंवतीं इतकी गर्दी झाली होती कीं, तेथें श्वासोच्छ्वास घेण्याची मला मारामार

पडूं लागली. तिची मोठी इच्छा होती कीं, त्या ऐन थंडींत मी घराबाहेर जावें. त्यावेळीं तिनें मला खरोखरच घराबाहेर लावून दिलें असतें, तर तिच्या मुखांतून आतांच निघालेल्या एखाद्या राक्षसानें प्रसन्न होऊन तिला खाल्लें असतें. ती मेली असती; हें मला माहीत होतें. इतक्यांत तो मनुष्य त्या बाईपाशीं परमेश्वराविषयीं कांहीं बोलला. त्याच्या भाषणानें तिच्या मनावर चांगला परिणाम होऊन तिची पूर्वीची वृत्ति बदलली. तिच्या मनांत सद्भाव जागृत झाला; यामुळें तिच्या भोंवतीं इतका वेळ जे राक्षस घिरट्या घालीत होते, ते एकदम दग्ध झाले. कांहीं वेळानें तिनें मला अन्न आणून दिलें, त्यावेळीं मी तिच्याकडे पाहिलें, तों त्या बाईभोंवतीं एकही राक्षस नसून तिच्यांत 'दया, क्षमा व शांति जागृत झाल्यामुळें मला तिच्या ठायीं देवाची वसती, दिसूं लागली.

"त्रैलोक्यनाथ **विष्णूनें** मला ज्या तीन गोष्टी शिकावयास सांगितल्या होत्या, त्यांपैकीं पहिली ह्मणजे 'मनुष्यांत काय असतें' ही मला आठवली. त्याचें उत्तर:—मनुष्यांत प्रेमभाव असतो. त्यानें मला ज्या तीन गोष्टी शिकावयास आज्ञा केली होती, त्यांपकीं एक गोष्ट त्यानें मला इतक्या लवकर शिकविलीही, हा विचार मनांत येऊन मी पहिल्या प्रथम हंसलों. पण अजून सारें संपलें नव्हतें. 'मनुष्यास काय दिलें नाहीं' आणि 'तें कशाच्या आधारें वांचतात,' या दोन गोष्टी मला अद्यापि शिकावयाच्या होत्या.

"गृहस्थहो, मी ज्याच्या घरीं रहात होतों, तो गृहस्थ ह्मणजे **रामाजी** हें कांहीं सांगावयास नकोच. असो. या गोष्टीस एक वर्ष होऊन गेलें. नंतर एक साहेब **रामाजी**च्या घरीं बूट करून घ्यावयास आला. त्याची अशी अट होती कीं, आपल्या बूटाचा आकार एक वर्षभर जशाच्या तसाच राहिला पाहिजे मी त्याच्याकडे पाहिलें, तों त्याच्यामागें एक यमदूत त्याचे प्राण हरण करावयास उभा होता. तो मला दिसला. तो माझ्याशिवाय कोणासच दिसला नाहीं. त्याला पाहतांच मला कळलें कीं, ही स्वारी सूर्यास्तापूर्वीच **यमपुरीस** जाणार आहे. मी स्वगत विचार करूं लागलों, 'हा मनुष्य वर्ष-भराच्या बोलीनें जोडा तयार करवीत आहे, पण बिचाऱ्यास हें माहीत नाहीं कीं, आपली आजच समाप्ति होणार आहे.' हा विचार माझ्या मनांत येतांच 'मनुष्यास काय दिलें नाहीं' ही जी देवानें दुसरी गोष्ट मला

शिकावयास सांगितली होती, तिचें मला स्मरण झालें. ‘ मनुष्यांत काय असतें ’ हें मी पूर्वींच शिकलों होतों; पण आतां ‘ मनुष्यास काय दिलें नाहीं’ हेंही शिकलों. याचें उत्तरः—“आपल्या गरजा काय आहेत, हें समजण्याचें ज्ञान मनुष्यांस दिलें नाहीं. ” हें मला कळलें आणि मी दुसऱ्यांदां हंसलों. याप्रमाणें देवानें दुसरी गोष्ट मला स्पष्ट करून दाखविली, ह्मणून मला आनंद झाला.

“ ” सर्व झालें, तथापि ‘ मनुष्य कशाच्या आधारें वांचतात ’ हें मला अजून समजलें नव्हतें. तें कधीं कळतें, याची वाट पहात मी तुमच्या घरीं राहिलों. येथें **तुकारामाचे** अभंग, **विठोबाचें** नामस्मरण इत्यादि नित्य होत असल्यामुळें मला फारसें वाईट वाटलें नाहीं. मी **विठोबाच्या** आणि **गजेंद्रमोक्षाच्या** चित्रांकडे पहात आपला काळ घालवूं लागलों. त्या शापांतून भगवान् मला कधीं मुक्त करितात इकडे माझें सारें लक्ष लागलें होतें. मी त्याचें स्मरण नित्य करीत असें. त्यानें **गजेंद्राचा** उद्धार नक्राच्या तोंडांतून ज्याप्रमाणें केला, त्याप्रमाणें माझाही उद्धार करावा असें मी त्यास नित्य विनवीत असें. **रामाजीच्या** तोंडून मी अनेक अभंग ऐकले त्यापैकीं—

**गज इंद्र पशु आप्तें मोकलीला । तो तुज स्मरला पांडुरंगा ॥ १ ॥**
**त्यासाठीं गरूड सांडुनि धांवसि । माया झळंबसी दिनानाथा ॥ २ ॥**
**धेनु वत्सावरी झेंप घाली जैसी । तैसें गजेंद्रासी सोडवीलें ॥ ३ ॥**
**तुका ह्मणे ब्रीद बांधले यासाठीं । भक्तासी संकटीं रक्षावया ॥ ४ ॥**

हा अभंग मला फार आवडला, व मी तो स्वतःशीं नित्य ह्मणत असें. याप्रमाणें सहा वर्षें गेलीं. आज **श्रीधरपंत** या दोन मुली घेऊन आले. त्यांच्या तोंडून मी या मुलींचा वृत्तांत श्रवण केला. त्यावरून मला असें कळलें कीं, **अन्नपूर्णाबाईच्या** मुली अजूनही जिवंत आहेत; इतकेंच नव्हे, तर **श्रीधरपंतांनीं** या मुलींचा सांभाळ प्रत्यक्ष पोटच्या मुलांप्रमाणें केला. त्यांनां पाहतांच त्यांच्यांत ईश्वरी अंश आहे, असें मला कळलें. ईश्वरत्व अंगीं यावयास श्रीमंती, जगांतला मोठेपणा इत्यादि आंगीं असावें लागत नाहीं. त्यांना पाहून ‘मनुष्य कशाच्या आधारें जगतात’ हें मला समजलें. याप्रमाणें **श्रीहरीनें** तिसऱ्या गोष्टीची मजजवळ परिस्फुटता केली आणि माझा शाप संपविला. म्हणून त्यावेळीं मी तिसऱ्यांदां हंसालें.”

**विजया** भोंवतीं इतका प्रकाश पडला कीं, तो त्यांत झाकला गेला. त्याचा आवाज मोठा होऊं लागला. जणु काय तो त्याच्या तोंडांतून येत नसून आकाशांतूनच येत होता. तो पुढें ह्मणाला—

" प्रत्येक मनुष्य जो जगतो, तो आपण घेत असलेल्या काळजीमुळें जगत नाहीं, तर प्रेमामुळेंच जगतो."

" आपलीं मुलें जिवंत राहण्यास कशाची अवश्यकता आहे, हें समजण्याची शक्ति आईला दिली नाहीं; तसेंच आपल्या गरजा काय आहेत, हें कळण्याची शक्ति श्रीमंत मनुष्याला दिली नाहीं; त्याचप्रमाणें, मृत्यूची आपल्यावर केव्हां झडप पडेल, हें कळण्याची शक्ति कोणालाही दिली नाहीं.

" मला जेव्हां मनुष्यत्व प्राप्त झालें, तेव्हां मी स्वतःच्या काळजीमुळें जगलों नाहीं; तर एका वाटसराच्या अंतःकरणांत प्रेम वसत होतें, त्याला व त्याच्या बायकोला माझी कींव आली, आणि त्यांनीं मजवर ममता केली, ह्मणून मी जगलों. या अनाथ मुली जगल्या, याचें कारण त्यांच्या आईनें त्यांची काळजी घेतली हें नव्हे, तर त्यांच्या शेजाऱ्याला त्यांची कींव आली व त्यांच्या हृदयांत प्रेम वसत होतें, ह्मणून ह्या अनाथ मुली जगल्या. प्रत्येक मनुष्य जिवंत राहतो, याचें कारण तो आत्मसुखाची काळजी घेतो हें नव्हे, तर मनुष्यमात्रांत प्रेमभाव जागृत आहे, हें आहे.

" ईश्वरानें कांहींना मनुष्य जन्म दिला, त्यांनीं त्या जन्माचा उपभोग घ्यावा ही त्याची इच्छा आहे; हें मला माहीत होतें, पण त्याचें खरें रहस्य मला आतां कळलें."

इतकें भाषण केल्यानंतर **विजयानें विष्णूचें** स्तवन केलें. त्याच्या आवाजामुळें सर्वांस कंप सुटला. इतक्यांत त्या घराचें छप्पर दुभागलें व तो बसला होता तेथून एक तेजाची ज्योत वर आकाशांत गेली. त्या तेजाच्या प्रभावामुळें **रामाजी, गुणाई**, त्यांचीं मुलें, **श्रीधरपंत** व त्या दोन मुली मूर्च्छित पडल्या. कांहीं वेळानें ते शुद्धीवर येऊन पाहतात, तों तेथें आपणच आपण असून घरही पूर्वीच्याच ठिकाणीं उभें आहे, असें त्यांना आढळून आलें.

समाप्त.

# शुद्धिपत्र.

| पृष्ट. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
| --- | --- | --- | --- |
| १० | २४ | मागील पृष्टांत | वर |
| १८ | १ | होतें | होतें |
| ४० | २२ | सुळींच | मुळींच |
| ४८ | २३ | अनंत झाल्या | अनंत यातना झाल्या |
| ५४ | २ | तस्मादसक्त: | तस्मादसक्तः |
| ६० | १३ | ते | तेव्हां |
| ६२ | ४ | अश्रप्रवाह | अश्रप्रवाह |
| ६६ | ८ | दब्द | शब्द |
| ६८ | २३ | द:खभारामुळें, | या दुःखभारामुळें |
| ८० | २० | आह्यां | आम्हां |